

# मुक्तिसंग्राम !

तळाशी दबलेल्या, खेड्यातील अखेरच्या माणसाला, शहरातील सर्वसामान्य स्त्रीपुरुष नागरिकाला पुरेसे अन्न, वस्त्र आणि निवारा, शिक्षण आणि समान वागणूक या गोष्टी प्राप्त होत नाहीत तोवर मूठभरांना या देशात चैनबाजीत आणि विशेष समृद्धीत लोळण्याचा अधिकार नाही. हे एक ध्रुवसत्य विसरले गेल्यामुळे आपल्या नियोजनाची परवड झाली. गोरगरीब व मध्यम परिस्थितीतले लोकही अन्नान्नदशेला लागले, देशात भ्रष्टाचार, महागाई, टंचाई, बेकारी माजली, देश कर्जबाजारी झाला, परकीयांची दडपणे वाढत गेली.

या सर्वांतून मुक्त होणे हा पुण्यात शनिवारवाड्यासमोर एक ऑगस्टला झालेल्या मोर्चा व उपोषणाचा, दिवसभराच्या चर्चेचा, सायंकाळच्या सभेचा व सभेच्या शेवटी घेतल्या गेलेल्या प्रतिज्ञेचा मुख्य आशय होता.

आपल्या राजकीय–सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे शुद्धिकरण ज्यामुळे होऊ शकेल असे स्वदेशी–बहिष्काराचे अनेक कार्यक्रम, लोकांनी स्वयंस्फूर्तीने स्वीकारावयाची व्रते, उपक्रम त्या दिवशी विविध गटचर्चेतून पुढे आले होते. यातील एक वातानुकूलित इमारती, खोल्या, यंत्रसामग्री यासंबंधी होता. खरोखर या देशात या यंत्रसामग्रीची गरज आहे का ? रुग्णालये वगैरे अगदी किरकोळ अपवाद वगळता या यंत्रसामग्रीचा, त्यामुळे काही थोड्यांना लाभणाऱ्या सुखसोयींचा आपल्या देशाच्या सद्यःस्थितीशी काही मेळच बसत नाही. शहरीकरणाचा रोग फैलावतो आहे. हा रोग सुसह्य करण्यासाठी त्यावर हा आणखी एक श्रीमंती इलाज सुरू आहे. बहुसंख्य लोक जोवर उन्हातान्हात, चिखलामातीत काम करताहेत, कोंदटलेल्या, गलिच्छ, अंधाऱ्या जागेत राहाताहेत तोवर अगदी मोजक्या वरिष्ठ वर्गाने ही ऐषाराम वाढवणारी चैन उपभोगणे हे संपत्तीचे एक चालू स्थितीत न परवडणारे, असमर्थनीय व अश्लाघ्य प्रदर्शनच आहे. विषमता वाढवणाऱ्या आपल्या चुकीच्या नियोजनाचे हे एक डोळ्यांना खुपणारे प्रतीकही आहे. हे प्रतीकच हटवले, काढून टाकले तर ?

- स्मगलिंगचा माल न वापरणे,
- उधळपट्टी, साठेबाजीला आळा घालणे,
- परदेशात विनाकारण ज्यामुळे पैसा जातो असा माल न घेणे, कोकाकोला–कोलगेटसारख्या अनावश्यक वस्तूंच्या कोलॅबरेशन्सची बाजारपेठ बंद करणे,

[ पृष्ठ ४ वर

शनिवार
१७ ऑगस्ट १९७४
एक रुपया

माणूस


दुसर हलकं काम द्या मला
आमदारांना उचलायला
क्रेन मागवा!


हल्ली एक बरं
झालयं! चहाला
रॉकेलचा वास
येत नाही!


आम्ही पण गुन्हा करतो.
पण तो कबूल करण्याचा
गुन्हा मात्र कधीच करत
नाही! ह्यॅऽऽ ह्यॅऽऽ!


'लाख माणूस आहात'
असं परत म्हणू नका साहेब,
आयकरवाल्यांना कळलं
तर धाड घालतील माझ्यावर!
श्यामजोशी-

# साप्ताहिक माणूस


| | | | |
|---|---|---|---|
| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १७ ऑगस्ट | अंक : बारावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


**मुक्तिसंग्राम. . . .मुखपृष्ठावरून**

¤ महागडे कापड, चैनीच्या इतर वस्तू यावर बहिष्कार टाकणे,

–असे अनेक कार्यक्रम, उपक्रम १ ऑगस्टच्या मोर्चाने लोकासमोर यापूर्वी ठेवलेलेच आहेत. महाराष्ट्रात ठिकठिकाणी असे मोर्चे आता निघत आहेत, नवस्वदेशीचा, बहिष्काराचा विचारही फैलावत आहे. याला जोडूनच वर दिलेला एअरकंडिशनिंगविरोधी कार्यक्रमही सर्वत्र घेता येण्यासारखा आहे–विशेषत: पुण्यामुंबईत. त्यातही टप्प्याटप्प्याने जाता येईल. प्रथम सरकारी–निमसरकारी कचेऱ्या हे लक्ष्य असावे. नतर विलासी हॉटेलांचा नबर लावावा. अगदी शेवटी सिनेमागृहे वगैरे. कारण चार-पाच रुपये खर्चून झोपडपट्टीतला माणूसही कधी कधी या सुखसोयीचा, ऐशारामाचा लाभ याठिकाणी घेऊ शकतो. ही त्याची चैन आत्ताच त्याच्यापासून हिरावून घेण्याचे कारण नाही. उच्चभ्रूच्या वातानुकूलित खोल्या खाली झाल्यावर नतर सावकाश करता येण्यासारखे हे काम आहे.

गुजराथचा लढा केवळ भ्रष्टाचार आणि महागाईविरोधी होता. शिवाय तो ग्रामीण भागातही पोचू शकला नव्हता. बिहारने एक पाऊल आणखी पुढे टाकलेले आहे. बिहारमध्ये जयप्रकाशांची चळवळ ग्रामीण भागात पोचली आहे, शिवाय चळवळीचे उद्दिष्टही अधिक व्यापक झाले आहे. शिक्षणात क्राती, किडलेली शासनयंत्रणा बद पाडणे यासाठी बिहार पुढे सरसावला आहे. महाराष्ट्रानेही आता मागे राहू नये. लोकमान्याच्या वेळी बगाल आणि महाराष्ट्र एक झाले व त्यानी १९०८ साली स्वदेशी-बहिष्काराचे एक उग्र आदोलन उभे केले. आता महाराष्ट्राने बिहारशी आपले नाते जोडावे. किडलेली समाजव्यवस्थाच बदलण्याठी सर्व बाजूनी उठाव करावा. सर्वकश व चालू व्यवस्थेला मुळापासून शह देणारी चळवळ बिहारच्या मदतीने उभी करावी. स्वदेशी–बहिष्कार ही केवळ सुरुवात ठरावी. नवा मुक्तिसग्राम हे चळवळीचे अखेरचे उद्दिष्ट राहावे. मुक्तिसग्राम याचा अर्थ स्वच्छ आहे. अखेरच्या माणसाला हे राज्य आपले आहे, या राज्यात आपल्याला कामधाम मिळते, न्याय मिळतो, बरोबरीची समान वागणूक मिळते, विकासाची संधी मिळते असा अनुभव येणे हा मुक्तिसग्रामाचा खरा आशय आहे. हा आशय व्यक्त होईल असे छोटे मोठे उपक्रम सुरू व्हायला हवेत, जनतेने स्वयंस्फूर्तीने या उपक्रमांना साथ द्यायला हवी. तर हा सग्राम व्यापक होईल, लोकमान्यांच्या आणि गाधीजीच्या परंपरेत नवी भर पडेल. ही नवी भर टाकण्याची वेळ आता आलेली आहे. महाराष्ट्राने मागे राहू नये. मतभेद, पक्षभेद तात्पुरते बाजूस सारावेत. समान कार्यक्रम ठरवावेत. अधिकात अधिक लोकाना सहभागी करून घ्यावे. यश मिळते, प्रतिसाद लाभतो असा १ ऑगस्ट मोर्चाचा अनुभव आहे. ठिकठिकाणी आता हे लोण पोचायला हरकत नाही. कुणीही कुणाची वाट न पाहता, आदेशासाठी खोळबून न बसता उठावे. वेळ सोनेरी आहे, काळ कठिण असला तरी ! —श्री. ग. मा.

## ‘नायक्रोम’मधून कोकाकोला हद्दपार

एक ऑगस्टच्या मोर्चात मला भाग घेता आला नाही याबाबत खरोखरच खेद वाटतो. परंतु नुसत्या मोर्चाला येऊन काही भागायचे नाही तर त्याहीपेक्षा काहीतरी भरीव करावे अशी कल्पना. व्यक्तिश: मी व माझा व्यवसाय यांच्याकडून या बाबतीत काय करू शकू हा विचार केल्यावर माझ्या व्यवसायाच्या ठिकाणी आलेल्या पाहुण्यांना देण्यात येणारा कोकाकोला बंद करण्याचा निर्णय आम्ही ताबडतोब घेतला.

रमेश जोशी
नायक्रोम मेटल वर्क्स, पुणे

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० । दूरध्वनी ५७३५९

शतपावली

रवींद्र पिंगे

# जेव्हा लेखक सत्याचा कैवार घेतो–

गोष्ट अगदी साधी आहे.

एदलजी नावाच्या पारशी गृहस्थाने आपला धर्म बदलला. तो ख्रिश्चन झाला. विलायतेला गेला विलायतेत त्याने ख्रिस्ती धर्मशास्त्र वाचल. धर्मशास्त्राच्या परीक्षा दिल्या आणि बर्मिंगहॅमनजिकच्या ग्रेट रायली ह्या खाणमजुराच्या खेडेगावचा ख्रिश्चन धर्मोपदेश बनला. तो आजुबाजूच्या पचक्रोशीत पोथीपुराण करून ससार चालवू लागला. कालातराने त्याला पुत्रप्राप्तीही झाली. चिरजीवाचं नाव ठेवल जॉर्ज. जॉर्ज एदलजी !

हे चिरजीव जॉर्ज एदलजी वकिली शिकू लागले तेव्हा विसाव्या शतकाची पहाट नुकतीच फटफटली होती. ग्रेट रायली ह्या आपल्या चर्चच्या गावी बापलेक सुखेनैव व कालक्रमणा करू लागले. गावकरी ह्या बाटग्या धर्मगुरुला फार मोठा मान देत अस अजिबात नाही. पण त्याच्या कर्मकाडात काही विक्षेपही आणीत नसत. थोरले एदलजी चर्चच काम पहात आणि चिरजीव जॉर्ज गावातच राहून बर्मिंगहॅम विद्यापीठात एल्. एल्. बी. च्या टर्म्स भरीत. बापलेकाच एकूण छान चालल होत.

ह्या जॉर्जवर १९०३ साली मोठा चमत्कारीक आळ आला !

तो म्हणे वस्तऱ्याच्या सहाय्याने गावातल्या उपयुक्त जनावराच्या पोटावर खोल जखमा करीत असे ! रात्रीची सामसूम होऊन निजानीज झाली की ह्या जॉर्जमधला रानटी माणूस जागा होई; हातात वस्तऱ्याच पात घेऊन तो पिशाच्च्या सारखा घराबाहेर पडे. काळोखात भटके. घोडी आणि तट्टू बांधून ठेवलेल्या गावकऱ्यांच्या तबेल्यात प्रवेश करी आणि स्वस्थ करून पेंगत बसलेल्या त्या मुक्या जनावराच्या पोटावर वस्तऱ्याच्या पात्याने जखमा करून त्याना अकारण घायाळ करी आणि पाय न वाजवता पळ काढी ! गावकऱ्यांना पत्ताच लागत नसे की आला कोण नि गेला कोण ! त्यानी पहारे ठेऊन पाहिले, गस्त घातली, जागरण केली. पण रामा, शिवा, गोविंदा. एकीकडे, मुद्देमालासहीत कुणी हाती तर लागत नव्हताच आणि दुसरीकडे कामाच्या जनावरांवरले पाशवी अत्याचारही थांबत नव्हते, आज रात्री ह्याच्या घोड्याच्या फासळीला जखम आढळली, तर उद्या रात्री त्याच्या तट्टाच्या पोटातून रक्ताची धार वाहिली, अस रोजच्या रोज घडत होत.

शेवटी गुप्त पोलिसाचे पहारे बसले, त्यानी एदलजीच्या मठावर धाड टाकली आणि कायद्याचा अभ्यास करणाऱ्या चिरजीव जॉर्जला गिरफ्दार केल. खाणकामगाराच्या गरीब मुक्या जनावरांना शस्त्राच्या सहाय्याने रात्रीच्या अधाराचा फायदा घेऊन नाहक घायाळ करण्याचा त्याच्यावर आरोप ठेवला. मात्र, एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ते अघोरी कृत्य करतानाच जॉर्जला मुद्देमालासहीत हातोहात पकडला अस घडल नाही. गावकऱ्याना जॉर्जचा सशय आला; पोलिसानी छापा टाकला आणि सशयाला पुष्टी मिळावी अशी हत्यार आणि इतर अनुषंगीक गोष्टी जॉर्जच्या खोलीत आढळल्या म्हणून जॉर्जच्या मुसक्या बांधण्यात आल्या.

जॉर्जच्या शयनगृहात पोलिसांना काय काय आढळल ?

रक्ताचे डाग लागलेल वस्तऱ्याच एक पात.

दवाने भिजलेल अगातलं जाकीट.

त्या जाकिटाला डकलेले घोड्याचे केस.

ओला चिखल उडालेली पँट.

चिखलाने बरबटलेले बूट.

एवढ्या पुराव्यावरून पोलिसानी तर्क बांधका की, मध्यरात्रीच्या काळोखातून चिखल तुडवीत जॉर्ज निघे. दवात चिंब होई. तबेल्यात प्रवेश करी. तिथल्या बेसावध जनावरांना वस्तऱ्याच्या पात्याने घायाळ करी. त्या झोबाझोबीत त्याच्या जाकिटाला जनावराचे केस डकत आणि वर भरभक्कम पुरावा म्हणून की काय रक्ताळलेल्या वस्तऱ्याच्या पात्याच्या जोडीला पोलिसाना असही आढळून आलं की, अत्याचाराच्या जागी उमटलेल्या बुटाच्या ठशाशी जॉर्जच्या बुटाचा आकार बिलकूल मिळता जुळता होता !

इतक्या बाबी जुळल्यानतर गुन्ह्याची अधिक शहानिशा करण्याची आवश्यकता पोलीसखात्याला वाटली नाही. खटला न्यायप्रविष्ट झाला आणि न्यायाधिशानी विद्यार्थी जॉर्ज ह्याला विकृत हत्त्येच्या गुन्ह्याबद्दल सात वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. गावकरी तर जॉर्जवर इतके खवळले होते की, शिक्षा भोगण्यासाठी बेड्या घातलेल्या जॉर्जला तुरुगात नेत असताना वाटेत लोकांनी जॉर्जवर धावत्या वगीत हल्ला करून पिटून काढलं !

जॉर्जने न्यायालयात गुन्हा सपशेल नाकबूल केला होता. ज्या विशिष्ट रात्री जॉर्जने जनावर जखमी केल्याचा पोलिसानी दावा लावला होता, त्या रात्री तर आपण परगावी गेलो होतो अस जॉर्जचं म्हणण होतं. एदलजीने परोपरीने सांगितल की, ते बापलेक नेहमीच एका खोलीत झोपत असत आणि जॉर्ज कधीही रात्री उठत नसे. पण पोलिसानी एदलजीच्या म्हणण्याकडं दुर्लक्ष केलं. इतकच नव्हे, तर जॉर्जला आपली बाजू माडण्याची सधीसुद्धा दिली नाही. न्यायालयानेही एकतर्फीच निकाल जाहीर करून जॉर्जला खडी फोडायला कारागृहात धाडलं. सत्तेपुढे शहाणपण चालवू न शकलेला अवाक् जॉर्ज तुरुगातल यातनामय जीवन हताशपणे जगू लागला.

ह्या प्रकरणात आरोपीला आपली बाजू कोर्टापुढे मांडण्याची संधी देण्यात न आल्यामुळे खुद्द न्यायबुद्धीचीच गळचेपी झाली आहे आणि आम्ही त्याबद्दल न्यायालयाचा निषेध करीत आहोत, असं पत्रक काही जागरूक मंडळींनी काढलं. त्याच्यावर दहा हजार सुबुद्ध नागरिकांच्या सह्या घेऊन ते सरकारात पोहोचवलं. पण सरकारने दाद दिली नाही. जॉर्जच्या प्रारब्धातला अंधार चुकला नाही.

जॉर्जने अशी तीन वर्षे खडी फोडली आणि कुठलेही कारण अगर सबब न सांगता तीन वर्षांनंतर तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी जॉर्जला एकाएकी तुरुंगातून सोडून दिलं! सात वर्षाच्या एकूण शिक्षेत चार वर्षांची माफी जॉर्जला का मिळाली हे कुणीच सांगेना. सरकारसुद्धा!

हे सर्व चमत्कारिक प्रकरण प्रसिद्ध रहस्यकथालेखक सर आॅर्थर कॉनन डॉईल याने लक्षपूर्वक वाचलं. त्याची खात्री झाली की ह्यात काहीतरी काळंबेरं आहे; पोलिसांनी जॉर्जला नाहक बळी दिला आहे आणि जॉर्ज पूर्णपणे निर्दोष आहे. एकदा खात्री पटल्यावर हे प्रकरण धसाला लावायचा कॉनन डॉईलने विडा उचलला. त्याने प्रथम वर्तमानपत्रात पत्रं लिहून जाहीर केलं की, क्रूरकर्मासाठी जॉर्जला जरी कारावासात डांबण्यात आलेलं होतं तरी गरीब जनावरांवरचे हल्ले त्यानंतर अजिबात थांबलेले नव्हते. ते चालूच राहिले होते! त्या अर्थी जॉर्ज एकटाच हे अघोर कर्म करीत होता असं शाबीत झालेलं नव्हतं. त्यावर पोलिसांनी लिहिलं की, जॉर्जची एखादी टोळी होती, असणार आणि त्या टोळीचे चाळे चालू होते, असणार. मात्र पोलीस त्या तथाकथित टोळीतल्या एकालाही पकडू शकले नव्हते! कॉनन डॉईलने हेका धरला की, पोलिसांनी एक तर टोळी आहे हे सिद्ध करावं, किंवा जॉर्जवरचे आरोप मागे घेऊन तो निर्दोष असल्याचं जाहीर करावं.

न्यायालयाने, पोलीसखात्याने आणि सरकारने आळीमिळी गूपचिळी ठेवली.

मग कॉनन डॉईलने दाखवून दिलं की, पोलिसांनी रक्ताळलेलं म्हणून जे वस्त्याचं पातं पकडलं होतं, ते रक्ताळलेलं अजिबातच नव्हतं, तर ते नुसतं गंजलेलं पातं होतं! जॉर्जचं जे जाकीट दवांत भिजलेलं म्हणून पुराव्यासाठी पुढे केलं होतं, ते जॉर्जची धरपकड व्हायच्या आदल्या रात्री पडलेल्या पावसात भिजलेलं होतं आणि त्याला चिकटलेले केस घोड्याचेच असले तरी ते शेपटीचे होते. पोलिसांच्या म्हणण्याप्रमाणे जॉर्जने जर प्राण्यांच्या पोटाजवळ झोंबाझोंबी केली असेल, तर पोटाकडचे आखूड आणि मऊ लवेसारखे केस जाकिटाला चिकटायला हवे होते नि ते तर जाकिटाला अजिबात लागलेले नव्हते. तेव्हा जनावरांच्या शेपटीचे केस कापून जॉर्जच्या जाकिटाला चिकटवणं हे काम खुद्द पोलिसांचंच होतं! आणि त्याच्या तुमानीला लागलेल्या चिखलाचा रंग आणि तबेल्यातल्या मातीचा रंग एक नव्हता! इतकंच नव्हे, तर घोड्यांच्या पोटांना ज्या जखमा झाल्या होत्या त्या वस्त्याच्या नव्हे तर खिळ्यासारख्या रुपणाऱ्या टोकदार शस्त्राच्या होत्या.


ppb

**धी परशुराम पेपर अँड बोर्ड मॅन्यु. कंपनी लिमिटेड**

**रजिस्टर्ड ऑफिस :**

'भावना', ४२२, वीर सावरकर मार्ग
प्रभादेवी, मुंबई ४०००२५
टेलिफोन : ४५४०६३.

**फॅक्टरी :**

खेर्डी, चिपळूण
जिल्हा : रत्नागिरी
टेलिफोन : १५३

तात्पर्य, कॉनन डॉईलच्या मते पोलिसांनी जॉर्जवर निष्कारण आरोप ठेवून आपली बाजू मांडण्याचा त्याचा हक्क गुंडाळून ठेवला आणि त्याला तीन वर्षं सजा भोगायला लावून न्यायदेवतेचा घोर अपमान केला होता. पण सरकार ढीम करीना. म्हणून कॉनन डॉईलने हे प्रकरण पंतप्रधानाकडे स्वतः नेऊन पोचवलं. ग्लॅडस्टन पंतप्रधान होता. त्यानेसुद्धा कानावर हात ठेवले. शेवटी कॉनन डॉईलने स्वतःच जाहीर केलं की, जुलूमी न्यायसत्तेपुढे पंगू ठरलेला जॉर्ज पूर्णपणे निर्दोष आहे; निष्कलंक आहे.

आणि जॉर्जवरचा सर्व कलंक धुवून निघावा म्हणून सत्याचा कैवार घेणाऱ्या कॉनन डॉईलने जॉर्जला आपल्या घरी आपल्या दुसऱ्या लग्नाच्या खास मेजवानीला बोलावून घेतलं. निष्कलंक जॉर्जला हा सर्वोच्च मान लाभला आहे अशीच सर्वांची खात्री झाली.

आता ज्याच्या घरी पंगतीचा लाभ आग्रहपूर्वक मिळणं ही तत्कालीन इंग्रज समाजात प्रतिष्ठेची बाब समजली जात होती त्या रहस्यकथाकार सर कॉनन डॉईलचा थोडा इतिहास-भूगोल :–

सन अठराशे एकूणसाठ साली वास्तुशिल्पज्ञाच्या पोटी स्कॉटलंडमध्ये जन्म. केवळ आईच्या इच्छेमुळे डॉक्टरकीची परीक्षा दिली. मन त्यात नव्हतं. पेशंटही मिळेनात. पहिला पेशंट मिळाला नि औषध घेऊन मेला ! म्हणून त्याच्या बहिणीकडे दुखवटा काढायला गेला. तिची ओळख, पुढे अगंतुक भेटी-गाठी, त्यातून प्रेमाचा जन्म. लग्न. मुलीचा जन्म. परंतु पेशंट नाहीत ते नाहीतच ! फजिती. रिकाम्या दवाखान्यात वेळ जावा म्हणून फालतू कथालेखन सुरू. शर्लोक होम्स ह्या काल्पनिक गुप्तहेराच्या व्यक्तिरेखेचा जन्म. परंतु वाचकांकडून प्रतिसाद शून्य !

निराशा. निराशा.

तेहतीसाव्या वर्षी लेखक म्हणून दैव उजाडलं. STRAND मासिकाने चक्क पन्नास पौंड मानधन देऊन पहिली रहस्यकथा छापली. वाचकांना आवडली. संपादकांनी आणखी कथा मागितल्या.

मागणी तसा पुरवठा. त्यातून उत्तम बरकत. दवाखान्याचा उपयोग फक्त लेखनासाठी ! फक्त लेखनावर जगण्याची प्रतिज्ञा.

एक दुर्दैवाची घटना. पैसे मिळायला नि बायकोला क्षयाची भावना व्हायला एक गाठ. तिची प्रकृती सुधारावी म्हणून हवापालटाला प्रारंभ.

अमेरिका. स्वित्झर्लंड. इजिप्त.

भ्रमंतीमध्ये सपाटून लेखन. अमेरिकेत रूडयार्ड किपलिंगच्या भेटीने प्रभावीत. राष्ट्रोद्धार हेच लेखकाचं अवतारकृत्य हे किपलिंगच्या उदाहरणावरून पटलं. जगात श्रेष्ठ राष्ट्रोद्धारकर्ते लेखक फक्त दोन : किपलिंग आणि आपण स्वतः, ह्याबद्दल एकदम निःशंक !

ह्या नवा साक्षात्कार झाल्यामुळे दोन पातळ्यांवर लेखन. उदरंभरणासाठी 'शर्लोक होम्स' ह्या पात्रासभोवती गुंफलेल्या गुप्तहेरकथा; राष्ट्रोद्धारासाठी इतिहासातल्या तेजस्वी कालखंडावर ऐतिहासिक कादंबऱ्या.

वाचक गुप्तहेरकथांवर लट्टू. लेखक मात्र स्वतःच्या ऐतिहासिक कादबऱ्यांवर खूश. त्यांची सतत तरफदारी. वाचकांचे नम्र दुमत.

गुप्तहेरकथांवर मिळालेल्या पैशातून इंग्लंडमध्ये चाळिशीच्या उंबरठ्यावर स्वतःचा बंगला बांधला. तिथे क्षयी पत्नीची मनःपूर्वक सेवा.

त्याच बंगल्यात नव्या गुप्त प्रेमप्रकरणाचा उदय. लेखकपत्नीची विचारपूस करायला जीन सहजगत्या आली. जाताना वेळ घालवायला लेखकाचं गोष्टीचं पुस्तक घेऊन गेली आणि वाचून परतली ती लेखकाबद्दल हृदयात आदर, आश्चर्य, प्रेम वगैरे अमाप भावना घेऊन !

प्रेमाची ओळख पटली.

संभ्रम. आजारी पत्नीच्या मनाला यातना द्यायच्या नाहीत हे उभयपक्षी नक्की झालं.

दक्षिण आफ्रिकेतल्या युद्धभूमीवर लेखक महाशय डॉक्टर म्हणून रवाना ! बोअर युद्धात घायाळ सैनिकांची सेवा. नवा अनुभव.

सरकारकडून रुग्णसेवेबद्दल सन्मान.

सर्वत्र जयजयकार.

'अरे, माझ्या रहस्यकथा वाचून वेळ कशाला दवडता ? त्यापेक्षा माझ्या ऐतिहासिक कादंबऱ्या वाचा. त्या स्फूर्तीदायक आहेत.'

'महाशय, रहस्यकथा लिहा – आणखी रहस्यकथा लिहा. त्या तुमच्या ऐतिहासिक कादंबऱ्या वाचवत नाहीत हो !'

राष्ट्रोद्धार करण्यासाठी लोकसभेची निवडणूक लढविली.

फज्जा उडाला.

पुन्हा दुसऱ्यांदा निवडणुकीसाठी दंड थोपटून उभा.

पुन्हा जोरदार आपटी.

कानाला खडा लावला की लोकसभा वगैरे आपल्यासाठी नाही ! आपण फक्त लिहायचं; लिहीत रहायचं.

अमेरिकेतून रहस्यकथांना जोरदार मागणी. प्रत्येक कथेचा मोबदला पाच हजार डॉलर्स !

आनंदीआनंद.

क्षयी पत्नीचे निधन.

अठ्ठेचाळीसाव्या वर्षी जीन प्रेमळ पत्नी म्हणून जीवनात आली. हे त्याचं दुसरं लग्न. ह्या लग्नाच्या मेजवानीला निवडक आमंत्रितात सन्माननीय पाहुणा म्हणून जॉर्ज एदलजीला आमंत्रण गेलं. त्याचा बहुमान झाला.

इंग्लंड–अमेरिकेतल्या सर्वात लोकप्रिय लेखकाच्या पंगतीला जेवण्याचं आमंत्रण ज्या अर्थी जॉर्जला आलं, त्याअर्थी तो निष्कलंकच असला पाहिजे अशी खूणगाठ इंग्रज समाजाने मारली.

जॉर्जचं काम झालं. सर ऑर्थर कॉनन डॉईलचे श्रम सार्थकी लागले.

☐ ☐



RAAS/DM/006 MAR


# भविष्य वाचनात गम्मत असते-

## विशेषतः भविष्यकालातील आपली सुबत्ता अजमावण्यात!

मिळकतीला खर्चाचे तोंड लागण्यापूर्वीच त्यांतून थोडीशी रक्कम—मिळकतीच्या साधारण १० टक्के—बाजूला काढून बँक ऑफ इंडियात नियमितपणे बचत केली म्हणजे आपल्या वाढत्या सुबत्तेने कधी कधी आपणच चकित होतो.

अतिशय आकर्षक बचत योजनांसाठी बँक ऑफ इंडिया प्रसिद्ध आहे. साध्या सेव्हींग्ज् बँक अकाउंट पासून ते रिकरिंग डिपॉझिट, टर्म डिपॉझिट पर्यन्त अनेक योजना यात आहेत.

आणि आमची नवी, दरमहा व्याज देणारी योजना, मंथली इन्कम सर्टिफिकेटस् तर फारच लोकप्रिय आहे.




भविष्यकालातील सुबत्तेसाठी

**बँक ऑफ इंडिया**

# निक्सनचा राजकीय अस्त

वा. दा. रानडे

वॉटरगेट प्रकरणी देशभर बदनाम झालेले निक्सन शेवटपर्यंत अधिकारावर राहण्याची भाषा बोलत होते पण स्वपक्षीयच मोठ्या संख्येने उलटले आणि सिनेटपुढे आपली चौकशी व अध्यक्षपदावरून आपली हकालपट्टी टळत नाही हे स्पष्ट दिसू लागल्यावर राजिनामा देणे त्याना भाग पडले. अमेरिकेच्या इतिहासात एवढा बदनाम आणि अवमानित झालेला हा पहिलाच अध्यक्ष. अध्यक्षीय मुदतीच्या काळात अध्यक्षाचा मृत्यू झाला तर अमेरिकन घटनेप्रमाणे उपाध्यक्ष त्याच्या जागी येतो. पण अध्यक्षाने राजिनामा दिल्याने उपाध्यक्षास अध्यक्षपदाची सूत्रे घ्यावी लागावी हा अमेरिकेच्या इतिहासातील पहिलाच प्रसग आहे.

निक्सन यांना राजिनामा द्यावा लागला याबद्दल कोणालाही हळहळ किंवा सहानुभूती वाटली नाही. कारण हळहळ वाटावी असे या घटनेत काही नव्हते. उलट या साऱ्या प्रकरणाबद्दल सच्च्या लोकशाही प्रेमी नागरिकाना घृणा वाटत होती, चीड वाटत होती. धोरणविषयक मतभेद होऊन विशिष्ट तत्वासाठी निक्सन यानी राजिनामा दिला असता तर त्यांच्याबद्दल सहानुभूती निर्माण झाली असती पण येथे तसे काही घडलेले नव्हते.

वॉटरगेट प्रकरणात निक्सन यांचे जे दर्शन घडते ते सत्तेवर टिकून राहण्यासाठी वाटेल त्या मार्गांचा अवलब करणाऱ्या सत्ताकांक्षी नेत्याचे. १९७२ च्या निवडणुकीतील निक्सन यांना पुन: निवडून आणण्याच्या मोहिमेसाठी अध्यक्ष फेरनिवड समिती १९७१ मध्ये स्थापन करण्यात आली होती. निक्सन याना निवडून आणण्यासाठी या समितीने अनेक बेकायदा आक्षेपार्ह व अयोग्य मार्गांचा अवलब केला. आपल्याला निवडून यायचे असेल तर प्रतिस्पर्धी उमेदवार आपल्याला तुल्यबळ असा उभा केला जाऊ नये येथपासून आपल्या निवडणूक मोहिमेची सुरुवात त्यानी केली. सिनेटर एडवर्ड केनेडी आणि सिनेटर एडमड मस्की हे त्यांना दोन तुल्यबळ प्रतिस्पर्धी वाटत होते. केनेडीच्या अपघात प्रकरणाचा फायदा घेऊन त्याच्याविरुद्ध विपर्यस्त प्रचाराचा प्रयत्न फेरनिवड समितीचे हस्तकानी केला. मस्कीच्या हालचालीवर पाळत ठेऊन त्याच्याविरुद्ध प्रचाराला उपयोगी पडेल अशी माहिती काढण्यासाठी एका माणसाला दरमहा एक हजार डॉलर देण्यात येत होते. निक्सन यांचे उद्देश साध्य झाले. हे दोन्ही उमेदवार स्पर्धेतून गळाले आणि डेमोक्रॅटिक पक्षाने मॅकगव्हर्न यांना उमेदवार निवडले. त्याच्याविरुद्ध निवडणूक जिंकणे निक्सनना सोपे होते. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर मोहीम करण्याचीही वास्तविक आवश्यकता नव्हती. पण आपल्या पक्षाच्या ध्येय-धोरणावर भर देणारी साधी, सरळ प्रचार मोहीम निक्सन आखते तर ते निक्सन कसले ?

निक्सन फेरनिवड समिती प्रतिस्पर्धी पक्षांच्या नेत्यांविरुद्ध विपर्यस्त प्रचार करूनच थांबली नाही तर त्या पक्षाच्या निवडणूक मोहिमेच्या योजना आपणास कळाव्यात यासाठी वॉशिंग्टनमधील वॉटरगेट येथील डेमोक्रेटिक पक्षाच्या नॅशनल कमिटीची मुख्य कचेरी या समितीच्या हस्तकानी फोडली. (१७ जून १९७२). तेव्हापासून गेली दोन वर्षे 'वॉटरगेट' शब्द अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणात गाजत आहे. प्रत्यक्ष वॉटरगेट घरफोडी हा एक गुन्हा तर त्यावर पाघरूण घालण्यासाठी आरोपीना पैसे चारून गप्प बसविणे आणि निक्सनचा व व्हाइट हाऊस अधिकाऱ्याचा या प्रकरणाशी काही सबंध नव्हता ही खरी गोष्ट दडविणे हा दुसरा गुन्हा फेरनिवड समितीच्या हस्तकांनी केला. हे प्रकरण दडपले जात आहे याची आपणास माहिती होती याची कबुली निक्सन यानीही शेवटी दिली.

भ्रष्टाचार, हेरगिरी, खोटेपणा, बनवाबनवी, लोक विकत घेण्यासाठी पैशाचा वापर, अधिकारपदाचा दुरुपयोग या सर्व गुन्ह्याचा समुच्चय म्हणजे 'वॉटरगेट.' वॉटरगेट म्हटले की, हे सारे गुन्हे एकत्रित डोळ्यापुढे येतात. एका शब्दातून इतके सारे गुन्हे सूचित करणारा दुसरा शब्द आढळणार नाही.

राजिनाम्याचा निर्णय जाहीर करताना निक्सन यानी जे पधरा मिनिटाचे भाषण केले त्यातही आपल्या चुकाबद्दल व अपराधाबद्दल त्याना खत किंवा खेद वाटल्याचे दिसले नाही. 'निर्णय घेताना माझ्या हातून काही चुका झाल्या असतील, पण हे निर्णय घेताना राष्ट्राचे सर्वोच्च हितच माझ्या डोळ्यापुढे होते.' हे निक्सन यांचे समर्थन पटणारे नाही. 'राष्ट्राचे सर्वोच्च हित' यासारख्या पोकळ शब्दानी कोणी फसणार नाही. हे हित निक्सन याच्या डोळ्यापुढे खरोखरच असते तर त्याना राजिनामा देण्याची नामुश्कीची वेळ आलीच नसती. त्यानी जे काही केले ते आपली सत्ता टिकविण्याच्या हेतूनेच केले. निक्सन याचा राजिनामा म्हणजे त्याचा राजकीय अस्त आहे.

वॉटरगेट प्रकरण म्हणजे अमेरिकन लोकशाहीला लागलेली कीड होती. पण वृत्तपत्रे, न्यायालये आणि जागरूक लोकप्रतिनिधी यानी ही कीड नष्ट करून अमेरिकन लोकशाहीचे सामर्थ्य पुन्हा प्रस्थापित केले असे म्हटले जाते ते कितपत खरे आहे? वॉटरगेट सपले म्हणजे अमेरिकन राजकीय जीवनातील भ्रष्टाचार सपला नाही. निवडणुकीत प्रचड प्रमाणावर केला जाणारा खर्च ही पाश्चात्य भाडवलशाही लोकशाहीस लागलेली कीड नसून हा कॅन्सर आहे पैशाचा हा अमाप वापर थाबत नाही तोपर्यंत लोकशाहीला प्रत्यक्षात धनिकशाहीचेच स्वरूप येणार आणि वॉटरगेटसारखे प्रकार कमी अधिक प्रमाणात चालूच राहणार. फारच मोठ्या प्रमाणावर हे प्रकार घडले म्हणून वॉटरगेट गाजले. पण अमेरिकन निवडणुकातून असे प्रकार पूर्वीही थोड्या फार प्रमाणात चालत आलेले आहेत पैशाच्या या अमाप वापराचे लोण पाश्चात्य लोकशाही पद्धतीचा स्वीकार केलेल्या सर्वच देशात येत आहे. जपानमध्ये नुकत्याच झालेल्या निवडणुकात प्रचड प्रमाणावर खर्च करण्यात आला. भारतातही हे लोण आले आहे. सामान्य कार्यकर्त्याला निवडणुका लढविणे व जिकणे अशक्य झाले आहे. लोकशाहीला पैशाच्या मगरमिठीतून कसे वाचवायचे हा आपल्यापुढील खरा प्रश्न आहे. यावर आपण उत्तर शोधू शकलो नाही तर लोकशाहीवरचा लोकाचा विश्वास उडून ते हुकूमशाहीकडे झुकू लागतील. □

# ग्रामायन

## मेळावा : २७, २८ जुलै

बिहारमधील जयप्रकाशाचे प्रभावी आंदोलन. त्याचे देशभर सर्वत्र उमटणारे प्रतिसाद. असतुष्ट जनतेचे एक दिशा सापडल्यामुळे जागोजाग उत्स्फूर्तपणे होऊ लागलेले सघटन. एवढेच नव्हे तर शासनही हादरलेले. प्रमुख शहरी भ्रष्टाचारी लोकांवर धाडी. तत्पूर्वी राष्ट्रपतीचे एकापाठोपाठ निघालेले वटहुकूम. आणि आता कृषी उत्पादनवाढीसाठी पतप्रधानांनी दोन-तीन राज्यातून केलेले झझावाती दोरे. त्यामुळे सतर्क झालेली राज्यशासने

या सर्व वेगाने घडणाऱ्या गोष्टी कशाच्या निदर्शक आहेत ? जनतेचा असतोष, राज्यकर्त्यांचा भ्रष्ट गलथानपणा, विरोधकाचे सातत्यपूर्ण अपयश या सर्वच गोष्टी आज कळसास पोचल्या आहेत. आणि या सर्व परिस्थितीच्या रेटयामुळे का होईना, स्वातत्र्यानतर सतत २७ वर्षे दुर्लक्षिली गेलेली राष्ट्रउभारणीची प्रक्रिया आता सुरू होऊ पहात आहे असा आशावादी निष्कर्ष यातून काढण्यास काय हरकत आहे ?

इतराच्या दृष्टीने या प्रश्नाचे उत्तर काहीही असो. ग्रामायन परिवाराचे उत्तर मात्र नक्कीच आशावादी आहे. ग्रामायन परिवारात आहेत राष्ट्रउभारणीचे महत्त्व ओळखून या आधीच काही वर्षे कामाला लागलेली परतु आजवर परिस्थितीशी एकाकीपणे झुजणारी कार्यकर्ती माणसे. आज या माणसाना एक नवा उत्साह प्राप्त झाला आहे. 'ग्रामायन'च्या रूपाने ही सर्व एकाकी माणसे आता एकदिलाने उभी आहेत हे राष्ट्रउभारणीच्या प्रक्रियेचे आव्हान पेलण्यासाठी. ग्रामायनचा प्रयत्न अपुरा असेल, ताकद कमी असेल. पण या गोधळाच्या परिस्थितीत ग्रामायनने अचूक दिशेचा वेध घेतला आहे. आणि त्यामुळेच ग्रामायन आज एक अणुकेंद्र (न्युक्लिअस) होऊ पहात आहे.

याचे प्रत्यंतर नुकत्याच पार पडलेल्या 'ग्रामायन'च्या दुसऱ्या मेळाव्यात आले. (पहिला मेळावा १२,१३ जानेवारी १९७४)

दि. २७,२८ जुलैला ग्रामायनने महाराष्ट्रातील विविध ग्रामीण विकास कार्यकर्त्यांचा हा मेळावा आयोजित केला होता. मेळाव्यास दोन्ही दिवस १००।१२५ कार्यकर्ते उपस्थित होते. यातील निम्म्याहून अधिक परगावहून आलेले होते. यात सर्व विचाराचे समाजसेवक होते, शेतकरी होते, वकील, डॉक्टर, तत्रज्ञ, उद्योग प्रवर्तक होते, लेखक, प्राध्यापक होते; सरकारी अधिकारी व बँक अधिकारीही होते. अशी ही सर्व थरांमधील माणसे प्रामुख्याने केवळ पत्रव्यवहाराच्या सपर्काने उपस्थित झाली होती हे विशष.

'ग्रामायन'चे अध्यक्ष प्रा. व. द. देशपाडे याच्या प्राथमिक निवेदनाने मेळाव्याच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. उद्घाटनाचा औपचारिक समारभ करण्यास इथे कुणालाच वेळ नव्हता. ग्रामायनने गेल्या सहा महिन्यात काय केले या विषयीचे हे निवेदन होते. गेले सहा महिने सस्थेचे कामकाज नियमितपणे चालू असल्याची साक्ष आज भरलेला मेळावाच देत होता. याशिवाय केव्हाही सहकार्य देण्यास तयार असलेल्या तज्ञ मडळीशी ग्रामायनने साधलेला सपर्क, काही प्रकल्पांची तेथील प्रश्न समजावून घेण्याच्या दृष्टीने तज्ञाना बरोबर घेऊन केलेली पाहाणी, काही प्रकल्पाना पुरविलेली आवश्यक माहिती इ. गोष्टीचे निवेदन त्यांनी केले. एक मूलभूत महत्त्वाचे काम म्हणून महाराष्ट्रातील विविध रचनात्मक प्रकल्पांच्या साद्यत माहितीचे सकलन करण्याचे काम ग्रामायनने हाती घेतल्याच त्यांनी सागितले.

यानतर सुरू झाली एक जिवंत, अनुभवदायी अर्थपूर्ण चर्चा. प्रकल्प कार्यकर्त्यांनी आपले अनुभव, आपल्या पुढील योजना व अडचणी सागून त्या अनुषगाने ग्रामायनकडून आपल्याला कोणत्या स्वरुपाच्या मदतीची आवश्यकता आहे, त्यासाठी ग्रामायन या सस्थेचे किंवा चळवळीचे स्वरूप काय असावे असा एकूण चर्चेचा विषय.

सातारा जिल्ह्यातील दहिवडीचे तरुण अॅडव्होकेट श्री. हिरवे यानी प्रथम आपला अनुभव सांगितला त्याच्या पावसाचे मान कमी असलेल्या व ओसाड जमीन बरीच असलेल्या भागात शेतीपेक्षा मेंढपाळीचा धदा जास्त फायदेशीर होईल हे त्याचे निरीक्षण. म्हणून लोकर-उद्योगाची योजना तयार करून त्यांनी राज्यसरकार, बँका, विकास महामडळे अशा अनेक ठिकाणी योजना पाठवून आर्थिक मदत मिळविण्यासाठी खटपट केली. पग ते शक्य झाले नाही. त्यानी अजून उमेद सोडलेली नाही व यासाठीच ते ग्रामायनकडे आले असल्याचे त्यांनी सागितले.

यानतर रायगड परिसरातील निराधार निवृत्त जवानांसाठी धडपडणारे साताऱचे श्री. पुरुषोत्तम सेठ बोलले. सैनिकपेशाची शिवकालीन परपरा असलेले या भागातील जवान आजही तीच परपरा चालवीत आहेत. परतु युद्धात जखमी होऊन अनफीट झालेले ३५ वर्षांवरील हे निवृत्त जवान आज कसे परिस्थितीच्या कोडीत सापडले आहेत हे त्यानी सागितले. सरकारने व बँकानी आवश्यक ते सहाय्य या जवानाना दिले तर केवळ या जवानाचाच प्रश्न सुटेल असे नाही, तर परिसरातील अनेक खेडयाचा व हजारो एकर जमिनीचा विकास घडून येऊ शकेल असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

युक्रादचे अरुण लिमये, विज्ञरचे रायरीकर, पुण्याचे हरिभाऊ गद्रे, बळिराजा मासिकाचे सपादक श्री. भोसले, व्हि. वी. साळुके इत्यादिकांनी घायपात उद्योगाविषयीही बरीच चर्चा केली.

घायपात उद्योगाविषयी काही महत्त्वपूर्ण माहिती सागताना श्री. साळुके म्हणाले, महाराष्ट्रातून २ कोटीचा घायपात कलकत्त्यास जातो व परत मुबईत त्याचा तयार माल विकण्यास येतो परदेशातून ७ कोटीचा उच्च प्रतीचा घायपात आयात केला जातो. हा सिस्लामा जातीचा उच्च प्रतीचा घायपात लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

श्री. साळुखे पुरदर परिसरात विकासाचे काम करतात आपले कार्य व अनुभव सागून त्यानी अशी सूचना केली की घायपात, मेंढी पालन, पोल्ट्री, डेअरी अशा उद्योगासाठी आवश्यक ती माहिती काही समाजसेवेसाठी उत्सुक असलेले कार्यकर्ते व तज्ञ यांच्या सहाय्याने गोळा करून बँकांशी दुवा साधावा.

दुष्काळी परिस्थितीत वैद्यकीय मदतीची महत्त्वपूर्ण कामगिरी लातूरच्या विवेकानद

हॉस्पिटलचे डॉ. रा. कृ. अलूरकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी खेडोपाडी बजावली आहे. दारिद्र्याचे विदारक दर्शन त्यांना यावेळी घडले व त्यातूनच हे काम येथेच न थांबवता विविध अंगांनी पुढे चालविण्याची स्फूर्ती मिळाल्याचे त्यांनी सांगितले. गावातील स्थानिक लोकांनी पुढाकार घेतल्याशिवाय कोणतेही सामाजिक काम होऊ शकत नाही, म्हणून लोकांमध्ये स्वतः पुढे येऊन काम करण्याची वृत्ती निर्माण करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

सांगली परिसरात सिनेमा थिएटरचा व्यवसाय करणारे परंतु मूळचे हरडगावचे श्री. चाफळकर यांना स्वतःची जमीन सुधारताना संपूर्ण गावाची जमीन सुधारण्याची स्फूर्ती झाली व त्यातून वडिलांच्या नावाचा ट्रस्ट स्थापन करून त्याद्वारे आजपर्यंत गावाचा व परिसराचा योजनाबद्ध विकास सांगली रोटरी क्लबच्या सहाय्याने त्यांनी घडवून आणल्याचे सांगितले.

दामखिंड-कोंढाण परिसरात आदिवासींसाठी, शास्त्र व शिस्त या दोन गोष्टींची कास धरून विलक्षण जिद्दीने काम करणारे शेती व डेअरी तज्ञ श्री. आबा करमरकर यांनी आदिवासींचे भयानक दारिद्र्य मोजक्या शब्दात डोळ्यापुढे उभे केले. आदिवासींची पत वाढविण्याची जबाबदारी आमची आहे हे समजून आम्ही काम करतो असे त्यांनी सांगितले. ग्रामायन हे कार्यकर्त्यांच्या अडचणी व विचार प्रसृत करणारे एक व्यासपीठ असावे अशी सूचना त्यांनी केली.

नांदेडचे सुशिक्षित तरुण पदवीधर कार्यकर्ते श्री. विठ्ठलराव जाधव हे नोकरी सोडून खेड्यात गेले व 'कृषी सेवा केंद्रा' मार्फत त्यांनी विकासाचे काम सुरू केले. त्यांच्या कामाचा विस्तार उपस्थितांना खूपच जाणवला

भंगी काम करून त्यावर उत्कृष्ट शेती पिकविणारे व कातडी कमावण्याचा व्यवसाय करणारे दापोलीचे 'नर्कतीर्थ' श्री. बाबा फाटक यांनी आपले अस्सल अनुभव सांगून सर्वांनाच थक्क केले. तर पोलादपूरचे B. D. O. श्री. ना. रा. गुजर यांनी सरकारी कामातील अनागोंदीचे व नियोजन शून्यतेचे विलक्षण किस्से सांगून सगळ्यांची थोडी करमणूक केली. परंतु त्याबरोबरच नियोजनाचा खरा अर्थ व महत्त्व लोकांना पटविण्यासाठी लोकशिक्षणाचे महत्त्वाचे काम ग्रामायनने करावे अशी सूचनाही त्यांनी केली.

सुंदर गव्हाणे या औरंगाबादच्या युवकाने मोठ्या योजनांची फळे छोट्या शेतकऱ्यांपर्यंत पोचत नाहीत, लहान शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांच्या घशात चालल्या आहेत ही व्यथा मांडून सर्वांचे लक्ष वेधले व ग्रामायन यासाठी सक्रीय, प्रसंगी संघर्षात्मकही सहाय्य करू शकणार आहे का, असा सवाल टाकला.

शहाद्यातील आदिवासी चळवळीस पूर्ण वेळ देऊन काम करणारा पुण्याचा पदवीधर तरुण कार्यकर्ता अशोक मनोहर याने शहादे येथील चळवळीची साद्यंत माहिती प्रभावीपणे निवेदन करून कार्यकर्त्या श्रोत्यांची मने जिंकली. आज त्या भागातील आदिवासी निर्भय झाला असून आपल्या हक्कांसाठी लढण्याची जागृती व सामर्थ्य त्याच्याठायी निर्माण झाले आहे, एवढेच नव्हे तर शिक्षणासाठी, चांगल्या संस्कारासाठी त्याची मनोभूमिका तयार झाली असल्याचे त्याने सांगितले.

याशिवाय धुळे जिल्ह्यातील आदिवासी भागात कार्य केलेले वयोवृद्ध कार्यकर्ते श्री. दामोदरदास (भाऊ) मुंदडा, पेणजवळील वरसई येथील सौ. इंदुताई जोशी, वाडे येथील वनवासी विद्यार्थी वसतीगृहाचे श्री. दि. य. दीक्षित, वसंत पळशीकर, मुलुंड कॉलेजचे N. S. S. चे काम करणारे प्रा. यशवंत भिडे, मुंबई विद्यापीठाच्या National Graduate Scheme चे काम पाहणारे प्रा. स. ह. देशपांडे, बार्शीचे शेतमजुरांचे कार्यकर्ते श्री. रोहिदास कांबळे, शिरूरचे श्री. बाबूराव दौंडकर, ठाण्याचे श्री. वसंत पटवर्धन अशा अनेक कार्यकर्त्यांनी आपले विविध अनुभव सांगितले, अडचणी मांडल्या व उपयुक्त सूचनाही केल्या.

दि. २८ जुलैस सकाळी रोजगार हमी योजना या विषयावर योजनेचे प्रवर्तक सभापती श्री. वि. स. पागे यांच्यासह कार्यकर्त्यांची मनमोकळी चर्चा झाली.

संपूर्ण कार्यक्रमास वयोवृद्ध, विचारवंत प्राध्यापक श्री. पु. ग. सहस्रबुद्धे हे उपस्थित होते. त्यांनीही ग्रामीण विकासाची आपली कल्पना व कार्यक्रम सर्वांसमोर मांडला. मेळाव्यातील एकूण चर्चा ऐकून ते फारच प्रभावित झाले व भारताचा भाग्यविधाता इथे उभा राहतो आहे असा आशावाद त्यांनी प्रकट केला.

इन्स्टिटयूट ऑफ बँक मॅनेजमेंटचे श्री. आर. के. पाटील व महाराष्ट्र बँकेचे अन्य काही अधिकारी, पुण्यातील गोखले इन्स्टिटयूट, वैकुंठ मेहता इन्स्टिटयूट येथील तज्ज्ञ प्राध्यापक मंडळी व मुंबई, पुण्यातील ग्रामायनच्या कार्याविषयी आस्था व उत्सुकता असलेली अनेक मंडळी मेळाव्यास उपस्थित होती.

आपले स्वराज्याचे स्वप्न साकार झाले. आता सुराज्याचे स्वप्नही साकार होईल या आत्मविश्वासानेच 'ग्रामायन' मेळाव्यास आलेले अनुभवी, तरुण कार्यकर्ते ग्रामायन चळवळीची पताका आपल्या खांद्यावर घेऊन आपआपल्या गावी परतले. □ □



# विद्युत् विकासातील आमची प्रगती

भारतातील एकूण ९ टक्के क्षेत्र व्यापणारे व देशांतील एकूण लोकसंख्येपैकी ९ टक्के लोकसंख्या असणारे महाराष्ट्र राज्य हे भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. विद्युत विकासाच्या क्षेत्रांत आमची प्रगती खालील प्रमाणे आहे.

- ☐ अखिल भारतीय वीज वापराच्या मानाने महाराष्ट्रात विजेचा दरडोई वापर दुप्पट आहे.
- ☐ जून १९७४ अखेरपर्यंत राज्यातील १७७५५ शहरे व वस्ती असलेली खेडी यांचे विद्युतीकरण करण्यांत आले असून ३८७६७० कृषिपंपांना वीज पुरविण्यात आलेली आहे.
- ☐ भारतातील औद्योगिक उत्पादनापैकी सुमारे एक चतुर्थांश माल या राज्यांत तयार होतो व भारतीय औद्योगिक क्षेत्रांत होणाऱ्या वीज वापरापैकी सुमारे ६ वा हिस्सा महाराष्ट्रात वापरला जातो.
- ☐ देशांतील दुसऱ्या कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्र राज्याची स्थापित क्षमता, विद्युत उत्पादन आणि वीज विक्री अधीक आहे.
- ☐ संपूर्ण भारतातील विद्युतीकरणाची टक्केवारी २७.६ टक्के असली, तरी या राज्यातील विद्युतीकरणाची टक्केवारी ४९.२ टक्के आहे. तसेच राज्यातील ७६.७ टक्के जनतेस वीजपुरवठ्याचा लाभ मिळालेला आहे.
- ☐ मंडळाचा सध्याचा महसूल दरसाल जवळजवळ १०० कोटी रुपये आहे. तो ५ व्या योजनेच्या अखेरीस दरसाल १८७ कोटी रुपयांपर्यंत वाढेल.
- ☐ चालू असलेली कामे जमेस धरून ३१-३-१९७४ च्या अखेरीस ५०६ कोटी रु. पर्यंत असलेली मंडळाची मत्ता ५ व्या योजनेच्या अखेरीस १०९९ कोटी रु. पर्यंत वाढेल.

**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातर्फे प्रसृत**

अशीही एक संध्याकाळ....

# डीन रस्क समवेत

जगदीश राउत, अटलांटा (जॉर्जिया)

वॉटरगेट पार्श्वभूमीवर अमेरिकेत सध्या राजकीय अस्थिरता निर्माण झाली आहे. या अस्थिरतेचाही परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावर झाल्याशिवाय रहात नाही. तेलटचाईमुळेही अर्थव्यवस्थेवर परिणाम होऊन एकीकडे जीवनावश्यक वस्तूचे भाव वाढत चालले आहेत तर दुसरीकडे सरकारी व बिनसरकारी नोकऱ्यावरून लोकांना कमी करण्यात येत आहे. अशा वातावरणात केनेडी–जॉन्सन कारकीर्दीतील सेक्रेटरी ऑफ स्टेट श्री. रस्क यांची भेट घेऊन अमेरिकन तसेच जागतिक घटनाबाबत त्याची मते जाणून घेण्यास मी उत्सुक होतो.

६८ साली अमेरिकेच्या राजकारणातून निवृत्त झाल्यावर श्री. डीन रस्क, जॉर्जिया या आपल्या जन्म झालेल्या राज्यातील अॅथेन्स शहरात युनिव्हर्सिटी ऑफ जॉर्जिया या विद्यापीठात इंटरनॅशनल लॉ या विषयाचे प्राध्यापक म्हणून परतले. आपल्या राजकीय जीवनात वेळोवेळी परदेशगमन करून निरनिराळ्या परदेशी नेत्याच्या भेटी घेतल्याने रस्क यांना वेगवेगळ्या देशाची सखोल माहिती आहे. अमेरिकेतील परदेशी विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने गप्पा मारण्यास डीन रस्कना नेहमीच आवडते व म्हणून काही भारतीय मित्रासमवेत त्याची भेट घेण्यास मला काहीच अडचण पडली नाही.

अमेरिकेतील अतर्गत राजकारणाने सुरुवात करावी या हेतूने मी प्रथम सध्या अमेरिकेत गाजत असलेल्या राष्ट्राध्यक्षाच्या इंपिचमेंटचा विषय काढला. 'राष्ट्राध्यक्ष श्री. निक्सन यांना अध्यक्षपदावरून दूर केले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.' प्राध्यापक डीन रस्क शातपणे बोलू लागले. 'कदाचित निक्सनना वकिली करण्यासाठी बदी करण्यात येईल पण त्यापलीकडे त्यांच्यावर रीतसर आरोपपत्र दाखल करून त्यांना कोर्टात एखाद्या सामान्य नागरिकाप्रमाणे खेचण्यात येईल असे मला वाटत नाही. सरतेशेवटी राष्ट्राध्यक्षाला अध्यक्षपदावरून दूर करणे हीच एक मोठी शिक्षा असते. निक्सन याच्यावरील आरोपही गभीर आहेत. यापूर्वीच्या अमेरिकन अध्यक्षीय राजवटी सपूर्ण निष्कलक होत्या असे मी म्हणणार नाही. पण आपल्या राजकीय हितशत्रूना नामोहरम करण्यासाठी प्राप्तीकर खात्याच्या अधिकाऱ्याना भाग पाडणे, गुप्तहेर नेमणे, दूरध्वनीवरील त्याच्या सभाषणाची त्याच्या नकळत नोद करणे वगैरेसारख्या गंभीर गोष्टी यापूर्वीच्या राजवटीत घडल्या नव्हत्या. वॉटरगेट-सारख्या घटनामुळे राजकीय अस्थिरता निर्माण झाली असली तरीही ती तात्पुरती आहे. कदाचित निक्सन जाऊन फोर्ड हे राष्ट्राध्यक्ष बनतील. यापूर्वीही राष्ट्राध्यक्ष केनेडीच्या हत्येसारख्या दारुण शोकांतिका घडल्या आहेत. पण त्या प्रकारच्या कसोटीतूनही हे राष्ट्र बाहेर पडले आहे. राजकीय जीवनातील मलीनता धुवून काढून ते शुद्ध करण्यासाठी वॉटरगेटसारखी प्रकरणे बाहेर येणे जरुरीचे असते. भविष्यातील पुढले एक शतक तरी अमेरिकेतील राजकीय नेते वॉटरगेट विसरणार नाहीत व त्यामुळे त्याचे वर्तन शुद्ध असेल. फक्त वाईट एवढेच वाटते की, वॉटरगेटसारख्या प्रकरणामुळे अध्यक्षाच्या राज्यकारभारावर पूर्वीइतके नियत्रण राहिले नाही व त्याचा परिणाम जनतेस महागाई, बेकारी वगैरेमुळे भोगावा लागत आहे. त्याचप्रमाणे जगात घडणाऱ्या इतर महत्त्वाच्या घटनांकडे अमेरिकन बातमीदाराचे, वृत्तपत्राचे व पर्यायाने जनतेचे वॉटरगेटसारख्या प्रकरणामुळे पुरेसे लक्ष जात नाही. वेगवेगळ्या सागरांवर कोणकोणत्या राष्ट्रांचे वर्चस्व असावे व त्यायोगे वड्या राष्ट्रातील नाविक स्पर्धा व सघर्ष टाळण्यात यावा म्हणून दक्षिण अमेरिकेत सध्या वेगवेगळ्या राष्ट्राची परिषद भरली आहे. या परिषदेचे दूरगामी परिणाम फार महत्त्वाचे आहेत. परंतु अमेरिकन वृत्तपत्रे या परिषदेसबधी उदासीन आहेत.

### सायप्रसवरील युद्ध

सायप्रस बेटावरील लष्करी कटामुळे ग्रीस व टर्की याच्यात युद्ध पेटण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्या सबधात बोलताना प्राध्यापक म्हणाले, 'ब्रिटनने जेव्हा सायप्रस बेटाला स्वातत्र्य दिले तेव्हाच ग्रीस, टर्की व ब्रिटन या तीन देशांनी एकत्र येऊन करार केला होता. सायप्रस बेटावरील ग्रीक व टर्की लोकांनी सायप्रस या एकाच देशाचे नागरिक म्हणून शाततामय सहजीवन जगावे. सरकारात दोघाचेही प्रतिनिधी असावेत व ग्रीस वा टर्की या देशानी सायप्रसच्या अतर्गत कारभारात ढवळाढवळ करू नये असे या करारान्वये मान्य करण्यात आले. पण जेव्हा लष्करी सल्लागार म्हणून ग्रीसमधून आलेल्या ६०० लष्करी अधिकाऱ्यानी कट करून अध्यक्ष मॅकरियस यांची उचलबागडी केली व सायप्रस ग्रीसला जोडण्याचा प्रयत्न केला तेव्हा टर्की शातपणे गप्प बसली असती तरच नवल! टर्कीचे सायप्रसवरील आक्रमण हे जितके निषेधार्ह आहे तितकाच सायप्रस ग्रीसला जोडण्याचा ग्रीक लष्करी अधिकाऱ्यांचा कटही निषेधार्ह आहे. या प्रकरणातून ग्रीसमध्ये परत लोकशाही प्रस्थापित झाली हे मात्र चागले झाले.'

'फ्रान्सच्या नव्या राजवटीचे अमेरिकेबद्दलचे धोरण काय राहील?' माझ्याबरोबरच्या भारतीय मित्राने प्रश्न विचारला.

प्राध्यापकाना धूम्रपानाची लहर आली. खिशातून लॉर्क निघाली व प्राध्यापकाच्या ओठात जळत राहिली. जोरदार झुरका घेऊन डीन रस्क म्हणाले, ' अध्यक्ष द गॉल यांची धोरणे अमेरिकेविरुद्ध होती. माजी राष्ट्राध्यक्ष पॉंपिदू हे देखील अमेरिकेला फारसे अनुकूल नव्हते. सध्याची राजवट पूर्वीइतकी अमेरिकाविरोधी वाटत नसली तरीही त्याची नक्की धोरणे अजून कळलेली नाहीत. वास्तविक पहाता अमेरिका-फ्रान्स जवळिक निर्माण झाली तर त्यातून उभय राष्ट्राचाच नव्हे तर युरोपचाही फायदा होईल. युरोपिय राष्ट्रानी एकत्र येऊन कॉमन मार्केटसारख्या सघटनातून आपली शक्ती वाढवली, तर जागतिक प्रश्न सोडवण्यात युरोपचा फार उपयोग होईल. '

' मध्यपूर्वेतील सध्याची किसिंजरनिर्मित शांतता ही तात्पुरती आहे का ?' युरोपमधून मध्यपूर्वेकडे येत माझ्याबरोबरच्या दुसऱ्या मित्राने प्रश्न केला. डीन रस्क उत्तरले, ' धर्मांध राष्ट्रे एकमेकाच्या विरुद्ध उभी ठाकली, की त्यांना मेजाभोवती एकत्र आणून वाटाघाटी करावयास लावणे फार कठीण जाते. ५० ते ६० या दशकामध्ये माझ्या स्वत वर या दोघाना (अरब ·व इस्रायल) एकत्र आणण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती. न्यूयॉर्कमध्ये राजकुमार फैझल (सध्याचे सौदी अरेबियाचे राजे फैझल) व इस्रायलचे त्यावेळचे परराष्ट्रमत्री शराफ याची मी वारवार भेट घेत होतो. साध्यासाध्या गोष्टीवरही त्याचे एकमत होत नव्हते. हा राष्ट्रातील झगडा नसून कुराण व मोझेसच्या पुस्तकातील विचाराचा झगडा आहे. कायमची शातता प्रस्थापित होण्यापूर्वीच ब्रिटनने मध्यपूर्वेतील राष्ट्रांना स्वातत्र्य दिले, त्यावेळेसच परिणामकारक उपाययोजना करून ब्रिटनला पुढील सभाव्य युद्धे कदाचित टाळता आली असती. पुढेपुढे जनतेची मते इतकी विथरली गेली, की दोन्ही बाजूच्या नेत्याना आपले सरकार टिकविण्यासाठी युद्धाची भाषा बोलण्यावाचून गत्यतरच उरले नाही. परतु परिस्थिती हळूहळू बदलत आहे. उभय राष्ट्रात एक नवीन पिढी जन्माला आली आहे नव्या पिढीला शातता हवी आहे, सलोखा हवा आहे झगडत राहिलो तर होणाऱ्या विध्वसाला, प्राणहानीला काही अतच नाही हेही त्याना पटू लागले आहे कालांतराने या पिढीच्या हातात सत्ता येईल व तेव्हाच खरी शातता निर्माण होईल. पॅलेस्टाईन निर्वासितांनी पॅलेस्टाईन राज्याचे स्वप्न सोडून द्यायला हवे व या निर्वासिताना अरब राष्ट्रे व इस्रायलने आपल्यात सामावून घेतले पाहिजे. काही वर्षातच ही घटना घडून येईल. '

मुलाखत रंगत होती मध्येच डीनना वाईनची तल्लफ आली. पेले भरले गेले. भारत-अमेरिका मैत्री वृद्धिगत व्हावी असे एकमेकाला चितून आम्ही पेले ओठाला लावले. मद्यपानावरून डीन रस्कना भारतातील जुनी आठवण झाली. एरवी गभीर वाटणाऱ्या त्याच्या चेहऱ्यावर मिस्किल हास्य तरळले. मुबईत अजून मद्यपानवदी आहे का ?' हसताना डोळे किलकिले करीत त्यानी आम्हाला प्रश्न विचारला. ' मद्यपानावर पूर्वी इतके कडक निर्बंध नाहीत, सध्या तर उपहारगृहातून बियर खुली करण्यात आली आहे, मद्यपानासाठी परवाने मिळवणेही पूर्वी इतके कठीण नाही, आम्ही माहिती पुरवली. ' काही वर्षापूर्वी मी जेव्हा मुबईत होतो,' डीन परत सागू लागले, ' तेव्हा मी ताजमहाल हॉटेलात उतरलो होतो. सध्याकाळी दिवसभराचा शिणवा घालवण्यासाठी हॉटेलातील बारमध्ये शिरलो तेव्हा तिथे ' फक्त परदेशी वकिलातीतील अधिकारी व परवाने जवळ असणाऱ्यासाठीच मद्य-विक्री खुली आहे. ' असा फलक लावण्यात आला होता. दोन्हीपैकी मी काहीच नसल्याने ती सध्याकाळ मद्याशिवायच घालवावी लागली. '

## भारत-चीन

भारताने प्रथमच अण्वस्त्र चाचणी स्फोट केल्यानतर अमेरिकेत तीव्र असतोष पसरला होता. त्यासबधी मत व्यक्त करताना डीन रस्क म्हणाले, ' एक नागरिक म्हणून अशा गोष्टीची चिकित्सा करणे आपल्याला सोपे जाते पण समजा श्रीमती गाधीच्या जागी भारतीय पतप्रधानकीच्या खुर्चीवर मी असतो, सतत चीन सारख्या साम्यवादी, विस्तारवादी व महत्त्वाकांक्षी राष्ट्राची वाकडी नजर माझ्या राष्ट्रावर असती, तर माझे विचार वेगळे असते. समजा उद्या भारत-चीन यांच्यात अण्वस्त्रयुद्ध झाले तर रशिया वा अमेरिकेकडून भारताला अण्वस्त्र मिळेपर्यंत युद्धाच्या पहिल्या काही काळातच भारताचा भरपूर विध्वस होईल. समजा अमेरिकेने भारताला मदत करावयाची ठरवली तर चीन बरोबर अण्वस्त्रयुद्धाचा धोका अमेरिकेलाही पत्करावा लागेल. अण्वस्त्र युद्धात अतिम विजय जरी अमेरिकेचा झाला तरीही भारतासाठी कोटचवधी अमेरिकन जनतेचे जीव धोक्यात घालावयास अमेरिकन सरकार तयार होईल की नाही, याची मला शका वाटते. राष्ट्रस्वसरणाबाबत स्वावलबन महत्त्वाचे असते व म्हणून इतर अमेरिकन राजकाणी, भारतीय अण्वस्त्र चाचणी स्फोटासबधी नापसती दर्शवीत असले तरीही मी स्वत त्याबाबत नापसती दाखवीत नाही. अमेरिकन नेत्याच्या टीकेचा रोख मुख्यतः भारतासारख्या अर्धविकसित राष्ट्राने, की ज्याला सर्व प्रकारच्या टचाईने ग्रासून टाकले आहे, आपल्या जनतेचे पोट भरणे ज्याला मुश्किल होत आहे, अशा राष्ट्राने ३० लाख रुपये या स्फोटासाठी खर्च करावेत का ? या प्रकारचा असतो. माझ्या मते ३० लाख रुपये महत्त्वाचे नाहीत पण या प्रकारच्या मतभेदांमुळे कॅनडा व जपान सारख्या राष्ट्रानी वा अमेरिकन कॉंग्रेसने (आपल्याकडे ज्या प्रमाणे लोकसभा, राज्यसभा असतात साधारणपणे त्याच धर्तीवर अमेरिकेत सिनेट व कॉंग्रेस असतात.) जर भारतास द्यावयाची मदत थाबवली तर मात्र भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचे फार वाईट परिणाम होणार आहेत. '

भारतीय अर्थव्यवस्थेचे सध्याचे हाल आम्हा भारतीयाना चागलेच परिचित होते. ' भारतीय अर्थव्यवस्था सुधारण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना करता येईल ?' आम्ही प्रश्न टाकला. ' तुमच्या अतर्गत अडचणीबाबत मला पुरेशी माहिती नाही. प्राध्यापक सागू लागले, पण विकासाच्या दृष्टीने तुम्हाला परकीय चलन मिळवणे फार जरुरीचे आहे व त्यादृष्टीने महत्त्वाची पावले उचलली गेली पाहिजेत. अमेरिकेच्या सपूर्ण आयातीपैकी फक्त ०·७ टक्के आयात भारताकडून केली जाते. भारताला मदत करण्याच्या दृष्टिकोनातून भारताकडून जास्त आयात कशी करता येईल याचा आम्ही विचार केला. पण तुमच्याकडून आम्ही काय घेणार ? आधीच जगात उत्पन्न होत असलेल्यापैकी ५० टक्के कॉफी आम्ही पितो. जागतिक बाजारपेठेत काय काय विकता येईल यावर सशोधन करून त्या प्रकारच्या

वस्तूंच्या उत्पादनावर भर दिला गेला पाहिजे. भारत सरकार या गोष्टी करीत नाही असे मला म्हणावयाचे नाही पण या गोष्टी जेवढ्या प्रमाणात केल्या पाहिजेत तेवढ्या प्रमाणात होत नाहीत...

' भारताबद्दल परदेशात फार कुतूहल असते. या कुतूहलाला साद घालण्यासाठी भारत सरकारकडून किती प्रयत्न होतात ? अमेरिकेत किती लोकाना ताजमहालचे नाव ठाऊक आहे ? भारत जुना देश असल्याने प्रवाशाना आकृष्ट करण्यासारख्या बऱ्याच गोष्टी भारतात आहेत. अन् या गोष्टी सर्वसामान्य अमेरिकन जनतेपर्यंत पोहोचल्या पाहिजेत, त्याचे कुतूहल चाळवले गेले पाहिजे. काही वर्षांपूर्वी एक सूचक घटना घडली. श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यानी अमेरिकन प्राणीसंग्रहालयाला एक छोटेसे हत्तीचे पिल्लू भेट म्हणून दिले. घटना साधीच होती, पण लगेच तमाम अमेरिकन वृत्तपत्रात त्या हत्तीचे छायाचित्र झळकले. भारताचे नाव झाले. तुम्हाला हत्ती इथे आणावयास कदाचित ८००।१००० डॉलर्स खर्च झाला असेल पण त्यायोगे तुम्ही जी मैत्री दाखवलीत त्यातून कित्येक लाखो डॉलर्सचा तुम्हाला फायदा झाला. फुलब्राईट स्कॉलरशिपच्या धर्तीवर तुम्ही वेगवेगळ्या प्रकारच्या शिष्यवृत्त्या काढून अमेरिकेतील सर्व विद्यापीठातील सूचना-फलकावर माहिती लावलीत, अमेरिकन बुद्धिमताना भारत भेटीचे आमंत्रण दिलेत तर अमेरिकन विद्यार्थीवर्गात भारताला भेट देण्याची प्रबळ इच्छा निर्माण होईल. एअर इंडियाचे उदाहरण घ्या खास भारतीय छापाची त्याची सेवा उत्कृष्ट असते. कित्येक परदेशी अभिमानाने एअर-इंडियाने प्रवास करतात. कोठल्याही देशाला भेट देताना त्या देशाच्या इमिग्रेशन नियमाचे पालन करावे लागते. भारतात या नियमाची अतिशय कडक रीतीने अमलबजावणी करण्यात येते व त्याचा उपयोग प्रवाशाच्या सोयीऐवजी त्याना सतावण्याकडे करण्यात येतो. '

### अन्नपरिस्थिती व लोकसंख्या

भारतीय अन्नान्नदशेमुळे परदेशातील भारतीयावर बरेच अपमानास्पद प्रसंग ओढवतात. भारतीय अन्नपरिस्थितीबाबत बोलताना प्राध्यापक म्हणाले, ' मला माहीत आहे, की आपली लोकसंख्या मर्यादित ठेवण्यासाठी भारत सरकार भरपूर प्रयत्न करीत आहे. परिस्थिती पूर्वीपेक्षा बरी असली तरीही परिस्थितीत आणखी सुधारणा झाली पाहिजे. कुटुंबनियोजनाला खेड्यापाड्यातूनही सहकार्य मिळाले पाहिजे. सध्या तुमच्या लोकसंख्येत १·३ ते १·५ कोटीची वाढ दरवर्षी होत आहे. म्हणजेच दरवर्षी तुम्ही एक संबंध नवा ऑस्ट्रेलिया खंड भारतात निर्माण करीत आहात. सध्याच्या प्रगतीप्रमाणे लोकसंख्येतील वाढ शून्यावर येण्यासाठी (झिरो पॉप्युलेशन ग्रोथ्) कदाचित आणखी ५० वर्षे लागतील व तेवढ्या अवधीत तुमची लोकसंख्या १०० ते १५० कोटीच्या घरात गेली असेल. आता एवढ्या प्रचंड लोकसंख्येचे पोट कसे भरता येणार ?

' रॉकफेलर फाऊंडेशनतर्फे अमेरिकन बुद्धिमतानी भारतात जाऊन भारतीय अन्नपरिस्थितीबद्दल संशोधन केले तेव्हा फार उत्तेजनकारक निकाल मिळाले. अमेरिकेत आम्ही एकच पीक वर्षातून काढू शकतो. भारतात सुपीक जमीन, चांगले हवामान असल्याने तुम्ही वर्षाला तीन पिके काढू शकता. आपल्या लोकसंख्येची अन्नाची गरज भागविण्याची शक्ती भारतीय जमिनीत आहे तुमच्याकडे अभाव आहे तो आधुनिकतेचा व तांत्रिक प्रगतीचा. आधुनिकतेचा वापर करून भारत आपले अन्न उत्पादन तिपटीने वाढवू शकतो. भारतीय पोटे भारतानेच भरली पाहिजेत. परदेशातून अन्नाची मदत मागवण्यापेक्षा रासायनीक खते, तांत्रिक पद्धतीची लागवड, शेतीविषयक आधुनिक उपकरणे भारतात निर्माण करण्यासाठी कारखाने उभारताना परदेशातून भांडवल आणावयास काहीच हरकत नाही. १९ व्या शतकात अमेरिकेची जी भरभराट झाली त्यासाठी भांडवल युरोपमधून आणण्यात आले. आपल्या उत्पादनात वाढ करून आपल्याच देशातून भांडवल निर्माण करण्यास बराच अवधी लागतो व भारतीय परिस्थितीत झपाट्याने सुधारणा होणे आवश्यक आहे.

' डोनर व रेसिपंट ह्या कल्पनेचे भारतीय मनातून समूळ उच्चाटन झाले पाहिजे. आम्ही तुम्हाला अन्नमदत केली तर त्याचे आमच्या बाजूने वा आमच्याविरुद्ध भांडवल करू नका. नुसते शांत बसा. अध्यक्ष नासेर याच्या काळात इजिप्तची चाळीस टक्के जनता अमेरिकन अन्नावर जगत होती. अरब-इस्रायल वादानंतर बोलताना अध्यक्ष नासेर म्हणाले, ' आम्हाला अमेरिकन मदत नको. त्याच्या अन्नाची आम्हला गरज नाही. त्यानी अन्नमदत पाठवली तर आम्ही ती तांबड्या समुद्रात भिरकावून देऊ. ' सहाजिकच अमेरिकन काँग्रेसने अन्नमदत थांबवली. भारताला मदत करून आमच्या भारताकडून काही खास अपेक्षा नाहीत. आंतरराष्ट्रीय धोरणात भारताने आमचा पाठपुरावा करावा असेही आम्हाला वाटत नाही. आपली धोरणे आखण्यास भारत सदैव स्वतंत्र आहे. भारतासारख्या देशावर मदत देऊन दबाव आणण्याची आमची इच्छा नाही व ते शक्यही होणार नाही.

' निरनिराळ्या धार्मिक व सामाजिक रूढीमुळे भारत वैज्ञानिक प्रगती करू शकत नाही असा एक समज प्रचलित आहे. माझा स्वत चा त्याबाबतीतील अनुभव मात्र थोडा वेगळा आहे. ' प्राध्यापक खुशीत येऊन आपले अनुभव सांगू लागले. ' ५० सालच्या सुमारास भारतीय खेड्यात एक विशिष्ट प्रकारचा रोग पसरला होता व त्यामुळे अर्धी अधिक माणसे मरून पडत होती. रॉकफेलर फाऊंडेशनतर्फे बरेच डॉक्टर्स आम्ही भारतीय खेड्यात पाठवले. भारतीय डॉक्टराबरोबर एकत्र काम करून त्यानी शोधून काढले की, रशिया व उत्तर देशातून उडत येणाऱ्या पक्ष्यांबरोबर हे रोगजंतू भारताच्या दक्षिण भागात येत आहेत. रशियाकडून ह्या रोगासाठी प्रतिबंधक लस मागवा असे आम्ही सुचवल्यावर लगेच त्याप्रमाणे करून भारताने ही साथ आटोक्यात आणली. परंतु अधून मधून रोगाची लागण होतच राहिली. अधिक संशोधन करता आम्हास आढळून आले की, भारतीय जंगलात माकडाना हा रोग झाला असून त्याच्याकडून तो मानवापर्यंत पोहोचत आहे. दिल्लीतील नेत्याना आम्ही माकडाना नाहीसे करण्यास सुचविले. तेव्हा त्यानी कानावर हात ठेवले. हनुमानावर श्रद्धा असणारे हिंदू या गोष्टीस कधीच तयार होणार नाहीत असे त्यानी आम्हाला सांगितले. शेवटी शेवटचा उपाय म्हणून आम्ही खेड्यापाड्यात जाऊन गावकऱ्यानाच हा प्रश्न समजावून सांगितला. त्यानी लगेच त्या त्या जंगलात जाऊन माकडे पकडून मारली.

## भारतीय नेते

'प्राध्यापक महाशय, दुसऱ्या महायुद्धात आपण स्वतः जपानी फौजाविरुद्ध आसामच्या दऱ्याखोऱ्यातून लढलात. महायुद्धानंतरच्या केवळ दोन दशकात आपण या ना त्या कारणाने भारताला कमीत कमी वीस वेळा भेटी दिल्यात. बऱ्याच भारतीय नेत्याशी आपला प्रत्यक्ष सबध आला. भारतीय नेत्यांबद्दलचे आपले विचार जाणून घेण्यास मी उत्सुक आहे.' सभाषणाचा ओघ माकडांवरून मानवावर आणीत मी विचारले,

महात्मा गांधीच्या थोर तत्त्वाबद्दल मला नेहमीच आदर वाटत आला आहे,' प्राध्यापकाचा चेहरा गंभीर बनला होता. 'पडित नेहरू व माझा बऱ्याच वेळा प्रत्यक्ष सबध आला होता. काही धोरणाबाबत आमचे मतभेद असले तरीही एक व्यक्ती म्हणून मला त्याच्याबद्दल आदर वाटत आला आहे डॉ. राधाकृष्णन फार मोठे तत्त्वज्ञ आहेत, पण दुर्दैवाने भारतीय राजकारणावर ते आपला प्रभाव कधीच पाडू शकले नाहीत. परतु आम्हाला कमालीचा आदर अन् फार मोठी आशा वाटत होती ती भारताचे एकेकाळचे अर्थमंत्री श्री. सी. डी. देशमुख यांची. या माणसाचे व्यक्तिमत्त्व आकर्षक होते, नेत्याची तडफ होती. बुद्धिमत्तेबद्दल तर शकाच नव्हती. आज ना उद्या देशाची सूत्रे हाती घेऊन भारताला वर काढणारा नेता हाच असा आम्हाला आत्मविश्वास वाटत होता. परतु पडित नेहरूशी मतभेद झाल्याने श्री देशमुख मत्रीमडळातून निवृत्त झाले व त्यामुळे भारताचे अतोनात नुकसान झाले.'

क्षणभर लार्क पेटवण्यासाठी प्राध्यापक थाबले. केनेडी-जॉन्सन कारकिर्दीतील सेक्रेटरी ऑफ स्टेट याच्या तोडून भारतास वर आणणारा नेता म्हणून एका थोर मराठी नेत्याचे नाव ऐकताच मला फार समाधान वाटले.

एक जोरदार झुरका मारून प्राध्यापकानी परत बोलावयास सुरूवात केली. 'श्री. मोरारजी देसाईंना आणखी काही काळ मिळाला असता तर ते कदाचित् परिणामकारक अर्थमंत्री म्हणून चमकले असते. परतु श्रीमती गाधीसारखी जनमानसाची नाडी त्यांना अचूक पकडता आली नाही शिवाय त्याची उजवी विचारसरणी भारतात प्रभाव पाडू शकली नाही. हे सर्व झाले माझ्या जमान्यातील भारतीय नेते. राजकीय क्षितिजावरून ते केव्हाच अस्त पावलेले आहेत. श्रीमती गाधींचा व माझा प्रत्यक्ष असा फारसा सबध आलेला नाही. त्यांच्याबद्दल मला पुरेशी माहिती नाही. तीन आठवड्यापूर्वी मी लडनला गेलो होतो तेव्हा ब्रिटनमधील भारतीय राजदूत श्री. बी. के. नेहरूनी मला भोजनाचे आमत्रण दिले होते. बी. के. नेहरू हे एक बुद्धिमान अर्थतज्ञ आहेत. ते राज्यकारभारही कार्यक्षमपणे करू शकतील परतु निवडणुका जिंकणे त्याना कितपत जमेल हे सागता येणार नाही.'

'आता शेवटचा प्रश्न' मनगटावरील घड्याळाकडे पहात मी म्हणालो,

क्षणभर माजी सेक्रेटरी ऑफ स्टेट विचारमग्न झाले. वातावरणात शांतता पसरली. घसा साफ करून प्राध्यापक डीन रस्क बोलू लागले,

'भारत हा एकेकाळी ब्रिटिशांची वसाहत होता. स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरीही भारतीय विचारसरणी दुर्दैवाने अजूनही ब्रिटिश पद्धतीची आहे. ज्या प्रकारची वागणूक ब्रिटिश लोक भारतीयांना देत होते त्याच प्रकारची वागणूक भारतीय अधिकारी आपल्या हाताखालच्या दुय्यम नोकराना देत आहेत. ब्रिटिश लोकांचा भारतीय लोकावर विश्वास नव्हता. सध्या भारतीय वरिष्ठ अधिकाऱ्यांचा आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांवर विश्वास नाही. ब्रिटिशांना भारतात इंग्रजी बोलू शकणारे कारकुडे निर्माण करावयाचे होते. स्वातंत्र्यपूर्व काळातील त्याच प्रकारची शिक्षणपद्धती अजूनही अस्तित्वात आहे. भारतीय शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल घडून यावयास हवेत.

'कलकत्ता शहरात बरीच घाण आहे रस्त्यारस्त्यावर कित्येक तरुण काहीही उद्योग न करता वेळ फुकट घालवताना मी पाहिलेले आहेत. यापैकी प्रत्येकाने जरी फक्त चार कागद उचलून केराच्या टोपलीत टाकले तरीही कलकत्ता शहरातील बरीच घाण कमी होईल. नागरिकानी अशी शिस्त लावून घेतली पाहिजे. सरतेशेवटी कोठलेही राष्ट्र हे त्या राष्ट्रातील नागरिकाच्या अविरत परिश्रमातून घडत असते व जर हेच श्रम घेतले गेले नाहीत तर मोडत असते.

'काही वर्षापूर्वी मी दिल्लीला गेलो असताना अशोक हॉटेलमध्ये उतरलो होतो. दुपारी थोडा वेळ होता म्हणून दिल्लीत फिरत असताना, साडी घ्यावयाची इच्छा झाली. लगेच साडीच्या एका भव्य दुकानात शिरलो. चार लोकांनी एकत्र येऊन मला एक साडी विकली त्यापैकी एक दाखवीत होता. दुसरा बिल तयार करीत होता. तिसरा साडी बांधून देत होता. तर चौथा केवळ तिघांवर देखरेख करीत होता! प्रचड लोकसख्या असलेल्या भारताने आपल्या जनतेचा अधिक कार्यक्षम पद्धतीने उपयोग केला पाहिजे.'

'अन् सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतीय आत्मा. भारतीय मने जाणणाऱ्या भारतीय नेत्याच्या हातात भारताची सूत्रे आली पाहिजेत. खरा भारत हा खेड्यापाड्यात आहे. परदेशात वास्तव्य केलेल्या शहरी सस्कृतीत वाढलेल्या, पाश्चात्य विचारसरणीच्या भारतीयाला खऱ्या अर्थाने भारतीय नेता बनावयाचे असेल तर त्याला खेड्यातील भारतीय जनतेला समजावून घेतले पाहिजे. पंडित नेहरू भारतीय पतप्रधान म्हणून नव्हे तर लडनच्या टोरी क्लबचे सभासद म्हणून जास्त शोभून दिसले असते. महान सास्कृतिक परपरा असलेली एके काळची सुवर्णभूमी आज अशी भकास का?

'भारतापाशी सर्व काही आहे. बुद्धिमान माणसे आहेत, राजकारणी मुत्सदी आहेत. भारतीय विद्यार्थी शैक्षणिक क्षेत्रात अमेरिकन विद्यापीठातून चमकत आहेत. आम्ही कॉर्नेल वा आयोवा विद्यापीठातून शेतकीशास्त्रात एखादा भारतीय डॉक्टर सहज निर्माण करू शकतो. पण एक तर या भारतीय शेतकी-शास्त्रज्ञाची परत भारतात जायची तयारी नसते. समजा तो परत गेलाच तर त्याला प्रत्यक्ष मातीत हात घालून शेती करावयाच्या ऐवजी एकतर शेतकी विद्यापीठात कुलगुरूपद हवे असते वा मत्रीमडळात शेतकी खात्यात वरची जागा हवी असते.

'भारताबद्दल मला आदर आहे. भारतीयावर माझी श्रद्धा आहे, त्यांच्या कार्यक्षमतेवर माझा विश्वास आहे. आज ना उद्या या लोकांतूनच भारतीय आत्मा जाणणारा, सर्वार्थाने भारतीय असा नेता वर येणार आहे व तो दिवस फार दूर नाही.

'India is a Great Country'

मुलाखत सपली होती व त्याचबरोबर पेल्यातील दारूही.

☐ ☐



महंमद करीम छगला
यांच्या आत्मचरित्राचा
धावता परिचय

अनुवाद : विनय धुमाळे
लेखांक : नऊ

# ROSES IN DECEMBER
# रोझेस इन डिसेंबर

## एम्. सी. छागला

हिवाळा आला की त्यानंतर वसंतऋतू येणार हे आपल्याला ठाऊकच असतं. पण आयुष्याच्या या शेवटच्या हिवाळ्यानंतर येणार असतो तो संपूर्ण अंधकार. त्या हिवाळ्यानंतर काही वसंत येणार नसतो, तर येणार असतो एक प्रतीक्षाकाल. ज्या प्रतीक्षाकालात आयुष्याच्या शेवटपर्यंत ज्या आठवणींच्या गुलाबाचा आपण सुगंध घेत असतो त्यालाही विसरून जावं लागतं व सारं काही अदृश्य होण्याची वाट पहावी लागते.

तर माझी कथा मी सांगितली आहे. अनेक दुःखऱ्या आठवणी, अनेक आल्हाददायक प्रसंग ! माणसाचं आयुष्य हे असंच सुख-दुखांच्या धाग्यांनी विणलेलं असतं.

आयुष्यानं मला काय शिकवलं ? आयुष्यानं मला मृदु व्हायला शिकवलं. दुसऱ्यांना सतत सहानभूती दाखवायला शिकवलं. व परिस्थितीवर निवाडा करायच्या ऐवजी परिस्थिती जाणून घ्यायला शिकवलं. फ्रॉस्टरने म्हटल्याप्रमाणे, दोन व्यक्ती–दोन राष्ट्रांमधला दुवा व्हायला शिकवलं. माणसं जोडायला शिकवलं. आयुष्याने माझ्यात निःसंगता बाणवली. आयुष्याविषयीच फार आकृष्ट न व्हायला शिकवलं. त्यामुळे जेव्हा त्याच आयुष्याचा शेवट येतो तेव्हा धक्का फार तीव्रतेने जाणवत नाही.

लहानपणी मी धार्मिक होतो पण जसजसा मोठा व्हायला लागलो तसतशी या गोष्टींवरची श्रद्धा उडायला लागली. विचाराची त्याला

जोड असल्याशिवाय आणि एखादी गोष्ट विचाराने सिद्ध झाल्याशिवाय मला त्याविषयी श्रद्धा वाटेनाशी झाली. प्रार्थनेने मला काही फारस समाधान दिल नाही. मनात उद्भवणाऱ्या शकाच काही प्रार्थना निरसन करू शकली नाही. मी नास्तिक कधीच नव्हतो व आजही नाही. कारण नास्तिक असणं म्हणजे जाणून बुजून देवाचा आव्हेर करण. त्या कल्पनेला खोट मानणं. माझी वृत्ती नास्तिकापेक्षा पुष्कळच नम्र राहिली. मला कळून चुकल होत, की मानवी विचाराला कोठेतरी सीमा आहे व त्या सीमेपलीकडे असणाऱ्या प्रश्नाविषयी मला कधीच कळणार नव्हत. मी अश्रद्ध नाही. पण ज्याला काही गोष्टी माहीत नाहीत अथवा काही सकल्पना कशा जाणून घ्यायच्या हेच माहीत नसलेल्यापैकी मी एक होतो.

कशावरती तरी श्रद्धा ठेऊन जीवन चालवणाऱ्या लोकाचा मला हेवा वाटतो. आयुष्यभर अनाकलनीय अशा कुठल्यातरी शक्तीची आपल्या वाटचालीत आपल्याला सोबत असावी अस प्रत्येकाला वाटत. तुमच्या भोवतालच्या काळोखातून तुम्हाला मार्ग दाखवायला कुठल्यातरी शक्तीची गरज असते. जेव्हा दैव आपल्याला फटकारत व आयुष्यात परत आपण उभेच राहू शकणार नाही अस वाटत तेव्हा कुठल्यातरी शक्तीच्या सहानुभूतीची जरूर असते. दुर्दैवाने ती सहानुभूती मला लाभलीच नाही. माझ्या आध्यात्मिक जाणिवा सदैव अपुऱ्याच राहिल्या. माझ्या बायको-मुलात राहूनही मी तसा एकटाच राहिलो. एकाकी राहिलो.

### बौद्धिक प्रामाणिकपणा

आकाशातल्या ताऱ्याला हात जोडणं मला कधी जमलंच नाही.

एकाकीपणा व एकलकोंडेपणा यात आपल्याला भेद हा केलाच पाहिजे. एकाकीपणा हा तुमच्यावर लादला जातो. एकलकोंडेपणा हा माणूस स्वतःहून निवडतो. व स्वतःच सबध तोडलेल्या जगाविषयी त्या अवस्थेत विचार करू शकतो पण एकाकीपणा, त्यात मनात भलभलते विचार येतात. आयुष्याची निरर्थकता पुनः पुनः जाणवायला लागते आदर्श व वस्तवामधला फरक सारखा भेडसावीत रहातो. एकट रहाण ही भयानक शिक्षा आहे. त्यामुळे मी सदैव चार लोकात राहिलो. कोणी नाही तरी आजवर मला बायकोची सोबत हाती. आयुष्याच्या दुःखद क्षणात माझ्या बाजूला कोणीतरी असेल ही भावना होती. पण माझ्या पत्नीच्या निधनाने तेही एक समाधान माझ्यापासून हिरावून घेण्यात आल आहे. दैवान न्याय दिला आहे, की माझे शेवटचे दिवस मी विजनवासात घालवावे म्हणून कारण नाही तरी दिल्लीला वकिली करण म्हणजे विजनवासच होय. मी दिल्लीला मत्री असताना इतकं प्रचड काम असायच की दुसऱ्या कशाचा विचार करायला मला वेळच मिळाला नाही; वेळच मिळत नसे. पण आता चार भिंतीच्या आत मानवी आवाजसुद्धा कानावर पडत नाही अशा ठिकाणी रहाणं हे मला फार भेडसावतं. मी काही आता पैशाकरता वकिली करीत नाही. तुमच्या वकिलीतले ५७–७५% रक्कम कर म्हणून काढून घेतल्यावर पैसे रहाणार किती ? पण नाही. मला कामाच जणू व्यसनच आहे. काम नाही केल तर मी जिवतच राहू शकणार नाही. मी मत्री म्हणून राजीनामा दिल्यावर काही दिवस मला अक्षरशः नर्व्हस ब्रेकडाऊन झाल्यासारख वाटल. काय कराव हे मलाही सुचेना वा घरच्यानाही कळना. एके दिवशी सध्याकाळी मला पालखीवालाचा फोन आला. त्याना कुठल्यातरी एका महत्त्वाच्या कामाला जायच होत, म्हणून त्यांची सुप्रीम कोर्टातली एक केस मी चालवावी म्हणून त्यानी विनती केली. मी म्हणालो की प्रॅक्टीस करायची की नाही याविषयी मी अजून विचार पक्का केला नाही. पण घरच्यानीही मला आग्रह केला, पालखीवालानी आग्रह केला. त्यामुळे आज मितीसही मी सुप्रीम कोर्टच्या न्यायमूर्तीसमोर बाजू माडतो. त्यातली काही समर्थने ग्राह्य धरली जातात तर काही फेटाळून लावली जातात.

यावरून काही लोकाना असे वाटेल की, मी फक्त अतर्मुख आहे. पण नाही. खेळ, विशेषत ब्रिज, गोल्फ मला फार मानवणारे आहेत. गोल्फमध्ये माझा चेंडू फार दूरवर जायचा नाही. सरळ रेषेत तो चेडू जायचा. ते बघून माझे मित्र म्हणायचे, की माझे आयुष्यही तसेंच फार सरळ व अरुंद आहे हो. आयुष्यात मी वळणावळणाने आलो नाही. सरळ रस्त्यानेच आलो. वळणावळणाच्या रस्त्यावर जी मजा असते ती मी चाखू शकलो नाही. आयुष्यभर मी तसा गभीर प्रकृतीचा राहिलो.

मी अत्यत सवेदनाशील आहे. अगदी स्त्रिया जशा असतात तसा. गप्पा मारीत बसलो असतानाच क्षणार्धात काळे ढग मन.पटलावरती जमायला लागतात व माझे मन झाकोळून जाते. पण त्याच सवेदनक्षमतेमुळे आयुष्यभर मी लोकाशी अत्यत मृदुतेने वागलो. चागला वागलो व त्याचाही आनद कधी कधी मनाला होतोच.

माझ्या हाताखालच्या लोकाशी मी सदैव मृदू राहिलो आहे. माझा दृष्टीकोन नेहमीच सहानुभूतीपूर्वक राहिला आहे. कितीही रागावलो तरी मनाचा तोल काही कधी ढळला नाही. काही लोकाना आपल्या हाताखाली काम करावे लागत आहे, तो मी निव्वळ योगायोग मानला.

माझ्या हाताखाली त्यांनी येणे न येणे हे ठरवणे काही त्याच्या हाती नव्हते. माझ्याविषयी, ते काही कारणामुळे, स्पष्ट बोलू शकत नाहीत ही घटना मी नेहमीच माझ्या ध्यानात ठेवली आहे. प्रतिहल्ला करण्याच्या स्थितीत ते नसतात. म्हणून त्याचा गैरफायदा घेऊ नये. आपल्या हाताखालच्या लोकांशी उद्धटपणे वागण्यासारखा अधमपणा दुसरा नसेल. मी हायकोर्टात असतानादेखील नवख्या वकिलाना सदैव प्रोत्साहन द्यायचो. त्यामुळे आजही मी सुप्रीम कोर्टाच्या लायब्ररीत बसलो असताना एखादा वकील येतो व मी त्याच्याशी फार पूर्वी कोर्टात कसा चागला वागलो होतो याची आठवण करून देतो, तेव्हा कसे भरून आल्यासारखे होते.

बौद्धिक प्रामाणिकतेएवढे आयुष्यात मी दुसरे कशालाच महत्त्व दिले नाही. माझ्या अतर्मनाला मी कधीच फसवले नाही. मग भले मला कितीही वादळाला तोड द्यावे लागो. अतर्मनाच्या फसवणुकी एवढा गुन्हा दुसरा कुठला असेल असे मला वाटत नाही. पाप पाप म्हणतात ते हेच. गुन्हेगारी वृत्ती ती हीच. पण माझ्याबाबतीत माझ्या मनाशी मी सदैव प्रामाणिक राहिलो. मग काही वेळा माझ्या कृती समाजाला न आवडोत वा माझी वागणूक उच्चपदस्थाना नापसत पडो. माझ्या मनातल्या अर्तविचाराशी मी परिस्थिती बघून कधीच तडजोड केली नाही.

जेव्हा कामही कटाळवाणे होत चालले आहे अशा स्थितीला मी

येऊन पोहचलोय. चार भिंती तुमच्याकडे डोळे फाडफाडून बघत आहेत अशावेळी मला वाटते, की सुरवातीतच शेवट सामावला होता. आयुष्याच्या तरुणपणी हौसामौजा करताना म्हातारे व्हायची कला मी काही अवगत केली नाही. स्वत चीच स्वत ला सोबत यासारखे कटाळवाणे दुसरे काही नसेल. शेवटच्या मुक्तीवाचून यातून मार्ग नमतो. दुसऱ्या कुणी निदान प्रार्थना वगैरे तरी केली असती, पण माझा त्यातही विश्वास नाही.

पण केवळ कामच काही माझे आयुष्यातले एकमेव समाधान नव्हते लडनमध्ये मी विद्यार्थी असताना प्रत्येक नाटक मी बघत असे. नाटक, नाटचशास्त्र याचा मी प्रचड भोक्ता आहे. मला भारतीय नी पाश्चात्त्य दोन्ही सगीत प्रकार आवडतात. शास्त्रीय सगीत काही मला तेवढे अगदी जाणकारा एवढे समजत नाही पण गोडी मात्र जरूर आहे. पाश्चात्त्य सगीतात मला ऑपेरो सगीत काही फारसे मानवत नाही. सिंफनीज मला जास्त आनद देऊन जातात.

आयुष्यात मला अनेक लोकांचा चांगुलपणा लाभला, प्रेम लाभल. त्यातली पहिली व्यक्ती म्हणजे माझी बायको. माझी पत्नी म्हणजे माझा यशोताराच होती आयुष्यभर तिला आपला नवरा काय करीत आहे हे काही विशेष समजल नाही. पण प्रत्येक वेळी तिने माझी जी साथ केली, त्याला तोड नव्हती. कुठल्याही वेळी तिने मला कमीपणा आणू दिला नाही. मग भले 'आजूबाजूला राष्ट्राध्यक्ष असोत वा राजेमहाराजे. एका उच्च अधिकाऱ्याची बायको म्हणून ती कधीच कुणाशी तोऱ्याने वागली नाही. त्यामुळे तिच निधन झाल्यावर माझ्या वॉशिंग्टनमधल्या फर्स्ट सेक्रेटरीनी मला पत्र लिहिलं, त्यात त्यांनी लिहिल की, 'सर तुमच्या पत्नीविषयी आमच्या मनात प्रेम होत.' आयुष्यभर मी स्वार्थीपणे इतका कामात गढून राहिलो की, ती मला किती आवडते व तिच माझ्या मनातल स्थान काय आहे हे मी तिला कधी बोलूनच दाखवल नाही. आता मला त्याची खत वाटते. आता मला ते सागावस वाटत. पण मेलेल माणूस काही परत जिवत होत नाही. पण जगणाऱ्याला मात्र तसच जगत रहाव लागत.

माझ्या तीनही मुलाबाबत मी अत्यत समाधानी आहे. ती उच्च विद्याविभूषित आहेत. तिघानीही आतरधर्मीय विवाह केले आहेत, याचा मला आनंद वाटतो. ते स्वतःच्या पायावर व कर्तबगारीवर उभे आहेत. माझ्या अधिकाराचा फायदा त्यानी कधीच उठवला नाही. त्याबद्दल मला व त्याना सार्थ अभिमान वाटतो.

मला फारसे मित्र नाहीत. पण जे आहेत ते अगदी जिवाभावाचे आहेत. दैदिप्यमान यशापुढे सार जगच कौतुकाची बरसात करतं. पण आयुष्याच्या अपयशी, पडत्या क्षणीच तुम्हाला जरूर असते ती खऱ्या मित्राची. नवीन मित्र जोडण्यात मी फारसा काही कुशल नाही. जुन्या मित्रांवरतीच मी समाधानी आहे. अनेक लोकाशी माझा धावता सबध आला आहे. पण तो सबंध म्हणजे एका बोटीवरल्या माणसाने दुसरी बोट जवळून जाताना, त्या बोटीवरील माणसाला दाखवलेली ओळख. माणसही लक्षात रहात नाहीत की प्रसगही ध्यानात रहात नाहीत.

यावेळी मला मी ऑल इंडिया रेडिओवरून २७ मे १९५८ रोजी केलेल भाषण आठवत. 'अॅज आय लुक बॅक' हा विषय होता. त्या वेळी मी म्हणालो : 'आयुष्याच्या अतापर्यंत आल्यानतर समोर पसरलेल विस्तीर्ण क्षितिज जेव्हा मनुष्य पहातो तेव्हा सहाजिकच कुठल्या रस्त्याने आपण आलो, कुठं आपल्याला खरचटलं याचा वेध घेण्याकरता पाठी वळून बघतो. याच वेळी कुठल्या सधी त्याने गमावल्या वा कुठली स्वप्नं भगली याचाही त्याने वेध घेतला पाहिजे. याच वेळी प्रत्येकान आपल्यालाच विचारायच असत की, काहीतरी अक्षर अस आयुष्यान आपल्याला शिकवलय की आयुष्य म्हणजे नुसतीच कटाळवाणी दमछाक ठरली आहे ! कुठल्या प्रसगात कुणी आपल्याला मदत केली आहे याचाही आपण विसर पडू देऊ नये. सार काही 'मी' केलं यासारखी भ्रामक वल्गना दुसरी नसेल. स्वत च्या शक्तीवर सार काही उभारलं ही कल्पना अत्यत कोती आहे. अनेक वेळेला परिस्थितीच माणूस घडवते. माणूस फार क्वचित वेळा परिस्थिती घडवतो. ते केवळ लोकोत्तरानाच साध्य होत.

चुका करण्याची माणसाची क्षमता अफाट आहे. त्यामुळे दुसऱ्याला सदैव जाणून घ्यायचा आपला दृष्टिकोन असला पाहिजे. दुसऱ्याही बाजूत तथ्य असू शकेल ही जाणीव मनात बाळगली पाहिजे.

जितके जास्त दिवस आपण जगतो तितक आपल्याला सहनशक्तीच महत्त्व कळायला लागत. व्यक्तीच्या प्रतिष्ठेमध्ये ज्याचा विश्वास आहे त्याच्यातच सहनशक्ती असू शकते.' दुसऱ्यालाही स्वत च्या आयुष्याशी प्रयोग करण्याचा हक्क आहे हे ही तेव्हाच कळतं. त्याना दिसत असलेल्या प्रकाशानुसार जगायचा त्याना हक्क आहे हे ही सहनशक्तीशिवाय कळत नाही.' तो प्रकाश शहरातला नसेल; एखाद्या डोगर माथ्यावरला तो प्रकाश असेल किंवा एखाद्या मलूल गुहेमधला असेल.

तारा जरी आपल्याला पकडता येणार नाही हे ठाऊक असले तरी ते स्वत पाशी बाळगण्याच्या जिद्दीनेच आयुष्याच्या धकाधकीत उतरल पाहिजे. प्रचड काहीतरी गवसण्याची मनीषा आपण उरी बाळगली नाही तर आयुष्य अत्यत रटाळ व कटाळवाण होत.

आयुष्याच्या धकाधकीला, प्रश्नाना तोंड चुकवून काही माणस पाठी फिरतात. मला ही सन्यासी वृत्ती अजिबात आवडत नाही. अनेक लोक जगण्याकरता अक्रोश करीत असताना त्याचे प्रश्न सोडवायचे सोडून केवळ स्वत पुरतच बघून परिस्थितीपासून दूर जायच, हे काही मला पटत नाही. त्यामुळे, यशाची व परिणामाची अपेक्षा न करता कर्तव्य करीत रहाण्याची भगवत्गीतेतली निःसग वृत्ती मला जास्त आवडते.

सर्वांनाच आनद मिळवता येईल अशी काही जगाची रचना नाही आहे. पण समाधान मात्र जरूर प्रत्येकाला मिळवता येईल. कुठलीही काम चागल्या रीतीने केल्यावर समाधान लाभत. त्या कामाच्या रूपाने जी यशापयश आपण मिळवीत जातो ती केवळ निमित्तमात्र असतात. खर समाधान आपण आपल कर्तव्य कस बजावतो यातच मिळतं. आयुष्याच्या शेवटी वळून बघताना मला हे निश्चित जाणवत आहे, की मृदुता व चागुलपणा दाखवायला काही खास परिश्रम करावे लागत नाहीत की त्याकरता कोठे शिक्षण घ्यायची जरूर नसते. पण याच दोन गुणानी तुम्ही अनेकाच्या हृदयाच्या तारा छेडू शकता. व तुमचे हेच गुण लोकाच्या मनात ठसतात.

शेवटी आयुष्य आहे तरी कस ? सावली दिवलीचा हा जणू खेळच आहे. आनद, दुःख, यशापयश याच विचित्र मिश्रण आहे. आयुष्य अनेकरंगी आहे, विविध ढगी आहे. त्याला अनेक पैलू आहेत. पण शेवटी आयुष्य हे एक धाडस आहे, की दोन निद्रामधली एक त्रासदायक वाटचाल आहे, की त्रासदायक मध्यतर आहे हे ज्याचे त्यानेच ठरवल पाहिजे.

**समाप्त**

# प्लासीचा रणसंग्राम

लेखक : कर्नल मेडोज टेलर

लेखनकाल : १८६५

विषय : प्लासीची लढाई आणि नबाव सिराजउद्दौल्याची विचित्र दैवगती

निवेदक : दि. बा. मोकाशी

नमुना म्हणून कादंबरीतील १७ ते २२ ही पाच प्रकरणे पुढे दिली आहेत.....

पहाटे सोजन जागी झाली, ती नबाबाने तिचा हात घट्ट धरून ओढल्याने नबाब झोपेत घाबरलेला होता. त्याच्या तोंडावर घाम दिसत होता व तो ओरडत होता–सोजन ! सोजन !

सोजन उठून बसली. नबाब अजून अर्धवट स्वप्नात होता. तो काकुळतीने म्हणाला, 'सोजन ! मला सोडून जाऊ नको. मला फक्त तुझाच आधार आहे.'

सोजन त्याला हलवीत म्हणाली, 'आपणास स्वप्न पडले आहे खुदावत ! जागे व्हा. घाबरू नका. आपण जिंकलेल्या इंग्रजाच्या किल्ल्यात आहोत. सर्व ठीक आहे.'

नबाबाने जागे होऊन सोजनचा हात बाजूला केला. पण स्वप्नाचा परिणाम अजून होताच. तो ओरडला, 'कुठे आहे तो ? तोच तो फकीर ! सोजन मला वाचव.' असे म्हणून त्याने सोजनच्या अंगा-वर डोके टेकले.

स्वप्न फार भयकर असावे अशी सोजनची खात्री झाली. ती म्हणाली, 'खाविंद ! आपल्याला काही तरी वाईट स्वप्न पडले. कालच्या दगदगीचा हा परिणाम असेल. फकीरबिकीर इथे कुणी आला नाही मी एकटीच इथे आहे.'

नबाब ओरडला, 'त्याचे डोळे ! भयकर डोळे. सोजन, माझ्या-कडे ते कसे वटारून पाहात होते. तुला असे स्वप्न पडले असते तर तूही घाबरली असतीस, छे ! मला ते डोळे विसरले पाहिजेत. उजाडले का ?'

उजाडत आले आहे, महाराज. तरी एक झोप होईल. सर्व सैन्य शिणले आहे. आज उशिरा हालचाल सुरू होईल.'

'नाही, आता मी झोपणार नाही. पुन्हा ते स्वप्न पडेल. तो फकीर. ते डोळे ! तू मला कालच्या युद्धाची सविस्तर हकीगत साग. तू कशी लढलीस मला ऐकावयाचे आहे.'

'लढाईचे बोलणे नको खाविंद ! कलकत्ता आपण जिंकले. आज-पर्यंत फिरंग्याची खोड मोडावयास कुणी धजले नव्हते आपण त्याची पक्की खोड मोडली आहे. आपणास या लढाईत विजय मिळेल असे फकीराने सागितले होते ते खरे झाले.'

'होय !' नबाब म्हणाला, 'पण त्याने आमची निंदा केली. आमची निंदा कुणी केली तर त्याचे प्रायश्चित्त त्याला दिलेच पाहिजे. ते मी दिले. तो फार उद्दाम वागला. असो, फिरंग्याविरुद्ध माझ्या बापाने जे केले नाही; किंवा जे करावयाचे त्याला धाडस झाले नाही, ते मी केले. तू लढाईवर जाऊ नये म्हणून मी पाय मागे घेतला असता. बरे तुझे मी ऐकले. इंग्रज आता माझे नाव ऐकताच थरथर कापतील. त्याना चागला वचक बसेल. कलकत्त्यास जी लूट मिळेल ती सर्व तुझी. फक्त पकडलेल्या फिरंग्याना मी शिक्षा ठोठावीन तेव्हा तू तेथे असू नयेस.'

सोजन म्हणाली, 'महाराज ! इंग्रज माझेही शत्रूच. पण आपला जय झाला आहे व आपण दयाळू आहात. त्यांच्याकडून आता काही वाईट होण्याची धास्ती नाही. तेव्हा जे कुणी सापडले आहेत त्यांच्याकडे दयेच्या दृष्टीने पाहा.'

'मी दया करीन. पण आपला मौलवीसाहेब त्यांच्या रक्ताला पिपासला आहे.'

सोजन म्हणाली, 'नबाबसाहेब ! त्यांच्या रक्ताची तहान कालच्या युद्धाने भागलीच पाहिजे. आता अधिक प्राणहानी करणे योग्य नाही.'

'मला प्राणहानीचे काही वाटत नाही. लढाईत हे होणारच.' नबाब म्हणाला, 'तू आता झोप काढ. मला आज दिवसभर कामे आहेत. तुला सध्याकाळशिवाय मला भेटता येणार नाही.' एवढे बोलून नबाब उठला व पोशाख करून बाहेर गेला.

नबाब गेल्यावर सोजनने एक झोप काढली. तिचे सगळे अंग ठण-कत होते. बऱ्याच उशिरा ती जागी झाली. मग नास्ता घेऊन सरबत पिऊन नबाब येणार नाही म्हणाला होता तरी त्याची वाट पाहात राहिली व त्याला येण्याबद्दल निरोप धाडीत राहिली. येण्यास सध्या-काळ होईल असा निरोप आला. पण तिला खरी कैद्यांची काय हकीगत झाली हे पाठविलेल्या माणसाकडून काढून आणावयाचे होते. त्या माणसाने प्रथम सर्व इंग्रजाना कोठडीत कोडले होते त्याची हकी-गत सांगितली. मग सकाळी नबाब तेथे गेल्यावर कोठडीतील इंग्रजांची अवस्था पाहून तो पहारेकऱ्यावर रागावला व इंग्रजाना बाहेर काढण्याचा त्याने हुकूम दिला. कोठडीत इंग्रजाना ठेवा एवढेच

त्याने सांगितले होते. पण पहारेकऱ्यांनी मात्र एवढ्याशा जागेत ते मावतील की नाही वगैरे व पाहता त्यांना त्यात कोंबले होते. जेव्हा सैनिक पहारेकऱ्याना बाहेर काढू लागले तेव्हा दाराशी इतके मृत देह पडले होते की बाहेरून दार आत लोटले जाईना. आत जे थोडे इंग्रज उरले होते ते इतके अशक्त झाले होते की ती प्रेते ओढताना त्यांची शरिरे थरथर कापत होती. शेवटी कसेतरी दार उघडल्यावर आतला भयकर देखावा पाहावत नव्हता. आत प्रेते कुबट उष्ण हवेने कुजून दुर्गंध सुटला होता. ती अस्ताव्यस्त एकमेकांवर पडली होती. जे जिवत होते ते त्या प्रेतावरून कसेतरी धडपडत झोक जात चालत बाहेर आले त्यांच्या छातीतून कळा येत होत्या. बाहेरची थड मोकळी हवा लागताच त्यातले काही तीही सहन न होऊन खाली पडले. चेहरे पांढरे पडले होते. डोळे सुजले होते. त्याना धड बोलताही येत नव्हते.

त्यांचा पुढारी हॉलवेल प्रथम बाहेर आला. मग एकमेकाना आधार देत उरलेले बाहेर आले. पहारेकऱ्यांनी सर्वांना तेथून दूर नेले. मग हॉलवेलला नबाबाने बोलावणे धाडले. व हॉलवेलला तिकडे नेण्यात आले.

सेवकाकडून हे सारे ऐकत असता आपला जीव वाचवणारा स्मिथ्सन हा वाचला की नाही हे सोजनला ऐकावयाचे होते. मेरीला तिने वाचवून तबूत आणले होते. तिला दूर कसे धाडावे याही चिंतेत ती होती. तिचे सौदर्य पाहिल्यापासून एकदा वाटलेली धास्ती तिला पुन्हा वाटू लागली होती. नबाब तिच्यावर भाळेल.

जे साहेब वाचले त्याचे वर्णन तिने पुन्हा पुन्हा सेवकाला विचारले. तिची जेव्हा खात्री झाली की वाचलेल्यात स्मिथ्सनसाहेब आहे तेव्हा तिला बरे वाटले. खूप वाईट आयुष्य तिने घालविले होते. एवढे दोन प्राण वाचवण्याचे सत्कृत्य हातून घडले याचे समाधान तिला विलक्षण सुख देत होते.

इकडे नबाबाने सर्व किल्ला शोधून इग्रजांचा अनेक किंमती माल, सोने, नाणे, हिरे माणके वगैरे माल एकत्र केला होता. त्याचा लिलाव सुरू होता. त्या लिलावासाठी जगतशेटचे गुमास्ते, अमीचद व दुसरे व्यापारी जमा झाले होते. हे सर्व पाहात उद्विग्न व हताश होऊन हॉलवेल, स्मिथ्सन वगैरे इग्रज कैदी दूर बसले होते. त्यानी आपल्या जिवाचा हवाला दैवावर ठेवला होता कारण लूट फार न मिळाल्याने नबाब रागावला होता.

लिलावासाठी उभारलेल्या मोठ्या तबूत एकच गर्दी झाली होती. गावातील व्यापारी व सराफ जमले होते. पर्शियन लिहिता येणारे कारकून याद्या करण्यात गुतले होते. मध्यावर नाण्याचा मोठा ढीग होता.

त्याकडे पाहात नबाब ओरडून म्हणाला, 'काय! फक्त पन्नास हजार रुपयेच. मी काय एखादे लहान मूल आहे? माझी समजूत घालतात काय? काय एवढ्याशा भांडवलावर इग्रजांनी आपला प्रचड व्यापार चालविला होता? हॉलवेलकडे पाहून तो ओरडला, 'बोला! कुठे द्रव्य ठेवले आहे? लौकर सांगा नाहीतर भयकर परिणाम होतील.'

हॉलवेल म्हणाला– 'नबाबसाहेब! आम्ही कैदी आहोत. तुम्हाला आमचे हवे ते करता येईल. खजिन्यात एवढेच द्रव्य होते. तुमच्यापुढे हिशोबाच्या वह्या आहेत. त्या तपासा त्यावरून कळेलच.

नबाब आणखी काही ओरडणार, तोच एक खोजा आत आला. तो जनानखान्यातला खोजा होता. तो तडक नबाबाच्या मागे जाऊन उभा राहिला व हळूच नबाबाच्या कानात काहीतरी कुजबुजला. ते ऐकताच नबाब गादीवरून उठला. पण पुन्हा बसला आणि पुन्हा नाण्याबद्दल बोलू लागला. खोजाने जे सागितले त्यामुळे तो अस्वस्थ झाला होता. आता समोरच्या प्रकारात त्याचे पूर्वीसारखे मन नाही हे पाहाणाऱ्याच्याही लक्षात आले. ज्यांना तो खोजा जनानखान्यातला आहे हे ठाऊक होते त्याना तर अधिकच कुतूहल वाटू लागले नबाब इतका अस्वस्थ होण्याचे कारण काय याची कुजबुज लोकात सुरू झाली. आता आकाशात ढग जमून पावसाची सुरुवात होणार असे वाटत होते. ढगामुळे सध्याकाळ लौकरच उतरली होती. कारकुनाना कमी प्रकाशामुळे वाचणे कठीण होऊ लागले.

नबाब क्षणाक्षणाला अधिक अस्वस्थ आणि वैतागवाणा होत चालला होता. एक तर लूट अपेक्षे पेक्षा कमी मिळाल्याने त्याचे मन लिलावातून उडाले होते. आणि खोजाने जे येऊन सागितले ते मनात येऊन त्याचा संताप वाढत चालला होता. ही कोण तरुण सुदर बाई सोजनने लपवून आणून ठेवली असेल. इग्रजाबरोबरची ही बाई असावी. सोजनच्या हाती ती कशी लागली आणि मला चोरून तिने तिला का आणले? आणि मला चोरून तिने तिला दूर धाडण्याचा यत्न का करावा? ती फारच सुंदर असली पाहिजे– असले विचार खोजाने 'सोजनच्या तबूतून पळून चाललेली एक बाई पकडली आहे.' असे कानात सागितल्यापासून नबाबचे मनात येत होते.

नबाबाला आपले मन आवरेना. त्याने दरबार बरखास्त केला. आणि उठून आपल्या तबूकडे चालू लागला. खोजानी धावत पालखी आणली. नबाब ओरडला, 'लौकर पाय उचला.'

सोजन आज नबाबची लाडकी होऊन बसली होती. सर्व जनानखान्यावर ती मुख्य होती तरी पूर्वीच्या बेगमेची माणसे अजून होती व सोजनला ती पाण्यात पाहात होती. सोजनच्या सेवेत असलेली एक दासी त्यातलीच होती. तिने सोजनने आणून ठेवलेली तरुण स्त्री पाहिली आणि जुम्मा म्हणून एक खोजा तिचा मित्र होता त्याला सागितले. जुम्माने वेळ न दवडता ती गोष्ट नबाबाच्या कानावर घातली. एक सुदर मुलगी सोजनने इग्रजांकडून आणून लपवून ठेवली आहे आणि आपल्याला न कळवता ती परस्पर दूर धाडून देणार आहे हे नबाबाला कळल्यावर तो सतापला होता. दरबार खलास करून तो तातडीने निघाला. ज्या अर्थी सोजन त्या मुलीला आपल्या मागे दूर धाडून देत आहे त्या अर्थी ती अतिशय सुदर असली पाहिजे ही त्याची खात्री झाली होती.

सोजनच्या तबूपर्यंत येईपर्यंत तो फणफणला होता. त्याच्या स्वभावाप्रमाणे सोजनला मनातून काही दिवस कटाळला होता. या लढाईच्या प्रकरणामुळे सोजनच्या बाबतीत विचार करायला त्याला वेळही मिळाला नव्हता. शिवाय सोजन कोणत्याही अपराधात अजून सापडली नव्हती. आता तिने मोठा गुन्हा केलेला कळताच आपण भयंकर सतापलो आहोत असा आणखीनच आविर्भाव नबाबाने आणला.


हरित क्रांति... नजर ठरत नाही इतक्या दूरवर पसरलेली भरदार, लसलसती पिके... म्हणजे भुकेल्या, लाखो जीवांना पोटभर अन्नाची शाश्वति... भारताच्या कृषि-क्षेत्रातील विजयाची हिरवीगार पताका... सुंदर स्वप्नांचे जिवंत आकार.

उत्तम बियाणे, खते, कीटकनाशके आणि शास्त्रशुद्ध नवी तंत्रे... यापेक्षाहि शेतीची अधिक महत्त्वाची गरज म्हणजे पाणी... गरजेनुसार यथाकाळी, यथायोग्य प्रमाणात देता येईल इतके मुबलक पाणी.

कितीहि पाण्याची गरज असो. ती पुरी करून भारतात-अन्नधान्याची समृद्धी निर्माण करण्याच्या प्रयत्नात 'किर्लोस्कर पंप' सदैव आपल्या सोबत आहेत.

'किर्लोस्कर पंप' अनेक आकाराचे व प्रकारचे मिळतात ... छोट्या मोनोब्लॉकपासून मोठ्या व्हर्टिकल पंपापर्यंत. विहिरी, नद्या, स्वच्छ पाणी, गढूळ पाणी, तेल, चिकट द्रव, ॲसिड, रसायने, पल्प इत्यादींसाठी उपयुक्त 'किर्लोस्कर पंप'


## किर्लोस्कर पंप सर्वोत्तम पंप



किर्लोस्कर

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.**
उद्योग भवन, टिळक रोड, पुणे-४११ ००२
कार्यालये : अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, कलकत्ता, नवी दिल्ली, इंदूर, जयपूर, मद्रास व सिकंदराबाद.

® Registered users : Kirloskar Brothers Ltd.




PRATIBHA-724A MAR

नबाब सोजनच्या तंबूकडे येत होता. त्याच वेळी सोजन मेरीला, इंग्रजांकडील त्या मुलीला तेथून बाहेर काढण्याच्या खटपटीत होती. तिच्याशी बोलायला मिळाले तेवढ्या वेळात सोजनला कळले होते की ही मुलगी बंगालीच असून ज्या इंग्रजाशेजारी ती लढत होती त्याच्याशी तिने लग्न केले होते. जेव्हा नबाबाचा वेढा पडला व इंग्रजी स्त्रिया व मुले यांना मचव्यात बसवून धाडण्यात आले तेव्हा ती एका इंग्रजाची बायको असूनही केवळ ती काळी आहे म्हणून इतर गोऱ्या स्त्रियानी तिला मचव्यात न घेता किल्ल्यातील सकटात सोडली होती. सोजन इंग्रज स्त्रियाचा हा दुष्टपणा ऐकून थक्क झाली होती आणि तिला मेरीबद्दल अधिकच प्रेम वाटू लागले होते.

नबाब येण्याच्या आत तिला धाडावयाचे होते. अंधार पडू लागताच सोजनने तिची तयारी केली. एक कांबळे तिला पांघरून घेण्यास सांगितले, तिला नेण्यासाठी नासीर आला तेव्हा कळवळून सोजनने तिचा निरोप घेतला. तंबूच्या दाराबाहेर ती नासीरबरोबर आली नाही तोच नबाबाच्या पालखीपुढे चालणारे तंबूशी पोहोचले व त्यांच्या मशालीचा उजेड दोघांवर पडला. नासीरने दचकून मेरीला आत लोटण्याचा यत्न केला.

'नबाब पालखीतून ओरडला ' पाहाता काय ! पकडा त्याना ! जनानखान्यातून यावेळी बाहेर कोण जाताय ? कोण आहे तुझ्या-बरोबर ? नासीर ?' खोजांनी पुढे होऊन मेरीच्या तोंडावरचे कांबळे दूर केले. मशालीच्या उजेडात तिचा सुदर चेहरा सर्वांनी पाहिला. लगेच जुम्माने तिला उचलले आणि आत नेले. नबाब रागाने ओरडला,

'नासीर ! तू तिला पळून जायला मदत करीत होतास ना ? बोल ? कोण आहे रे तिकडे. याचे शीर उडवा.

'नासीर थरथर कापत जमिनीवर लोळण घेत म्हणाला,– सुलतान ! दया ! मी गुन्हेगार नाही.'

तेवढ्यात सोजन तंबूबाहेर आली आणि म्हणाली,–

'खुदावन्त ! नासीरचा यात काही अपराध नाही. मीच त्याला माझ्या हुकूमात हे करायला सांगितले. ती एक गरीब लहान मुलगी आहे. एवढ्या लहान कारणासाठी तुम्ही एवढे का रागावता ?'

नबाब चवताळून पालखीतून उतरून सोजनवर तलवार उपसून धावला. पण ती एक पाऊलही मागे सरकली नाही. ती म्हणाली,–

'अहो नबाब नामदार ! ही माझी मान तयार आहे. चालवा तलवार. आणि हे सर्व का होतय ? मी तुमच्यावर प्रेम केले, किल्ल्याच्या लढाईत प्राण पणाला लावले म्हणून ! अफसोस !'

सोजन बोलताना रागाने पांढरी झाली होती. तशीच ती उद्विग्नही झाली होती. तिचा तो कोप पाहून नबाबाने तलवारीचा हात खाली केला. तो म्हणाला,

'तू चेटकीण आहेस. डाकीण आहेस. तू मला भुरळ घातलीस.' मग सेवकाकडे वळून म्हणाला, 'हिला बांधा आणि जनानखान्या-तल्या खोजाच्या ताब्यात द्या. हिच्या पायात बेड्या ठोकून हिला मुर्शिदाबादेस पाठवा. रुस्तूम ! मी हिला तुझ्या ताब्यात देत आहे. जर का ही निसटली तर तुझे डोके उडवीन.' जरा थांबून तो म्हणाला, 'हिला बेगमेबरोबर तळघरात ठेवा.'

एवढे बोलून नबाब मेरीला तंबूत नेली होती तिकडे गेला. सोजनच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा चालल्या होत्या. रुस्तूम तिला म्हणाला, 'बाईसाहेब ! आपल्या दैवाने पलटी खाल्ली आहे. उठा ! थांबलात तर नबाब आणखी रागावेल.'

सोजन म्हणाली,–'खरोखर माझ्या दैवाने पलटी खाल्ली आहे. असे म्हणून ती मुकाट्याने रुस्तूम मागे चालू लागली.

¤

कर्नल क्लाईव्ह हा इ. स. १७५५ मध्ये गव्हर्नर म्हणून हिंदुस्थानात आला. त्या आधीही त्याने हिंदुस्थानात राहून काही कामगिऱ्या बजावल्या होत्या. जेव्हा नबाबाने कलकत्त्याची इंग्रजाची वखार जाळली व किल्ला घेतला तेव्हा तो सेंटडेविडच्या किल्ल्यावर गव्हर्नर म्हणून होता.

रॉबर्ट क्लाईव्हचा जन्म इंग्लंडमध्ये श्रापशायर प्रांतात इ. स. १७२५ च्या सप्टेंबर महिन्याच्या एकोणतीस तारखेस झाला. त्याच्या वडिलाचे नाव रिचर्ड होते. पुढे लॉर्ड या पदवीला चढणारा रॉबर्ट बालपणी अतिशय व्रात्य होता. बाप त्याला कटाळून गेला व त्याने रॉबर्टला इस्ट इंडिया कंपनीत लहानशा जागेवर चिकटवून दिला. इ. स. १७४४ मध्ये तो ब्राझीलमध्ये नोकरीवर रुजू झाला. तेथे तो थोडी पोर्तुगीज भाषा शिकला. मग त्याला हिंदुस्थानात कंपनीच्या मद्रास येथील वखारीत कामाला धाडण्यात आले.

रॉबर्ट क्लाईव्हला लिहिण्यावाचण्याचे काम आवडत नसे. तो खर्चिक होता. त्याला पगारही पुरत नसे, त्यास बरेच कर्ज झाले. मद्रासची हवाही त्याला मानवत नव्हती व अधिकाऱ्याची बोलणीही त्याला असह्य झाली. कटाळून त्याने आत्महत्त्या करण्याचा दोनदा प्रयत्न केला. पण दोन्ही बार फुकट गेले. मग त्याला वाटले ज्या अर्थी आत्महत्त्या करण्याचे आपले यत्न फुकट गेले त्या अर्थी काही तरी मोठी कामगिरी आपल्या हातून घडविण्याची परमेश्वराची इच्छा आहे.

पुढे लौकरच इ. स. १७४६ च्या सप्टेंबरच्या १० तारखेला फ्रेंच सरदार लाबर्डो याने मद्रास सर केले. आणि तेथील इंग्रजास कैद केले. खंडणी घेऊन या इंग्रजास सोडण्याचे त्याने कबूल केले पण त्यांचा वरिष्ठ अधिकारी डुप्ले याने ते ऐकले नाही व इंग्रज कैद्यास पांडेचरीस नेण्याचे ठरविले. मधल्या वेळात क्लाईव्ह याने मुसलमान वेष घेऊन कैदेतून सुटका करून घेतली व पळून तो सेंट डेव्हिड येथे इंग्रजास जाऊन मिळाला. तेथे त्याने लष्करात नोकरी धरली. त्याचे वय तेव्हा एकवीस होते.

त्यानंतर लगोलग फ्रेंच सैन्याने सेंट डेव्हिड किल्ल्यास वेढा घातला. हा किल्ला मद्रासपासून १०० मैलांवर होता. या वेढ्याचे वेळी लष्करी शिक्षण नसताही क्लाईव्हने इतके चातुर्य व धैर्य दाखविले की किल्ल्याचा सेनापती मेजर लॉरेन्स याने त्याला शाबासकी दिली. त्याचे नाव सर्वत्र झाले पण तेवढ्यात फ्रेंच व इंग्रज याच्यात तह होऊन लढाई थांबली तेव्हा क्लाईव्हला तलवार सोडून लेखणी हाती घ्यावी लागली.

इ. स. १७४८ वर्षांच्या अखेरीस निजामुल्मुक एकशे चार वर्षांचा होऊन मरण पावला. त्याचा दुसरा मुलगा नासिरजंग गादीवर बसला. या वेळी अन्वरुद्दीन हा अर्काटचा नबाब होता. या दोघासही

दोन प्रतिस्पर्धी उत्पन्न झाले नासिरजगाच्या प्रतिस्पर्ध्याचे नाव नाव मुफजरजग होते. तो निजाममुल्मुकाच्या मुलीचा मुलगा होता. आणि अन्वरुद्दीनच्या प्रतिस्पर्ध्याचे नाव चदासाहेब असून तो अर्काटच्या माजी नवाबाचा जामात होता. या दोघानी मिळून चाळीस हजार सैन्य जमविले आणि त्यानी फ्रेंचाचे सहाय्य मागितले. फ्रेंचानी तत्काल दोन हजार काळे व चारशे गोरे असे सैन्य मदतीला पाठविले. या सयुक्त सैन्याने अबूर येथे इ. स. १७४९ च्या जुलै महिन्यात अन्वरुद्दीनवर हल्ला केला. त्याची फौज केवळ दोन हजार होती. त्याचा पराभव झाला, तो मारलाही गेला. त्याचा मुलगा महमदअल्ली त्रिचनापल्लीस पळून गेला. चदासाहेबाने त्याही किल्ल्यास वेढा घातला. इग्रजानी महमदअल्लीचा पक्ष घेतला होता. त्यामुळे हा वेढा कसा उठवावा याचा त्याना विचार पडला.

पण बुद्धीमान क्लाईव्हला युक्ती सुचली. शत्रूवर समोरासमोर लढाई देण्याचे आपल्यात सामर्थ्य नाही तेव्हा तो नाद सोडून आपण शत्रूच्या मूळ ठिकाणावर अर्काटवर हल्ला करावा म्हणजे चदासाहेब आपल्या राजधानीच्या रक्षणाला वेढा उठवून परतेल अशी त्याने कल्पना काढली. ही कल्पना सर्वांस पटली आणि सेनापतीने दोनशे गोरे व तीनशे काळे असे सैन्य क्लाईव्हच्याच अधिपत्याखाली अर्काटवर धाडले. क्लाईव्ह अर्काटवर गेला तेव्हा मुसळधार पाऊस पडत होता. तेथे रक्षणासाठी अगदीच थोडे सैनिक होते. क्लाईव्हने ते शहर केव्हाच हस्तगत केले. व इ स. १७५१ च्या ऑगस्ट एकतीसला महमदअल्ली हा नवाब बनला.

अर्काट शहर इग्रजानी घेतले हे कळताच चदासाहेबानी आपला मुलगा राजासाहेब यास ४००० सैन्यानिशी तिकडे रवाना केले. त्याच्याबरोबर तीनशे फ्रेंच सैनिक होते. या सैन्याने अर्काटला वेढा घातला. असे होणार हे क्लाईव्ह जाणून होता. म्हणून त्याने दारूगोळा व अन्नसामुग्री याची जय्यत तयारी ठेवली होती. पण नतर गुमीचे राजे मूरारराव याने इग्रजास सहा हजार सैन्य धाडण्याचे कबूल केले. पण ते सैन्य येण्यापूर्वीच राजासाहेब घाबरून वेढा उठवून पळाला.

राजासाहेबाने परतताना मद्रासच्या आसपासची इग्रजाची घरे व बागा उध्वस्त केल्या. तेव्हा त्याच्यावर चालून जाऊन क्लाईव्हने त्याचा पुरा मोड केला. त्या झटापटीत शभर फ्रेंच ठार झाले.

क्लाईव्हच्या बाळपणाकडे पाहिले तर क्लाईव्ह इतका हुषार, मुत्सद्दी निघेल असे वाटले नव्हते. क्लाईव्हचा एक अधिकारी मेजर लॉरेन्स याने क्लाईव्हबद्दल लिहिले आहे– क्लाईव्हला भाग्यशाली असे लोक म्हणत. पण मला त्याची जी माहिती आहे त्यावरून मला असे वाटते की त्याची जी भरभराट झाली ती त्याच्या योग्यतेनेच झाली. दृढनिश्चय व समयसूचकता हे त्याचे दोन मोठे गुण होते. तो स्वभावसिद्ध योद्धा आहे.'

यानतर इ. स. १७५२ मध्ये क्लाईव्हने कावेलग व चिंगलपटण हे फ्रेंचांचे दोन किल्ले घेतले. त्यावेळी त्याच्याजवळ फक्त सातशे लोक होते. व त्याने युद्धाचे शिक्षणही घेतलेले नव्हते. नतर त्याने मद्रासला येऊन पास्कीलेन नावाच्या तरुणीबरोबर विवाह केला. मद्रासची हवा त्याला मानवेनाशी झाली, तेव्हा तो इ. स. १७५३ त आपल्या पत्नीसह इंग्लंडला गेला. तेथील लोकांनी त्याचा गौरव केला. तो येताना पुष्कळ द्रव्य घेऊन आला होता. त्यातले थोडे वडिलाना देऊन बाकीचे त्याने उधळून टाकले. इतक्यात हिंदुस्थानात पुन्हा इग्रज व फ्रेंच याच्यात वेबनाव उत्पन्न होऊन युद्धाचा रग दिसू लागला. तेव्हा सेट डेव्हिडच्या किल्ल्यावर त्याची नेमणूक होऊन इ. स. १७५५ मध्ये तो परत हिंदुस्थानात आला.

हिंदुस्थानात येताच त्याने प्रथम आग्र्याचे ठाणे घेतले. तेथ पुष्कळ तोफा, दारूगोळा व बारा लाख रुपये त्याच्या हाती लागले. या कामात पेशव्याच्या सैन्याने, त्याला पुष्कळ मदत केली. पण त्याने पेशव्यास एक पैही दिली नाही. इ. स. १७५६ च्या जून महिन्यात नबाब सिराजउद्दौलाने कलकत्ता घेतले. तेथे त्याने १४६ इग्रजास अधार कोठडीत कोंडून ठेवण्याची व त्यातले तेवीस सोडून उरलेले कोंडून मेल्याची बातमी त्याना कळली.

मग बातमी आली की इग्रजाची वखार जाळून जी मिळाली ती लूट घेऊन, कलकत्त्यास आपले थोडे लोक ठेवून नवाब मुर्शिदाबादेस गेला आहे क्लाईव्हला मद्रासला ही बातमी लागताच त्याने पाच-सहा लढाऊ जहाजाचा एक ताफला, ९०० गोरे व १५०७ काळे लोकाचे सैन्य घेऊन क्लाईव्ह नवाबावर निघाला आरमाराचा मुख्य वॉटसन होता व क्लाईव्ह सैन्याचा मुख्य होता.

क्लाईव्हचा प्रथम कलकत्त्यास जाण्याचा विचार होता. पण तेथे एवढ्या सैन्याची सोय होणार नाही हे जाणून तो हुगळीला आला तेथे येऊन क्लाईव्हने हुगळी व तेथील किल्ला घेतला, इतक्यात इग्लडमध्ये इग्रज व फ्रेंच लोकात युद्ध सुरू झाल्याची बातमी आली.

क्लाईव्ह सैन्यासह आपल्यावर येत आहे ही बातमी नवाबाला कळली.

¤

नवाबाने कलकत्ता घेऊन, क्लाईव्ह येईपर्यंत कलकत्त्यात सहा महिने शातता होती इग्रजाच्या नौका अधूनमधून किनाऱ्यावर दिसत पण त्यातून कुणीच उतरत नव्हते त्यामुळे ग्रहदशा फिरूनही जे सावकार त्याचे मित्र उरले होते, त्यानाही इग्रजांचे येथले वास्तव्य सपले असेच वाटू लागले. इग्रज गेल्यानतर परिस्थितीही वाईट झाली जिल्ह्याच्या अधिकाऱ्याकडून लिहून येऊ लागले की, 'इग्रजाचा व्यापार एकदम बद झाल्याने वसूलही बरोबर जमा होत नाही. तसेच दरबाराकडून शेतकऱ्यास सूट मिळाल्याशिवाय चालेलसे दिसत नाही.'

नवाबाने इंग्रजावर विजय मिळविला त्याचा परिणाम अटकळीहून निराळा झाला. प्रजाजनात असतोष निर्माण झाला. नबाबास लूटही फार मिळाली नाही खाकी रगाचे बरेचसे कापड हाती लागले पण ते विकून फार पैसे मिळतील असेही नव्हते. खुद्द नवाबाचा सेनापती माणिकचद मनातून इग्रजांच्या बाजूने होता. अमीचद, जगतशेठ व कलकत्त्यातील दुसरे व्यापारी इग्रजांचा लुटलेला मला घेण्यास धजत नव्हते. कलकत्त्याच्या सराफाचे मद्रास येथेही गुमास्ते होते. त्याच्याकडून तिकडून साकेतिक पत्रे येत. त्यात येथे लष्कराच्या तयाऱ्या जोरात चालू आहेत. लढाऊ जहाजे तयार होत आहेत लौकरच इग्रज कलकत्त्यावर चालून येणार आहेत. असे मजकूर येत होते. 'येथून जहाजे हाकारली' अशीही बातमी आली.

इंग्रज येणार हे कळल्याने तर इंग्रजांचा लुटलेला माल कुणी घेईना. इंग्रजांचे अभिष्ट चिंतणारे त्यांची वाटच पाहात होते. नवाबाच्या जुलुमास कटाळलेल्या लोकांनी इंग्रज यावे अशा प्रार्थनाही गुपचूप सुरू केल्या.

लौकरच इंग्रजांनी हुगळीवर येऊन कलकत्ता घेतले अशी बातमी आली.

नबाब क्रूर स्वभावाचा होता. क्रोधी माणसाच्या हातून एखादे अविचारी कृत्य घडून गेले तरी थोडीफार माणुसकी त्याच्यात असते. नबाबाच्या मनाला काळ्या कोठडीत मेलेल्या इंग्रजांचा प्रसंग अशा माणुसकीच्याक्षणी कधी कधी जाणवे. पण आता प्रकरण विकोपास गेले होते. इंग्रज परत आले होते. मारणे किंवा मरणे याशिवाय मार्ग नव्हता.

पण हाही विचार नवाबाला वेळेवर सुचला नाही इंग्रज आल्याचे त्याने हसण्यावारी घालविले. इंग्रजांविषयी दरबारात उपहासाने बोलणे सुरू झाले. नबाव म्हणू लागला, आलेले इंग्रज नसून आपले दोस्त फ्रेंच असतील. खुद्द विलायतेत इंग्रजाजवळ म्हणे दहा हजारही सैन्य नाही. शिवाय तेथेही फ्रेंच लोक त्यांच्यावर हल्ला करून त्यांना नामोहरम करीत आहेत.'

कलकत्त्यात इंग्रज येत असल्याचे कळूनही विजयाने फुगलेला नबाव स्वस्थ बसून राहिला.

¤

ज्या दरबार महालात गरीब बिचाऱ्या फकीरास कान कापून हाकून देण्यात आले होते, जो दरबार महाल एकदा इंग्रजांची मस्करी करण्यात हसण्याने खदखदून गेला होता, तेथेच आज नबाब बसला होता. भोवताली दरबारी होते. तेवढ्यात एक दूत धावऱ्या धावऱ्या आत आला, कुर्निसात करून त्याने नबाबाला एक पत्र दिले. दूताचा चेहरा पाहून सर्वांच्या पोटात धस्स् झाले. नबाबाने पत्र वाचून पाहिले आणि त्याचा चेहरा रागाने लालबुंद झाला पत्रात काय आहे याची प्रत्येकाला चिंता पडली. नबाबाने मोठ्याने पत्र वाचून दाखविले.

'हुगळी शहर इंग्रजांनी जमिनदोस्त करून हजारो मुसलमानांची कत्तल केली आणि पुष्कळ लूट मिळवली आहे. तेव्हा प्रजाजनांच्या व मुसलमानांच्या रक्षणासाठी नबाबसाहेब कुमक धाडण्याची कृपा करील का? की या भुरट्या चोरांचे फावणार? जहापनाह! असे झाल्यास आपली सर्वत्र नाचक्की होईल.'

पत्र वाचून नबाब उपहासाने मोठ्याने हसला. पण त्या हसण्यामागे थोडीशी भयाची गंभीरताही होती. एवढे थोडे सैन्य असूनही इंग्रजांनी नबाबावर चालून यावे याचे सर्वांना आश्चर्य वाटत होते.

पत्र वाचून नबाबाने दरबाराला सल्ला विचारला. पण कुणी बोलेना. नबाबाचा संताप पाहून सर्व हादरले होते. आपला सल्ला जर त्याला चुकीचा वाटला तर रागाच्या भरात नबाब डोके उडवील की कान कापील कोण सांगणार? नबाबाने एकदा सर्वांकडे पाहिले, या बातमीने सर्वांना राग आला आहे तसेच भीतिही उत्पन्न झाली आहे हे त्याच्या ध्यानात येऊन त्याला बरे वाटले. पण त्यांच्या गप्प बसण्याने तो खवळून म्हणाला—

'का असे गप्प का? बेईमान! तुम्ही सारे बायका आहात! अशा आणीबाणीच्या वेळी तुम्ही गप्प बसता? मला सल्ला द्यावासा कुणालाही वाटत नाही. निमकहराम!'

नबाबाच्या रागाच्या शब्दांचाही काही परिणाम झाला नाही. काही वेळ कुणी बोलले नाही. मग अफगाणांचा प्रमुख वृद्ध सरदार उभा राहून म्हणाला—

'जहापनाह! जेव्हा आपण कलकत्ता काबीज केले तेव्हा कोण पुढे होऊन लढले ते आपण विसरला काय? लढाई थांबली व काही काळ तलवार म्यानात राहिली तर तिला गंज चढतो असे तुम्हास वाटते का? तसे असेल तर आपले वाटणे चुकीचे आहे. आमच्या तलवारीची धार नेहमी तीक्ष्ण राहणार.' बोलता बोलता त्याने तलवार बाहेर उपसली, 'मात्र आपण आमच्याबरोबर शस्त्र हाती घेऊन लढाईच्या मैदानात या खेपेला उतरला नाहीत तर आमच्या हातून काही होणार नाही. सोजनसारखी स्त्रीसुद्धा तुमच्याहून चांगली.'

हा अफगाण सरदार धिटाईने बोलत असता त्याचे विश्वासू सैनिक अगदी सज्ज होऊन त्याच्याभोवती गराडा घालून होते. अशा बोलणाराचे या दरबारात काय होते हे त्यांना ठाऊक होते. अफगाण सरदाराचे हे धीट बोलणे नबाबाची खुशमस्करी करणाऱ्यांना आवडले नाहीच. ते ओरडू लागले, 'हा नबाबसाहेबांचा अपमान आहे, राजद्रोह आहे. याला ठार करा.' त्यांनी सपासप तलवारी म्यानातून उपसल्या. क्षणभर दरबारात कोलाहल माजला. तो वृद्ध अफगाण सरदार जागी निश्चल उभा होता व त्याचे अनुयायी आपल्या ढाली त्याच्यावर धरून तलवारी उपसून उभे होते. दरबारी लोकांची या अफगाणावर येण्याची हिंमत होईना. आत गडबड ऐकून नबाबाचे द्वार रक्षकही आत आले. पण या गोंधळात कुणावर हल्ला करणेही कठीण होते शेवटी नबाब ओरडला—

'खामोश!'

ओरडून तो आपल्या आसनावर उभा राहिला. त्याचा महालात जाण्याचा पाठीमागचा दरवाजा उघडून जुम्मा उभा होता. नबाब म्हणाला, 'असे हमरीतुमरीवर येऊ नका. तलवारी म्यान करा. नूरखान! ही झगड्याची जागा नाही.'

जुम्मा नबाबाजवळ येऊन हळूच म्हणाला, 'खाविंदांनी आत यावे! आम्ही नंतर या म्हाताऱ्या नूरखानची चटणी उडवू.'

पण नबाबाला तशी भीती नव्हती. त्याचे अंगरक्षक भोवताली होते. तो शांतपणे नूरखानला म्हणाला, 'नूरखान! माझे म्हणणे ऐकून घ्या. मी जेव्हा बोलावीन तेव्हा लढाईत तुम्ही याल ना? एक मित्र व विश्वासू सरदार म्हणून वागाल ना?'

नूरखान म्हणाला, 'खाविंद! आपणा दोघांस जो ओळखतो अशा विश्वासू माणसाबरोबर निरोप धाडलात तर जरूर येईन. खरा मुसलमान मरणाला भीत नसतो. त्यातून आपण आमचे अन्नदाते नबाबसाहेब! आम्ही आता रजा घेतो.'

'ठीक' नबाब म्हणाला, 'बोलावणे धाडताच या.'

नबाब इतके बोलून पाठीमागच्या दाराकडे गेला व आपल्या महालात शिरला. शिरता शिरता त्याने जुम्माला विचारले—

'काय रे, ती कुठे आहे?'

'आत आहे. पण खाविंद! नूरखानाचे शीर कापून आणू का?'

'आताच नको ' नबाब म्हणाला.

' त्याने भर दरबारात आपला अपमान केला. '

' अजून वेळ आली नाही. ' नबाब म्हणाला.

अशी वेळ कित्येकांवर आली होती व येणार होती. नबाबाच्या लहरी व क्रूर स्वभावाने या दरबारात कित्येक हत्त्या झाल्या होत्या. नूरखानला मारणे नबाबाला कठीण नव्हते. पण इंग्रज जोर करीत होता. व नूरखान व त्याचे रोहिले यांची त्याला गरज होती. त्याच्या मनात तेच येत होते– ' या रोहिल्यांनी बंड केले तर ते कोण दाबणार ? जर ते मनात आणतील तर मला गादीवरून उचलून हत्तीच्या पायी देतील. '

नबाबाला विचारात पाहून हबशी जुम्मा म्हणाला, ' खाविंद ! मोहनलालला बोलवा. त्याचा सल्ला आता उपयोगी पडेल. '

पण नबाब स्वतःवर संतापला होता. कलकत्त्याच्या विजयामुळे आता निर्वेध झाले असे त्याला वाटले होते. आता विलास व चैन करावयाची. पण त्याच्या आड परिस्थिती येते आहे असे पाहाताच तो स्वतःशी मुठी आवळत ओरडला,–' खून ! आणखी खून ! आणखी लढाई ! जुम्मा तू कसाई आहेस. '

' महाराज ! माझ्यावर विनाकारण का रागावता ?' जुम्मा म्हणाला.

नबाब शांत होऊन म्हणाला, ' नूरखानाला हवे तेव्हा मारू. रोहिले बिथरून चालणार नाही. तुला कळत नाही. जा ! सोजनला तळघरातून घेऊन ये. '

जुम्मा हसून म्हणाला,–' खाविंद, आले लक्षात ! या रोहिल्यांचा राग त्यामुळेच आहे. सोजनवर त्यांची भक्ती जडली आहे. पण ती आली नाही तर ?'

' तिला उचलून आण. '

' ठीक. आज्ञा खाविंद !'

¤

नबाबाच्या जनानखान्यात यावेळी दोन दुःखी तरुणी होत्या. एक किल्ल्यातून आणून सोजनने लपविलेली व नंतर नबाबाने पळून जाताना पकडलेली मेरी. इंग्रज अधिकाऱ्याची काळी बायको. व दुसरी तळघरातून जिला जुम्मा आणायला गेला ती–सोजन.

नबाब उद्विग्न होऊन आपल्या महालात आला. मेरी पलंगावर झोपली होती. तिच्या पातिव्रत्याचा केव्हाच भंग झाला होता. पण हा बलात्कार होऊनही ती अजून सुंदर दिसत होती. तिचे तेज अजूनही होते, डोळे मिटून ती परमेश्वराजवळ मरणाची इच्छा करीत होती. तिची त्या इंग्रज अधिकाऱ्यांशी ओळख होऊन प्रेम जमून विवाह झाल्यावर दिवस अत्यंत सुखात गेले होते. या लग्नामुळे ती दोघे दोन्ही समाजातील स्त्रियांच्या तिटकाऱ्यास पात्र झाली



होती. पण प्रेमापुढे या तिटकाऱ्याचे काय होय ! तिच्या या इंग्रज नवऱ्याने आता कायमचे हिंदुस्थानात राहावयाचे ठरवले होते. व त्याचे तसे बेत चालले होते. तेवढ्यात लढाई होऊन तो ठार झाला होता, हा अचानक आघात होता. आता जगण्यात अर्थ नव्हता आणि नबाबाच्या जनानखान्यातील विटंबना म्हणजे नरक होता.

पण एवढे असूनही जीव जात नव्हता. ती आता अत्यंत उदासीन दिसू लागली होती. वीस जूनच्या हकीगतीनंतर, नबाबाने पहिला अत्याचार केल्यावर तिला ताप येऊ लागला होता. त्यातून ती बरी झाली आणि पुन्हा नबाबाच्या महालात तिला आणण्यात आले. सर्व सुखसोई तिच्यापुढे आल्या. पण आनंद गेला होता. ती अशी डोळे मिटून बसली असता नबाब आत येऊन म्हणाला,

'मेरी ! इंग्रज पुन्हा कलकत्त्यावर आले आहेत.'

'काय तुम्ही त्यांना कलकत्ता परत देणार ?'

'देणार नाही.' नबाब म्हणाला, 'त्यांनी ते हल्ला करून घेतले आहे. मुसलमानांची कत्तल चालविली आहे, पुन्हा लढाईची वेळ आली आहे.'

मेरी काही बोलली नाही. नबाब म्हणाला–

'काय ! तुझ्या नवऱ्याकडील लोकांचा जय झाला याचा तुला आनंद वाटला नाही ?'

मनातून मेरीला आनंद झाला होता. पण तो दाखविणे तिला धोक्याचे वाटले होते. तिला आनंद झाला होता तशीच ती खिन्नही होती आपण 'भ्रष्ट झालो, आता जय होऊन तरी काय उपयोग.' एका गोऱ्या माणसाशी आपला प्रेमविवाह झाला आणि तो समाज तिला आवडला होता, आज ना उद्या, तिला नाही तरी तिच्या मुलांना त्या समाजात स्थान मिळालेच असते. पण आता आपल्या समाजाला आपण मुकलो व नवऱ्यालाही. नबाब आज आपल्याशी गोड वागत आहे, त्याची अभिलाषा शांत झाली की जनानखान्यातील इतर मर्जीतून उतरलेल्या स्त्रियांसारखी तो आपली अवस्था करील.

नबाबाचा स्वार्थलंपट स्वभाव तसाच होता. जी स्त्री त्याला आवडली तिला जनानखान्यात आल्यावर पहिले काही दिवस तो इतका प्रेमळ वागे. त्याला सर्वसाधारण स्त्रीस्वभाव ठाऊक झाला होता. आपल्यावर झालेली बळजबरी तिला विसरायला लावली तरच ती सुख देईल हे त्याला धूर्तपणे कळत होते. पण मेरी निराळी होती. नबाब गोड बोलू लागला की तिच्या अंगावर शहारे येत. जरा वेळ स्तब्ध राहून ती म्हणाली–

'सुलताना ! माझ्यावर दया कर. मला इंग्रजांकडे पाठव. मी तिथे कुणाकडे तरी दासी म्हणून उरलेले दिवस काढीन.'

'नबाब ओरडून म्हणाला– 'घातके ! काळी असून तुला त्या इंग्रजांचे एवढे प्रेम का ? परत जाण्याची तू स्वप्नातही आशा करू नको. आता मी पुन्हा इंग्रजांवर हल्ला करून जाईन. आणि त्यांना मारल्यावर तुलाही मारून टाकीन. तू काफर बनली आहेस. ते काफर आहेत.च' नबाबाने रागाने एका दासीला हाक मारून म्हटले, 'वजीरन् ! ही वेडी झाली आहे. हिला गोऱ्या काफिराचे वेड आहे. जा, हिला घेऊन जा. नाहीतर हिचा माझ्या हातून खून होईल. हिच्या सौंदर्याने मला पागल केले. मी हिला तेव्हाच मारायला हवे होते.

दासी येऊन मेरीला नेणार तोच सोजनला घेऊन जुम्मा आत आला. सोजन इतकी क्षीण झाली होती की एवढ्याशा चालण्याने तिला भोवळ आली. नबाब म्हणाला, 'ही अजून जिवंत राहिली म्हणायची.'

जुम्मा म्हणाला, 'होय खाविंद ! हिला अशक्तपणामुळे मूर्च्छा आली आहे.'

मेरीचे वय फक्त सोळा अठरा वर्षांचे होते. पण, अनुभवानी ती प्रौढ झाली होती. सोजनने केलेले उपकार ती विसरली नव्हती. आपल्या उपकारकर्तीची ही अवस्था पाहून तिचे डोळे भरून आले. किंचित कालाने सोजनने डोळे उघडले. मेरीने पुढे होऊन आनंदाने मिठी मारली. सोजन हळूहळू बोलत नबाबाला म्हणाली,

'हे क्रूर नबाब ! माझे असे हाल करण्यापेक्षा एकदाचा माझा जीव घे म्हणजे सुटेन तरी या यातनांतून. काढ समशेर काढ ! करा वार. ही दासी मरायला तयार आहे.'

नबाब तिच्याकडे पाहात म्हणाला, 'सोजन ! तू खरोखर बहादूर स्त्री आहेस. कलकत्त्यात तू पराक्रम दाखविलासच. खरा शूर मरणाला भीत नाही. पण सोजन आता मरण्याच्या गोष्टी करण्याचे तुला कारण नाही.'

सोजनने नबाबाकडे निरखून पाहिले. नबाबाचा सूर बदलेला होता. तिला कैदेतून काढण्यात आल्यावर ती प्रथम घाबरली होती. पण नबाबाचा नम्र सूर पाहून त्याचा दुसराच धूर्त हेतू आहे, मारण्याचा नाही हे तिच्या लक्षात आले. पण मेरीला नबाबाची पूर्ण कल्पना आली नव्हती. ती आवेगाने म्हणाली,

'नबाबा ! तू मलाही हिच्याबरोबर ठार कर. मला इथे ठेवून तुला काय साधणाराय. तुझा जनानखाना अनेक सुंदर स्त्रियांनी भरलेला आहे'

नबाब ओरडला, 'जा हिला इथून घेऊन जा ! माझा राग आज पेटला आहे, नाहीतर मी हिचा खून करीन'

□


## पु. ना. गाडगीळ आणि कंपनी

**सराफ व जव्हेरी**

कुंटे चौक, लक्ष्मी रोड, पुणे ३०.

फो. नं. ५७७३२

तुम्हाला चटकन् पसंत पडतील असे सोन्या-चांदीचे, मोत्यांचे व जवाहिरांचे नाविन्यपूर्ण नाजूक अलंकार, तसेच नित्योपयोगी चांदीची सांगली व नाशिक घाटाची भांडी खात्रीशीर व माफक किंमतीत मिळतील.

मनपसंत नवरत्ने, नवग्रह व जन्ममास खडे, नवग्रहांच्या आंगठ्या, पवित्रके तयार मिळतील.

**लक्ष्मी पूजन व पाडव्यानिमित्त खरेदीसाठी अवश्य भेट द्या**

# अनाथ पांडुरंग

लेखक : हॉकली

लेखनकाल : १८२६

विषय : पेशवाईच्या पडत्या काळातील समाजाचे चित्रण

निवेदक : पां. रा. ढमढेरे

मळ इंग्रजी कादंबरीचे नाव पांडुरंग हरी असे असून येथे नमुना म्हणून ९ व १० ही दोन प्रकरणे दिली आहेत.

त्या रानात थाबून काहीच उपयोग नव्हता किंवा पुढे चालू लागणेही शक्य नव्हते म्हणून आम्ही परत घोडनदीस आलो व धर्मशाळेत मुक्काम केला. पाटलामार्फत दुसरी तट्टे व भाडेकरी सोबतीस घेऊन दुसऱ्या दिवशी पहाटे निघावयाचे असा बेत करून निजलो. सध्याकाळीच बाजारातून एक तलवार व दुबारी तमचा आणून तो जवळ ठेविला. प्राण जाईपर्यंत हातातले हत्यार खाली ठेवायचे नाही असा निश्चय केला. आम्ही दुसऱ्या दिवशी रात्री अहमदनगरला सुखरूप पोचलो. रात्रभर मुक्काम करून तेथून पहाटेस पुढील मुक्कामास गेलो. आता खानदेशाचा मुलुख लागला होता. आमची ही मजल फार राहिली नव्हती. जवळच्याच एका खेड्यात रात्री मुक्कामाला राहिलो व भोजन करून निजलो.

कितीतरी वेळाने मी जागा झालो व ऐकतो तो पक्ष्याचा किलबिलाट चालला होता. धर्मशाळेच्या आसपास बरीच झाडे होती. त्यावरील पक्ष्याची चाहूल मला लागली. मीही मग घाईने उठून भाडेकऱ्यास उठविले. आत्याबाई व सगुणेस हाका मारून उठविले व तट्टावर सामान चढवा म्हणून घाई करू लागलो तेव्हा आत्याबाई व सगुणा दोघीही म्हणाल्या ' इतक्यात कशी पहाट होईल ? आमची झोपही पुरती झाली नाही. ' तेव्हा मी म्हटले ' अतिश्रमामुळे तुमची झोप अपुरी वाटत असेल पाखराची जाग ऐकू येत नाही का ? आता लवकरच उजाडेल. '

सवजण चालू लागलो. आता पल्ला थोडा राहिला म्हणून मीही खुशीमध्ये होतो. घटका दोन घटका चाललो. तरीही उजाडण्याचे चिन्ह दिसेना याचे मला आश्चर्य वाटू लागले. साधारणपणे एक कोसभर आम्ही गेलो असू परतु भाडेकऱ्यास म्हटले, ' घोडी परत फिरव ' तोच जवळच्या झुडपातून तीन चार असामी पुढे झाले व त्यांनी आम्हास घेरले. बायकाची आरडाओरड सुरू झाली. भाडेकरी पाया पडून प्राणदान मागू लागला. माझ्या हातातील तलवारही त्यानी हिसकावून घेतली. बायकांची व भाडेकऱ्याची झडती घेण्यास त्यानी सुरुवात केली. त्यांच्याजवळ व भाडेकऱ्याजवळ गोसाव्याने लुबाडल्यामुळे फारसे नव्हतेच. भाडेकऱ्याच्या हातातील चादीचा गोठ निघेना तेव्हा तो तसाच ओरबाडून काढला. त्याच्या हाताची सालडी निघाली. कानातील भिकबाळीही खसकन कान ओढून हिसकावून घेतली. माझ्या अगावरील कपड्याची झडती घेऊन मोहोरांची पिशवी लाबवली. तेवढेही करून लूट फार मिळाली नाही म्हणून आम्हालाच मारून निघून गेले. आम्ही परत मुक्कामी आलो व पाटीलबोवांच्या घरी जाऊन त्यास हकीकत सागितली. पाटील म्हणाले, ' अशा अपरात्री प्रवासास निघालात तर चोर लुटतील नाहीतर काय तुमच्या पाया पडतील ? ' मी त्याना सागितले की पक्ष्याचा किलबिलाट ऐकून आम्हाला वाटले पहाट झाली आहे. तेव्हा ऊन व्हायच्या आत बराच पल्ला गाठावा म्हणून निघालो. अजूनही रात्र आहेच पाटील म्हणाले, ' एकूण तुम्हाला ठगानी गाठले तर ! मग त्यांनी तुम्हास जिवत सोडले हेच भाग्य समजा. ठग लोकानी लुटले म्हणजे जीव घेतल्याशिवाय सोडीत नाहीत. काळोख्या रात्री ते झाडावर चढून फाद्या हलवितात; त्यामुळे तेथे बसलेली पाखरे खाली पडतात व ओरडत सुटतात, ती ऐकून तुमच्यासारखे गैरमाहीतगार पहाट झाली असे समजून चालू लागतात व सहजच त्याच्या हातात सापडतात. '

मी त्याना विचारले, ' आत्याचा गेलेला माल तरी परत मिळेल का ? ' त्यावर तो म्हणाला,

' त्याची आता आशाच सोडा. मुकाट्याने उजाडेपर्यंत येथेच थांबा व नंतर चालू लागा. '

चांगले उजाडल्यावर सगुणासुद्धा माझी थट्टा करू लागली, ' पाखरे किलबिल करीत आहेत, पण पाटलाना विचारून पाहू. मगच आपण निघू. ' असो. दुपारपर्यंत मी आमच्या मुक्कामाला पोचलो. तेथील व्यकटराव तहशीलदारास त्रिंबकजीचे पत्र दिले. त्यानेही आमची चागली सरबराई करून आम्हाला राहाण्यास एक मोकळे घर दिले व इतर सर्व सामानसुमान खरेदी करण्यास पैसेही दिले. मुलकी खात्यात अव्वल कारकून म्हणून माझी नेमणूक झाली. आता आनदाने इतर कोणाच्या बऱ्यावाईटात न शिरता यजमानाची चाकरी बजावून रहावे असे मी ठरविले.

याप्रमाणे महिना दोन महिने गेल्यावर आत्याबाईस म्हटले, ' सगुणा आता मोठी झाली आहे. तिच्या लग्नाचा तुम्ही काय

विचार ठरविला आहे?' त्यावर आत्याबाई म्हणाल्या, 'पुण्यास तिच्या जिवावर बेतले होते. तुम्हीच तिचे प्राणदाते म्हणून उभे राहिलात व त्यानतर येथे येईपर्यंतही फारच कष्ट घेतले आहेत. दैवानेच तुमची गाठ घालन दिली आहे असे मला वाटते, व आता तुमच्याजवळ राहून नातवडाना खेळवावे असेही फार मनात येते, परतु सगुणा लहान असतानाच तिच्या वडिलांनी एका तोलदार सरदाराच्या मुलाबरोबर तिचा वाङ्निश्चय करून साखपुडाही केला आहे, त्याची आम्हाला काहीच खबर नाही. पण आपण एकदा पुरता शोध करून निर्णय लावावा व नतरच काय ते ठरवावे.'

आमचे बोलणे सगुणा दाराआड उभी राहून ऐकत होती व आत्याबाईने माझे नाव घेतले तेव्हा तिने लाजून पदर घेतला व मजकडे आनदभरीत नजरेने पहात होती. परतु या पूर्वीच्या या साखरपुडयाचे बोलणे निघताच हिरमुसली होऊन निघून गेली. यावरून आमची हृद्गते परस्परांस कळली व त्या आनदात आम्ही देहभान विसरून गेलो होतो. परंतु आत्याबाईचे आग्रहाचे बोलणे ऐकून मीही तिला आणखी एक वर्ष वाट पाहू नाहीतर पुढे थाबावयाचे नाही असे वचन घेतले. सगुणेस एक वर्ष हा कालही दु:सह वाटत असावा परतु म्हातारीची समजूत पडावी म्हणून तिला मान्य करण्यावाचून गत्यतरच नव्हते.

आम्ही परदेशात आलो आमच्या ओळखीचे येथे कोणीच नव्हते. म्हणून आम्ही जपूनच राहात होतो. दारावर शिपाई देवडीवाला असेच. सगुणा अगर आत्याबाई यानी एकटयाने कोठे जावयाचे नाही. बैरागी–भिक्षेकरी आला तरी शिपाईच बाहेरच्या बाहेर भिक्षा घालून वाटेस लावीत असत. वसुलीसाठी मला पाचसहा महिने महालात हिंडावयाची पाळी आली तेव्हाही याच व्यवस्थेने त्यास राहाण्यास सागितले व 'कोणा शिपायाबरोबर काही निरोप आला तरी जावयाचे नाही. माझ्या हातातील रामनामाची अगठी त्याच्याजवळ खुणेकरिता देईन. तेवढेच फक्त सत्य मानावे' असे मी सागितले. शिवाय सुखवस्तु गृहस्थ शेजारी राहात असे. त्याची व माझी बरीच ओळख झाली होती. त्यासही मी 'चौकशी करीत जा' म्हणून सागून मी वसुलीस परगावी गेलो.

दोन महिने मोठया आनदात गेले. आता आणखी एक-दोन महिन्यात वसुली आटोपून परत गावी जाऊन सगुणेची दृष्टभेट होईल म्हणून मी समाधानात होतो. एक दिवस असाच बसलो असताना त्रिबकजी डेगळयाकडून मुजरत जासूद आला आहे व त्याने जरुरीचा लखोटा आणला आहे असे माझा शिपाई सागत आला. जासूदास आत बोलावून खातरजमा करून घेतली व लखोटा वाचला. त्यात 'अत्यत जरुरीच्या कामासाठी तुमची आवश्यकता आहे. टाकोटाक यावे' असा मजकूर होता. जाताना सगुणेची भेट घेऊन जावे असे मनात आले, परतु तितका विलब लागेल व स्वामी-कार्य बिघडल्याचा शब्द लागेल म्हणून तसाच निघालो व जासुदा-बरोबर सगुणेस सर्व हकीकतीचे सविस्तर खुलासेवार पत्र लिहिले. पत्र पुण्यासच पाठवीत जा असेही कळविले.

मोठमोठया मजला करून पुण्यास आल्याबरोबर त्रिबकजीच्या वाडयात गेलो, तेथे मोठीच गडबड उडून गेली होती. सर्वांची घर सोडून जाण्याची तयारी चालली होती. प्रथमदर्शनीच गोऱ्या सोजिरांचा पहारा बसलेला दिसताच काहीतरी मोठेच अरिष्ट असावे असे मला वाटले. मी बातमी काढली. मी खानदेशात गेल्यावर थोडयाच दिवसात गायकवाडाकडून पेशव्याकडे एक मोठा शास्त्री मुत्सद्दी मनुष्य बोलणे करण्यासाठी आला होता. श्रीमंत त्यास आपणाबरोबर घेऊन पढरपुरास गेले होते. तेथे विठोबाच्या देव-ळाच्या बारीतच त्याचा खून झाला. तो ज्या कामासाठी आला होता त्यात इग्रज कपनीचे हित असल्याकारणाने त्याच्या जिवाची हमी कपनीने घेतली होती. त्याचा प्राण घेतला ही गोष्ट त्यांच्या मनास फार लागली व त्यानी चौकशी करून खुनामध्ये त्रिबकजीचा हात आहे असे काढून घेतले. श्रीमतांच्या समतीने किंवा आज्ञेनेच खून झाला असे त्याच्याच्याने म्हणवेना, तेव्हा श्रीमताच्या कीर्तीस कलक लागावा म्हणून त्रिबकजीने हा खून करविला; व त्याबद्दल 'श्रीमत फार दिलगीर आहेत हेही आम्हास माहीत आहे.' असेही सागितले व त्रिबकजीच्या मूर्खपणाचा दोष श्रीमतानी आपल्याकडे न घेता त्यास आमच्या हवाली करावा. त्रिबकजीस आपणच उर्जितावस्था आणली व आपणच लावलेली वेल आपणच कशी तोडावी असा श्रीमतास विचार पडला असला तर तो त्याच्या श्रीमताच्या थोरपणास साजेसाच आहे. आम्ही त्रिबकजीच्या जिवास काही अपाय करीत नाही, त्यानेही स्वत: ही ब्रह्महत्या करविली नसेल. हस्ते परहस्ते झाली असेल, कदाचित कोणा गोसाव्याचेही अग असेल तर आम्ही त्यास शासन करू.' असे परोपरीने गोड बोलणे चालू होते. इग्रज जास्त दांडगाई करीत नाहीत तोपर्यंत त्रिबकजीस त्याच्या स्वाधीन करावे व दड करून सुटका करून घ्यावी असे श्रीमताचे मत आहे हेही मला समजले. यावरून त्रिबकजीचा निरुपाय झाला व तो इग्रजाच्या स्वाधीन व्हावयाचा होता

त्रिबकजीस मी जाऊन भेटताच त्यास फार आनद झाला. तू अगदी वेळेवर आलास, म्हणून त्यानी मला शाबासकी दिली. त्याच्याजवळची सर्व मडळी ताज्या घोडयावरच्या गोमाशाप्रमाणे होती. त्रिबकजीचा विपत्काल जवळ येत आहे हे पाहाताच त्यास सोडून गेले. मी मात्र त्याचे पत्र येताच धावत गेलो हे पाहून त्यास फारच बरे वाटले. त्याच्याजवळ सतत दोन शिपाई पहाऱ्यासाठी असत म्हणून फारसे बोलणे झाले नाही, तरी त्याच्या खास विश्वासातील दोन-तीन माणसात मी एक त्याच्याबरोबर इग्रजाच्या कैदेत जाण्याचे ठरले. त्रिबकजीचे खास हुजरे नाना व संभू व मी तिसरा असे आम्ही निघालो.

त्रिबकजीस ठाण्याच्या किल्ल्यात ठेवण्याचे ठरले व इग्रजी बेता-प्रमाणे दहा कोस मजल मारून मुक्काम करीत आम्ही ठाण्याच्या किल्ल्यात दाखल झालो. त्रिबकजी कैद होता तशी मला काही कैद नव्हती. मला वाटेल तेव्हा इग्रज किल्लेदारास सागून जाता आले असते. मला खानदेशातील सगुणेची काळजी लागून राहिली. पत्र-व्यवहार चालू होता तोपर्यंत ठीक. परतु ठाण्याच्या किल्ल्यात एकदा बंदोबस्तात राहिल्यावर तोही मार्ग बद झाला.

किल्ल्यात बदोबस्तासाठी सर्व गोरे सोजीर ठेविले होते. त्यामुळे आमची एक चागली सोय झाली. आम्हा चौघास मोकळेपणाने त्याच्यासमक्ष हवे ते बोलता येऊ लागले. आम्ही त्यास चार शिव्या दिल्या तरी त्या त्यास कळेनात! यामुळे त्रिबकजी सुटकेविषयी

पूर्ण निराश झाला नाही. मला तर तो स्पष्टपणानेच म्हणू लागला की, माझा आता तुझ्यावर सारा भरवसा आहे. तू मोठा बुद्धिमान व इमानी आहेस. काहीतरी चमत्कारिक युक्ती काढून मला या सकटातून पार करून दे. म्हणूनच तुला खानदेशातून मुद्दाम बोलावून घेतले. माझा हेतू सफल केल्यावर तुला मी मागशील तेवढे द्रव्य देईन. मीही त्याला धीर देऊन सांगितले की, प्राण गेला तरी चालेल परतु मी तुम्हाला माझे मालक समजतो म्हणून तुमच्या सकटातून तुमची सुटका करून देईन आपण धीर धरून असावे.

ठाण्याच्या पहिल्या कमाडरची बदली होऊन त्याच्या जागी नवीन तरुण कमाडर आला. सध्याकाळच्या वेळी किल्ल्यातील मैदानात फिरण्याची आम्हास परवानगी मिळाली. आमच्याबरोबर गोरे सोजीर लोक असत. त्याच मैदानात अमलदाराची घोडी फिरविण्यास त्याचे मोतद्दार येत असत. आज नव्या मोतद्दाराकडे मी पाहू लागलो तो त्यातील एक चेहरा ओळखीचा वाटला. म्हणून जवळ जाऊन पाहिले तेव्हा तो माझा मुबईचा मित्र नरसू अशी खात्री झाली. परस्परास ओळख पटली. परतु ते बाहेर न दाखविता मी चटकन परत फिरलो. नतर युक्तीने त्याची भेट घेतली व सुटकेच्या उपायाविषयी युक्तीप्रयुक्तीने विषय काढला. 'द्रव्येण सर्वे वश:' असल्यामुळे नरसूला मी एकदम बरीच रक्कम कबूल केली. त्रिबकजीस सागताच तो माझ्यावर फारच खूश होऊन हवे तेवढे पैसे खर्च कर म्हणून त्याने मला सागितले. आम्ही आत बसून सुटकेच्या योजना करण्यात काहीच मतलब नव्हता. बाहेरचा कोणीतरी तिसरा मनुष्य सामील असेल तर व्यूह चागला रचता येईल. तेव्हा असा कोणी विश्वासू मनुष्य आहे का म्हणून त्रिबकजीस विचारले व त्यास पत्र लिहून देण्यास आणि पत्र जाताच ठाण्याच्या खाडीपलीकडे तीन चार घोडी तयार ठेवण्याची सूचना येताच त्याने तयार रहावे व पैसेही द्यावे असे ठरवून पत्र नरसूच्या एका खात्रीच्या जासुदामार्फत रवाना केले.

आमचा कट तयार होऊ लागला. पर्जन्यकाळचे दिवस जवळच आले होते. एखाद्या कृष्णपक्षाच्या अधाऱ्या रात्री नरसूने व त्रिबकजीने पार व्हावयाचे; मी, त्रिबकजीचे हुजरे नाना व सभू यानी किल्ल्यातच राहावयाचे. त्रिबकजी सुटून गेल्यावर आठ पंधरा दिवस हाणमार करून काही बातमी मिळत नाही असे पाहिल्यावर आम्हास सोडून देतील याची खात्री होती. त्रिबकजी सायकाळी स्नान करावयास नहाणीघरात जात असे. नहाणीघराबाहेर सोजीर पहाऱ्यासाठी उभा असे, परतु तेथेच डावीकडे जमिनीसरशी एक लहान खिडकी होती. त्यात उडी मारून खिडकीखाली घोड्याचे तबेले आहेत, त्यावर घोड्याचे गवत पसरून त्यास इजा होणार नाही अशी व्यवस्था केली त्रिबकजीने गवताखालीच आपले कपडे उतरवून ठेवून तेथे एक घोगडी असेल ती डोक्यावरून घेऊन दरवाजा लागण्यापूर्वीच गवतवाल्याच्या ताड्यावरोबर बाहेर पडावे असे ठरले. त्रिबकजी आघोळीस गेला म्हणजे मी दाराबाहेर उभा राहून गाणी म्हणत असे. ती मोठ्याने म्हणावीत म्हणजे आतील आवाज बाहेर ऐकू येणार नाही, असा बेत ठरला.

ठरल्याप्रमाणे एके दिवशी आम्ही सध्याकाळपर्यंतचे सर्व कार्यक्रम स्वस्थपणाने केले. त्रिबकजी आघोळीस गेला. मीही गाणी गाऊ लागलो. शेवटी रोजच्यापेक्षा जास्त वेळ झाला तरी त्रिबकजी बाहेर कसा येत नाही म्हणून सोजीर अस्वस्थ झाला. मी त्याला तोडक्या मोडक्या हिंदुस्थानीत 'जरा वेळ आहे' असे सागू पहात होतो. परतु तो बिथरला आणि आत घुसला. त्रिबकजी तेथे नाही असे पहाताच त्याने आरोळी मारली व त्रिबकजी पळाला असा पुकारा झाला. किल्लाभर दगल उसळून गेली. कदील, मशाली, हिलाल पेटवून शोध करू लागले. आम्हावर सक्रात आली व कमांडरपुढे नेण्यात आले. परतु आम्ही 'आम्हास काहीच माहीत नाही' एवढेच बोलणे ठेविले. एवढ्यात आठची किल्ल्याची दारे बंद होण्याची तोफ झाली व कमांडरने शिपाई पाठवून नाकेबदी केली. घरे, देवळे, धर्मशाळा, सर्व तपासण्याचा हुकूम झाला. कमांडरने किल्ल्याच्या दरवाजावरील पहारेकरी बोलावून आणले व कोण कोण बाहेर गेले याची चौकशी केली. त्यांनी सागितले की, गवतवाले व त्याच्यावरोबरचा घोगडीवाला एवढे पुरुष आत आले होते; तेवढेच बाहेर गेले. घोगडीवाल्याचा तपास सुरू झाला. घोगडी किल्ल्यापासून शभर हातावरच सापडली. नरसू कोठे दिसेना म्हणून त्याचाही शोध घेऊ लागले. परतु नरसू किंवा त्रिबकजी कोणीच मिळाले नाहीत.

त्रिबकजीसारखा मातब्बर राजकीय कैदी राजरोसपणे पहारेकऱ्यापुढून निघून गेला ही गोष्ट काही सामान्य नव्हती. ही पेशवाई किंवा मोगलाई असती तर इग्रज लोकानी आमची हसून फजिती केली असती. त्याच्या कडेकोट बदोबस्तातून त्याच्या हातावर तुरी दिल्या याला कारण एकच आमची भाषा जाणणारा पहारेकरी नव्हता व आमची जागाही ऐसपैस खालीवर खोली, नहाणीघर अशी अवास्तव होती.

कमाडरने ही गोष्ट मुंबईस गव्हर्नरला कळविली. आमची सुटका केव्हा होते व त्रिबकजीस खानदेशात गाठून आमचे इनाम केव्हा मिळते याची वाट पहात मी दिवस मोजीत होतो. महिन्यापधरा दिवसात मुबईचा हुकूम आला व आम्हाला कफल्लक करून किल्ल्याबाहेर काढून देण्यात आले. आम्ही तिघेही समदुखीच तेव्हा एक विचाराने वागून खानदेशात शक्यतों लवकर पोचावे या विचाराने आम्ही निघालो.

¤

पावसाळ्याचे दिवस. मुलूख अनोळखी. त्यामुळे आमची मजल काही फार होईना. एका गावास मुक्कामास गेलो असताना तेथे बातमी लागली की कपनी सरकारने त्रिबकजीस पकडून देण्याकरिता दहा हजार रुपयाचे बक्षीस लावले आहे. आमच्यापैकी सतूस पापबुद्धी आठवली व त्याने मजजवळ हळूच गोष्ट काढली. नाहीतरी आपण खानदेशात त्रिबकजीच्या मुलखात चाललो आहोत. तेथे आपण त्याची बातमी काढू व बक्षीस मिळवू. विश्वासघातकी सतूचा मला फार राग आला, परतु दूरवर विचार करून मी त्यास म्हटले की, माझ्या मनात तोच विचार आहे परतु मी ठरविले आहे की आपणास दहा सोडून वीस हजार रुपये मिळविता येतील. आपण त्रिबकजीस गाठून त्याच्याकडून कैदेतून सोडविण्याबद्दल दहा हजार रुपये इनाम घेऊ, नतर कपनीसरकारात जाऊन त्याचे बक्षीस उपटू. हे ऐकून त्या निमकहरामाला आनद झाला व माझे वाक्य अमृततुल्य

वाटून तो म्हणाला, 'वा ! खाशी युक्ती लढविलीस. त्रिंबकजीचा खरा सेवक शोभतोस.'

खानदेशात आम्ही पोहोचण्याच्या आधीच दुर्दैव पुन्हा आमच्या वाटेत उभे राहिले. एका ठिकाणी रात्रीच दहा-वीस घोडेस्वार असामींनी आम्हास घेरले व मुसक्या बांधून घेऊन गेले. खाटीक जसा मेंढरे हाकतो त्याप्रमाणे आमच्या दंडास काढण्या बांधून एक असामी आम्हास दटावून पळवू लागला. पुढे जाता जाता एक बाबूंचे वन लागले. त्यातील पायवाट दिसत नव्हती. अशा वाटेने त्या भयंकर जंगलात नेले. तशातच आकाश अभ्राच्छादित होऊन मोठमोठ्याने मेघगर्जना होऊ लागली. आमच्या अंगात भीतीने कापरेच भरले. झंझावाती पाऊस सुरू झाला व एक विजेचा प्रचंड लोळ आमच्याजवळून जाऊन जंगलात कोसळला. त्या क्षणभर चमकलेल्या प्रकाशात भयाण अरण्याची भयानकता अधिकच तीव्रतेने दिसली. थोड्या वेळाने पाऊस कमी झाला. आम्ही एका पडक्या गढीच्या तोंडाशी जाऊन पोचलो. त्यांनी काही संकेताचे शब्द उच्चारल्यावर दरवाजा उघडला. आम्हास पुढे ढकलून ते घोडेस्वार आत आले व तटाला लागून असलेल्या तबेल्यात घोडे सोडून आम्हास घेऊन एका माळ्यावर टाकले. गढीमध्ये सरासरी शंभर लोक असावे. त्यांनी बाहेर गेलेल्या लोकांची जेवणखाण्याची व्यवस्था आधीच केली होती. एका मोठ्या परातीत भात, भाकर व काहीतरी कालवण त्यांनी एकत्र बसून खाल्ले. हा अनाचार व जातिभ्रष्टता पाहून मला मोठी खंत वाटली. त्यांचे खाणे संपल्यावर त्यातच आणखी थोडे अन्न टाकून आम्हापुढे सरकविल्यावर माझ्याच्याने ते खाववेना. म्हणून मी म्हटले,. 'आम्हाला थोडे तांदूळ व तपेली द्या, आम्ही भात शिजवून खातो.' त्यावर त्यांच्यातला एक असामी म्हणाला, 'नको तर रहा उपाशी. शिधा द्यायला कोण तुम्ही बडे पाहुणे समजता की काय?' आम्ही तसेच पडून राहिलो. जरा वेळाने तीन असामी आमच्यावर पहाऱ्यासाठी आले. त्यातील एक जरा सभावीत व वरच्या दर्जाचा वाटला. त्याजवळ मी तांदूळ मागून भात करून खातो म्हटले. त्याने तेवढी व्यवस्था केली व जवळच मशाल ठेवून बसला. मी त्याच्याकडे निरखून पाहिल्यावर मला आश्चर्य वाटले. कारण तो म्हणजे सावंतरावांच्याकडे नोकरीवर असताना कलमदान उचलणारा हुजऱ्या होता. मी नाना व संतू यास काही बोललो नाही. आमचे जेवणखाण झाल्यावर बोलत बसलो असता आम्हास कळले की हे सर्व पेंढारी आहेत, व तूर्त पेंढाऱ्यात भरती करणे आवश्यक असल्यामुळे धडधाकट तरुण जवान धरून आणून त्यांची भरती करतात व नंतर घोडे देऊन राऊत बनवून आपल्यात सामील करून घेतात.

एक दोन दिवस असेच बंदिवासात गेले. पेंढारी जेवण झाल्यावर खूप दारू पीत असत. मी दारू कोठून मिळवली म्हणून महादू कलमदान्यास विचारले. तो म्हणाला, 'कंपनी सरकारचा एक बैलाचा तांडा चालला होता, तो यांनी सबंध लुटून आणला आहे.' मी महादूला विचारले, 'मला ओळखलेस का?' त्यावर तो म्हणाला, 'प्रथमच ओळखले. परंतु येथे ओळख दाखविण्याची सोय नाही. तुम्हाला हवेतर हैबतीची व तुळसाजीची गोष्ट सांगतो. मी म्हटले, 'एवढी खूण पुरे. पण तू यांच्या तडाख्यात कसा सापडलास?' त्यानेच मला उलट प्रश्न केलेला 'तुम्ही तरी रावाचे रंक होऊन येथे कसे आला?' तेव्हा उदईक रात्री आपापली हकिकत सांगण्याचे ठरवून आम्ही निजलो.

दुसऱ्या दिवशी महादूने गोविंदराव चिटणिसाची हकीकत सांगितली. तो म्हणाला, 'त्यादिवशी लढाईनंतर सूर्यास्तापूर्वी मी गोटात गेलो गोविंदरावाचे प्रेत झाडाला लोंबकळून झोके खात होते. त्यास निदान पुरून तरी टाकावे म्हणून मी झाडाची दोरी तोडून त्याला कसेबसे खाली घेतले व खड्डा खणून पुरण्याऐवजी शेजारच्या दरडीखाली एक खळगा होता त्यात टाकून वर माती टाकावी म्हणून खाली उतरलो, व कसेबसे त्यास झाकून टाकून वर येऊ लागलो तो तेथे एका खडकावर एक स्त्री उभी असून माझ्याकडे टक लावून पहात होती. प्रेत पुरण्यासारखे काम मी एकटाच करीत आहे तेव्हा त्याचा मीच खून केला आहे असा वहीम कोणीही माझ्यावर आणला असता म्हणून मी लपत छपत दरडीच्या आडोशाने वर चढलो. तेथे ती स्त्री उभीच होती. म्हातारी क्रूर मुद्रेने माझ्याकडे पहात होती. मी तेथून कसा तरी निसटणार असे पाहून ती खिन्नपणाने म्हणाली, 'अरे चांडाळा, माझ्या मुलाचा खून केलास ना?' ती स्त्री गोविंदरावाची आई असावी असा मी तर्क केला. तिला सर्व हकीकत सांगितली. मी तिचे पाय घट्ट धरून तिला साष्टांग नमस्कार केला. तेव्हा दुःखावेगाने तिला बोलता येत नव्हते. हातानेच खुणा करून तिने मला जा म्हणून सांगितले. मी म्हटले 'माझ्याकडून आपणास फार दुःख झाले. याबद्दल क्षमा असावी.' ती स्त्री काहीच न बोलता तेथून निघून गेली. मीही खिन्न व उदासीन होऊन तेथेच


**भारतीय स्वातंत्र्य अबाधित राहो**

भारताच्या कृषि औद्योगिक विकासातील सिंहाचा वाटा

**दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मे सूर्ये पाहो ।**
**जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥**

साखर उत्पादनाबरोबर वारणा सहकारी उद्योग व शिक्षण समूह निर्माण करून निष्कांचन वारणा खोऱ्याचा कायापालट करून आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडणारा

**श्री वारणा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, वारणानगर**

वारणानगर ४१६ ११३, तह. पन्हाळा, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र)

तार—वारणासाकर, वारणानगर. फोन न.—कोल्हापूर : २२४६

**नंदकुमार काशिनाथ नाईक**
कार्यकारी संचालक

**निवृत्ती विठोजी घोरपडे** — व्हा. चेअरमन

**विश्वनाथ आण्णा कोरे** — चेअरमन

जरा वेळ बसून राहिलो.

थोड्या वेळाने कसातरी रखडत रखडत चाललो. मार्गही नीट दिसत नव्हता. मी कोणीकडे चाललो आहे हेही कळत नव्हते. एवढ्यात काही असामी घोड्यावरून चालले होते त्यानी मला पाहून एका घोड्यावर मला आवळून बाधले. तेव्हापासून जबरदस्तीने मी याच्यात राहू लागलो आहे '

त्याची हकीकत मी एकाग्र चित्ताने ऐकत असतानाच अकस्मात शिग वाजले व बदुकांचा आवाजही ऐकू येऊ लागला. ही काय गडबड आहे ते पहावे म्हणून पहारेकरी बाहेर गेला. तेवढ्यात त्याच्या नाईकाने येऊन आमच्या खोलीचे दार उघडले व 'पहाता काय? घोड्यावर चढा इग्रज आला आहे. येथेच एका कोसावर आहे,' असे म्हणत आम्हास घेऊन गेला. पेढारी लोकात शिस्त ही चीज नसतेच. पुढे काय करावयाचे याचा विचार न करताच घोड्यावर स्वार होऊन बाहेर पडल्यावरोबर नेमके इग्रज घोडेस्वाराच्या गोळीबारात सापडले. ज्याला जिकडे वाट फुटेल तिकडे तो पळू लागला. मी, नाना व सतूही पळू लागलो एवढ्यात सतूला गोळी लागली व तो धाडकन् घोड्यावरून कोसळला आम्ही जिवावर उदार होऊन लढत लढत बाहेर पडलो. नानाना मुलखाची माहिती होती. त्याच्या मागून घोडे टाकीत आम्ही चाललो. रस्ता एका गावातून जात होता. पण या गावास पेढाऱ्यानी फार उपद्रव दिला होता, त्यामुळे आम्ही तेथून बाहेर पडलो. आम्ही बराच वेळ पळत होतो. ती घोडी मोठी विलक्षण दमाची असावी. मी नानास विचारले 'येवढी मरतुकडी घोडी कशी टिकणार?' त्यावर नाना म्हणाला 'पेंढारी लोक लाबची मजल मारावयाची असली म्हणजे घोड्याना दारू पाजतात. मग पन्नास कोसाची मजल ते सहज मारतात. बसणारा चागला असला तर मग पाठलागाची भीतिच नाही. पाठलाग होत नाही अशी खात्री झाल्यावर आम्ही थावलो व अगावरील लढाऊ पोशाख टाकून देऊन शेतकऱ्यासारखे थोडेच कपडे अगावर ठेवून एका ओढ्यावर मुक्काम केला. मिळाली ती कदमुळे खाल्ली व शेजारच्या गावात बातमी काढण्यास गेलो. तेथे कळले, पेशव्याची आणि इग्रजाची लढाई जुपली असून सर्व दक्षिणभर आता धुमाकूळ होणार. त्रिबकजी येथेच असून तो सैन्याची जमवाजमव करीत आहे. शिदे, होळकर, पेशवे व पेढारी सर्व एक होऊन लाल तोडाचे परशत्रू उत्पन्न झाले आहेत, त्याच्या हाती आपली घरे जाऊ नयेत म्हणून लढत आहेत. त्याच्या सैन्यात दाखल व्हावे म्हणून आम्ही त्रिबकजीची गाठ घेण्यास गेलो. आम्ही आल्याचा त्याने बाह्यात्कारी आनद दाखविला परतु तो मजकडे वेगळ्याच नजरेने पहात आहे असे मला वाटले. त्याने मला बक्षीस कबूल केले होते, त्याची ओळखही नसावी असे मला वाटले, त्याचे चित्त फारच अस्वस्थ दिसले म्हणून मी शोध घेऊ लागलो. तेव्हा मला असे कळले की त्या गावच्या पाटलाने एक गोरा अंमलदार थोडे शिपाई बरोबर घेऊन चौकशीस आला असताना त्याने त्याचे शिर तोडून त्रिबजीकडे पाठवून दिले होते; त्या रागात तो होता.

त्रिबकजीजवळ काही दिवस राहिल्यावर आता पहिल्या नेमणुकीवर जावे असा विचार करून त्याचा निरोप घेण्यास गेलो. तेव्हा तर त्याने मला 'जा, मर' असे दुर्भाषण करून घालवून दिले. माझ्या डोळ्यापुढे आता सारखी सगुणाच दिसू लागली. म्हणून मी तिला भेटण्यासाठी तावडतोब निघालो व गावी आलो तो काय? घर ओसाड! दरवाजा उघडून टाकलेला, जिकडे तिकडे सामान अस्ताव्यस्त. यावरून सगुणा व आत्याबाईवर काही तरी दुर्धर प्रसग आला असावा, व त्याच्यावर कोणीतरी हल्ला करून त्याना पळवून नेले असावे. सतापाने मला विचार सुचेना. आता त्याच उबऱ्यावर डोके फोडून प्राण द्यावा असेही वाटले. परतु सगुणा अद्याप जिवत असेल तर तिला छळणाऱ्या दुष्टाचे पारिपत्य करावे तरच खरा पुरुषार्थ म्हणून मी मन आवरले व तहसीलदाराकडे गेलो.

तहसीलदाराच्या देवडीवरील पहारेकरी मला ओळखून देखील आत सोडीना. सरकार निजले आहेत. म्हणून परस्पर वाटेस लावू पाहात होता. मी तेथेच थावलो. चाकर माणसे आतबाहेर जात येत होती. माझ्या ओळखीचे जे होते ते मला रामराम करीत. देवडीवाल्याच्या हातावर दोन रुपये ठेवल्यावर जरूरीच्या कामानिमित्त भेटावयाचे आहे एवढा निरोप पोचविण्याचे कबूल केले. परंतु तहसीलदारसाहेब माझी गाठ घईनात, काहीतरी निमित्त काढून टाळीत होते. तेव्हा मी जाऊ लागलो. एक शिपाई हळूहळू माझ्यामागून येत आहे असे पाहून बाजूस जाऊन त्याला विचारले तेव्हा 'कोण सगुणाबाई व त्याची आत्याबाई का? हो हो, आत्याबाई खऱ्याच, मला काहीच माहीत नाही व माहीत असलेच तरी सागता येणार नाही.' म्हणून जाऊ लागला. मी त्यास थाववून मोठ्या काकुळतीने विचारल्यावर त्याने गळ्याभोवती बोट फिरवून दाखविले व पोटावर थापटी मारून म्हणाला 'हे आहे ना! मग कसे बोलणार?' मी त्यास तंबाखू देण्याच्या मिषाने दोन रुपये दिल्यावर मोठ्या मितवारीने त्याने मला 'शक्यतो लवकर गाव सोडून जा, जास्त खुलासा विचारू नका. जिवत रहाल तर तुम्हीच पत्ता लावू शकाल,' एवढे कसेबसे सागितले व तो तेथून उठून चालू लागला.

त्याचे शब्द ऐकताच माझे देहभानच हरपून गेले. कोठे जावे, काय करावे याचा विचार करीत न कळतच घराकडे पावले वळली. जिन्याच्या दारातून वर गेलो. तेथे मोडका पलग व इतर सटर फटर सामान पडले होते. सगुणेचा घात झाला की काय या शकेने मला अतिशय दु ख झाले. जरा वेळाने मन आवरून शिपायाने पळून जा म्हणून सागितले तेव्हा आपणास दग्याने मारावयाचा बेत असावा तेव्हा येथून लवकर बाहेर पडून उठलो जिन्याखाली येत असताना स्वयपाक घरात कोणीतरी कुजबूज करीत आहे व पणतीच्या प्रकाशाचे झरोकेही दिसले म्हणून दाराच्या फटीमधून डोकावण्यासाठी पुढे होत असताना रुपये ओतल्याचा खळकन आवाज ऐकू आला. कुजबूज ऐकू येत नव्हती. परतु पैसा, कामगिरी, त्रिबकजी, पाडू असे तुटक शब्द ऐकू आले. आतील लोकाना माझा सुगावा लागला असावा कारण मी ज्या जागेवर उभा होतो त्याच जागेवर जिन्याच्या पायरीवरून कोणीतरी तमंचाचा बार टाकला. मी अधेरातच दडी मारली व जरा वेळाने तिघेजण घराबाहेर पडले. 'अशीरगडावर जमावे' एवढे शब्द मला कळले. माझ्या घरात बसून पैशाची देवाण घेवाण चालली असताना त्रिबकजीचे नाव निघाले. तेव्हा त्रिबकजीस सगुणेचा पत्ता लागून त्यानेच तिला पळविले असावे व मला मारून टाकण्याचा बेत असावा असे मला पक्के कळले. त्रिबकजीची माझ्याशी तुटक वागणूक, तहसीलदाराने माझी भेटही घेण्याचे टाळणे, व त्या

शिपायाने मला तावडतोब गाव सोडा म्हणून सांगितलेला सल्ला याचा अर्थ एकच होता. मी रात्री तळमळत तेथेच अंगणामध्ये विश्रांती घेतली व पहाटे उठून चालू लागलो.

अशीरगडच्या मार्गावरील एका खेडयाच्या धर्मशाळेत पोचलो. जवळचं सर्व द्रव्य संपत आलेले. तेव्हा आता भिक्षांदेहीचा अवलंब केल्याखेरीज एवढा लांबचा पल्ला झेपणार नाही म्हणून धर्मशाळेच्या देवडीवरच मुक्काम केला. दुपारच्या प्रहरी मुक्कामास तेथे दोघे प्रवासी आले. त्यांच्याइतके उग्र स्वरूप मी पूर्वी कधीच पाहिले नव्हते. त्यातील एक उंच काळा, दाढीमिशांच्या जंगलात तोंडाचा पत्ता नसलेले, त्यातून चपटे नाक जेसतेम बाहेर निघालेले असा होता. अंगावर पायजमा, पांढराच पायघोळ अंगरखा व कमरेस तमंचाचा काळा पट्टा व हिरवट रंगाचे पागोटे होते. दुसरा अगदी त्याच्या उलट, ठेंगणा, स्थूल, व किंचित गौरवर्णाचा होता. लहानशा पिंगट मिशाखाली जाड जाड ओठ, व दात पुढे आलेले. डोळे गरगरीत घारे, कपाळावर जखमेची खूण असा असून त्याचा पोशाखही जरा व्यवस्थित होता. पेहेरावावरून ते कोणत्या देशचे व जातीचे हे ओळखता येईना. दोघेही दिसण्यात क्रूर व हटवादी, एवढेच त्यांच्यात साम्य होते.

त्यांनी आपले सामानसुमान काढून भात शिजत ठेवला. त्यांच्याचजवळ प्रथम भीक मागावी म्हणून पुढे गेलो व ‘ मला थोडे तांदूळ द्या ’ म्हणून उभा राहिलो. त्याने मला झटकून टाकले व त्यांची जेवणखाणे झाल्यानंतर मला म्हणाले, ‘ इकडे ये. कोण तू ? कोठे चाललास ? भीक मागायला लाज वाटत नाही का ? चांगला धडधाकट दिसत आहेस. जरा काही काम करून पोटाला मिळव. ’ मी म्हटले, ‘ मी एका संकटात सापडलो आहे. अशीरगडाकडे काम निघाले म्हणून निघालो. वाटेत मला दरवडेखोरांनी लुटले. ’ ‘ अशीरगडास काय काम आहे ? ’ म्हणून विचारताच मला मोठा प्रश्न पडला. खरी हकीकत सांगणे इष्ट नव्हे म्हणून मी म्हटले, ‘ आम्ही आपले... ’ तो म्हणाला, ‘ आम्ही ! आम्ही ! मोठे राजे महाराजेच लागून गेलात ! अहो भीक मागे राजे. ’ मी रागावून म्हटले, ‘ भीक नाही मागितली. तुमचे तांदूळ मी परत केले असते. ’ त्यावर तो लांबटांग्या तिरसट आवाजात म्हणाला, ‘ आता बकबक बंद कर. नाहीतर तमंच्याने आताच होतास की नव्हतास असे करून टाकीन. ’

या उर्मट लोकांच्या नादी लागणेच नको म्हणून मी गप्प बसलो. ते दोघेही घोंगडया पसरून आडवे झाले. निजतानाही आपापसात थट्टा चाललीच होती. एक म्हणे, ‘ अहो महाराजांना बिछाना घालून द्या. ’ त्यावर दुसरा म्हणे, ‘ महाराजांना भूक लागली आहे. त्यांचे ताट आधी तयार करा. ’ जरा वेळाने ते झोपी गेले.

त्यांच्या उशाशीच त्यांनी तमंचा ठेवला होता. त्याकडे मी नीट निरखून पाहू लागलो, व माझी खूण त्यावर मला दिसली. खानदेशाकडे सगुणेसह जात असतानाच ठगांनी आम्हास लुटले त्यावेळी हा तमंचा त्यांनी नेला होता. त्यांच्यापैकी एकजण तरी खात्रीनेच ठग आहे अशी मात्री खात्री झाली. मी तेथून उठलो व गावात जाऊन पाटलास पैसे देऊन पोट भरण्यापुरते जेवण घेतले व धर्मशाळेत येऊन पडलो. ☐

**[ वरील दोन्ही कादंबऱ्या पुण्याच्या सरिता प्रकाशनद्वारा १५ ऑगस्टला प्रसिद्ध झालेल्या आहेत ]**





प्रवासास कुठेही जा.. कसेही जा.
रु. ५०/-, १००/-
आणि ५००/- किंमतीचे
बँक ऑफ महाराष्ट्र ट्रॅव्हलर्स
चेक्स् प्रवासात आपली
सोबत करतील.
हे ट्रॅव्हलर्स चेक्स् आमच्या
सर्व शाखात स्वीकारले जातात.
मोठी हॉटेले, इतर बँका
आणि तत्सम संस्थामध्ये
हे चेक्स् वटविता यावे या
दृष्टीने आमचे प्रयत्न चालू आहेत.
नजीकच्या शाखेस भेट द्या
किंवा अधिक माहितीसाठी
आम्हाला लिहा.

ट्रॅव्हलर्स चेक्स् सेक्शन,
अकाउंट्स् डिव्हिजन,

बँक ऑफ महाराष्ट्र

मुख्य कचेरी :-
११७७, बुधवार पेठ, पुणे-४११ ००२.

TOM & BAY/ 8M : 7413 M

मध्यंतर

# अखेरचा सवाल

## वसंत कानेटकरांचे नवे नाटक

पुष्पा भावे

'धिगोवा हिंदु असोसिएशन'च्या कला-विभागाने, ३ ऑगस्ट रोजी, प्रा. वसंत कानेटकरांच्या 'अखरचा सवाल' या नव्या नाटकाचा प्रथम प्रयोग सादर केला. 'अखेरचा सवाल' हे नाटक प्रत्यक्ष रंगमंचावर येण्यापूर्वीपासूनच खूप गाजत होते. या नाटकाच्या संहितावाचनाचेही काही प्रयोग झाले होते. दामू केंकरे यांचे दिग्दर्शन; विजया मेहता, मधुकर तोरडमल, भक्ति बर्वे, अरुण जोगळेकर, मोहन मुंगी, दया डोंगरे असा नामवंत कलाकारांचा मेळावा; यामुळे कानेटकरांच्या नव्या नाटकाविषयी खूप कुतुहल अनेकांच्या मनात निर्माण झाले होते. प्रत्यक्षात प्रयोग पाहिल्यावर निराशा तर झालीच; पण त्याहूनही, वसंत कानेटकरांचा 'मराठी' नाटककार झालेला पाहून विमनस्कताही वाटली. विजया मेहतांना या नाटकात पाहाताना तर गेली काही वर्षे प्रायोगिक रंगमंचाशी संपर्क असणाऱ्या प्रत्येकाला परमावधीचे दुःख झाले असेल यात शंका नाही.

'अखेरचा सवाल' असे नाटकी शीर्षक घेऊन येणारे वसंत कानेटकरांचे हे नाटक म्हणजे ठरीव मराठी साच्यातील नाट्याभास उत्पन्न करणारी कृती आहे. स्थळ : दिवाणखाना; धूळ झटकणारा गडी; घराण्याशी इमानाने बांधलेल्या गड्याच्या जागी त्याच स्वरुपाचा फटकळ कंपाउंडर; अल्लड, सुंदर संकटग्रस्त नायिका; तिचा खेळकर प्रियकर; प्रेमळ घर—त्यातील नातेसंबंध; असा सारा लवाजमा या नाटकात आहे. शिवाय हृदयाला चटका लावणारे कथानकही आहे. एका अठरा वर्षांच्या सुंदर अश्राप मुलीला कॅन्सर झाला आहे—ती फार थोड्या दिवसांची सोबतीण आहे हे तिच्या डॉक्टर आईला कळले आहे. पण हृदयविकाराचा झटका येऊन गेलेल्या वडिलांना हे सत्य पेलणार नाही; नव्याने लग्न झालेल्या भावाला हे सत्य कळल्यास त्याचे सुख विरजेल म्हणून ही डॉक्टर आई (मुक्ताबाई : विजया मेहता) ओठ घट्ट मिटून हे दुःख सहन करते आहे. याशिवाय पहिल्या अंकात मुक्ताबाईच्या मुलाच्या पहिल्या विवाहाची कहाणी आणि त्यातून निर्माण झालेल्या पेचप्रसंगाचे उपकथानक आहे. कोणा ज्यूली नामे स्वीडिश मुलीशी त्याचे लग्न झाले होते. परंतु आता त्या दोघांचे पटत नसूनही घटस्फोट द्यायला तयार नाही. (परदेशी मुलगी केवळ संपत्तीसाठी विवाह करते या निष्कर्षावर मराठी मध्यमवर्गीय प्रेक्षक खुश.) या मुलाचे आईच्या दवाखान्यातील तरुण नर्सवर प्रेम आहे; पण त्यांचा विवाह होऊ शकत नाही. व्यवसायाने वकील असणाऱ्या वडिलांचा सल्ला आहे—लग्नाला कायदेशीर मोकळीक मिळेपर्यंत त्या दोघांनी तसेच एकमेकाजवळ रहावे; तर तत्त्वनिष्ठ आईचा याला विरोध आहे. पण गंमत अशी की हा संघर्ष लुटुपुटीचा आहे : कारण जादूची कांडी फिरल्याप्रमाणे मुलास घटस्फोट मिळतो. त्याचे लग्न होऊन घरात सून येते. वरील लुटुपुटीचा संघर्ष नाटकातील दुर्दैवी मुलींच्या जीवनातील पेचप्रसंगाची पार्श्वभूमी म्हणून वापरला आहे असे मानावे तर तो पेचप्रसंग त्याहूनही कमकुवत. या मुलीच्या खेळातील पार्टनरचे चारित्र्य चांगले नाही अशी तक्रार नाटकाच्या प्रारंभापासून ऐकू येते; नाटकाच्या मध्यावर तर ही मुलगी या मुलाबरोबर एक दिवस हॉटेलात राहिली म्हणून घरात गहजब होतो. मुलीच्या आईला मात्र मुलीला जाब विचारावासा वाटत नाही. कारण ज्या मुलीकडे दैवाने पाठ फिरवली तिच्या वर्तणुकीचे न्यायनिवाडे काय करायचे असे तिला वाटते. याउलट मुलीच्या भावाला—वडिलांना हा घराण्याच्या इभ्रतीचा प्रश्न वाटतो. याही ठिकाणी संघर्ष निर्माण होतच नाही; कारण ती मुलगी आपल्या हातून काही गैर घडले नाही याची ग्वाही देते. मग मुक्ताबाईना त्या मुलीच्या आजाराचे वृत्त तिच्या प्रियकराला सांगावे लागते ते वेगवेगळ्या चमकदार वाक्यातून सांगून प्रेक्षागृहातून 'स्स—हाय' अशी पावती मिळविणे हाच मार्ग उरतो. एका जिवाच्या मृत्यूभोवती गुंफलेले हे कथानक प्रेक्षकांच्या मनाला असह्य ताण देते. तो सुसह्य करण्यासाठी, कोलेस्ट्रॉलसाठी सांगितलेले पथ्य वारंवार मोडणारे मुलीचे वडील विनोदाचा पुरवठा करतात; जोडीला कंपाउंडरची व्यक्तिरेखा, मुलीच्या मित्राला मैत्रीण मानणे, इत्यादी चुटके म्हणून सांगितले जाणारे विनोद आहेतच.

अशा नाटकातून जे काही निर्माण होते त्याला कारुण्य म्हणायचे की करुण रस मानायचा? एखादा अनुभव रसपदवीला जाण्यासाठी त्या अनुभवाची कलात्मक पुनर्घटना व्हावी लागते की नाही? कानेटकरांनी केवळ आज समाजात वारंवार ऐकू येणाऱ्या कॅन्सरच्या बळीची हकिगत, लोकांच्या सहानुभूतीवर विसंबून मांडली आहे. दुःखाविषयीच्या प्रत्यक्ष प्रतिक्रियांचा वापर करणे म्हणजे रसनिर्मिती नव्हे. हे कानेटकरांसारख्या बुद्धिमान नाटककाराला सांगावयास हवे काय? नाटकामधला तीव्र अनुभव छातीत बांध घालतो—माणसाला गुदमरवून टाकतो— प्रत्यक्षात कोणाचे बरेवाईट झाल्यासारखा रडायला लावत नाही. कानेटकरांनी प्रत्येक प्रसंग प्रेक्षकांच्या भावनांशी खेळ खेळण्यासाठी वापरला आहे. एरवीच्या नाट्यलेखनात दिसणारे कानेटकरांचे रचनाकौशल्यही येथे लुप्त झाले आहे. उरतात फक्त चलाख दिखाऊ संवाद! तसे काय, एखादा जादूगारही आपल्याच जवळच्या वस्तू घेऊन हातचलाखी करून दाखवतो. कानेटकरांनीही आपल्या सर्वांच्या भावनांशी असेच खेळ केले आहेत. वसंतराव कानेटकरांनी हे करावे याचा खेद होतो. बाळ कोल्हटकर, मधुसूदन कालेलकर, हिराकांत कलगुटकर या त्रयीच्या वरच्या स्तरावरील नाटककाराने त्या

त्रयीचे तंत्र वापरावे, मराठी रंगमंचावरील लोकप्रिय चौकटीला बळी पडावे, हा पराभव कानेटकराचा मानायचा की आपला सर्वांचा ? मराठी करंट्या प्रेक्षकांचा ?

या संवादरूप रडक्या कादंबरीचा प्रयोग, एकेकाळी प्रायोगिक रंगमंचावरील कल्पक दिग्दर्शक म्हणून नावाजलेल्या दामू केंकरे यांनी दिग्दर्शित केला आहे. नेपथ्यही त्यांचेच आहे. ज्या स्वतः चित्रकार असणाऱ्या दिग्दर्शकाचा दृश्य आविष्कार हे वैशिष्ट्य आहे तो दिग्दर्शक अशा नाटकात काय करणार ? पण किमानपक्षी सर्व कलावंतांवर हुकूमत ठेवण्याचे कार्य केंकरे यांनी करायला हवे होते. कारण विजया मेहतांचा अपवाद वजा करता यातील जवळजवळ सर्व कलावंतांनी असमंजसपणे अभिनय केला आहे. भक्ती बर्वे यांनी मृत्यूची सावली पडलेल्या अल्लड मुलीची भूमिका खूप चलाखपणे उभी करण्याचा यत्न केला. पण एकतर आपण प्रेक्षकांची मने जिंकीत आहोत याची जाणीव या नटीच्या ठिकाणी स्पष्ट होती. अगदी नजर गेल्यावरसुद्धा प्रेक्षकावरची नजर काही शून्यात गेली नाही. वरवर पाहता, हसतीखेळती भूमिका या मुलीने वठवली त्याचे कौतुक करावेसे वाटेल, पण मला तर या मुलीचे काम पाहताना काशिनाथ घाणेकरांची स्मृती होत होती. विजयाबाई व दामू शेजारी असताना एखाद्या कलावंताचे असे होऊ शकते हेच आश्चर्यकारक आहे. मुक्ताबाईची भूमिका विजयाबाईंनी नेहमीच्या शैलीने केली. पण लेखनातच नाटक इतके बटबटीत आहे की जुन्या नाटकातल्या कलावंतासारखे मान तिरपी ठेऊन जीवनाचे तत्त्वज्ञान वगैरे त्यांनाही सांगावे लागले. मधुकर तोरडमल यांच्या भूमिकेला काही फारसा रूपरंगच नाही. पण आहे या स्थितीतही व्यक्तिमत्त्व असणारा विचारी वकील आणि खाण्यावर आसक्ती असणारा पुरुष या दोन रूपातील आवश्यक तोल ते राखू शकले नाहीत.

मुक्ताबाईंच्या मुलाची व सुनेची भूमिका अरूण जोगळेकर व दया डोंगरे यांनी केल्या. या जोगळेकरांचे रंगमंचावर वावरणे इतक्या वर्षांनंतरही सहज होऊ शकत नाही. विशेषतः सूट घातल्यावर ते खांदे आणि हात इतके कृत्रिम वापरतात की त्यापेक्षा नवशिका नट परवडला. एकसुरी चिडचिडलेले रूप त्यांनी उभे केले. दयाबाईंच्या वेशभूषेवर व केशभूषेवर दिग्दर्शक वा इतर तज्ञानी काही विचार केला होता की नाही कोण जाणे. पण नर्सच्या पोशाखात त्यांनी विलक्षण केशभूषा केली होती. त्यांच्या चेहऱ्यावरच्या रेषा हलतच नाहीत. वास्तविक मुक्ताबाईंचे रहस्य केवळ त्यांना माहीत आहे; पण हे प्रेक्षकांना कळणार कसे ? आपले संवाद नसतील तेव्हा त्या चक्क नाटकातून निवृत्त होतात. यंदाच्या सरकारी स्पर्धेत श्रेय प्राप्त केलेले उपेन्द्र दाते मुलीच्या प्रियकराच्या भूमिकेत वावरतात. ही व्यक्तिरेखाच नाटककाराने स्पष्ट केलेली नाही, त्यात दात्यांना अजून स्वतःची उंची रंगमंचावर सावरता येत नाही.

मोहन मुंगी यांनी डॉ. दुभाषीची भूमिका मनःपूर्वक डॉक्टराचे व्यावसायिक व कौटुंबिक संबंध लक्षात घेऊन उभी केली. काही जागी त्यांचे शब्दोच्चारण मात्र जड होते. कपाउंडरची भूमिका मुळातच आक्रस्ताळी बटबटीत आहे. मोहनदास सुखटणकरांनी ती जशीच्या तशी उभी केली. पण दिग्दर्शकाने कुणाही पात्राच्या हाताच्या वापराकडे पुरेसे लक्ष दिलेले दिसत नव्हते.

एकेकाळी ज्या नाटककाराच्या नाटकातून मराठीतील मान्यवर नट लोकांच्या पुढे आले, एकेकाळी ज्या दिग्दर्शिकेच्या प्रयत्नाने रंगमंचमाध्यमाची समज तरुणापर्यंत पोचली, एकेकाळी ज्या दिग्दर्शकाने दृश्यरचनाचे भान प्रेक्षकांना दिले, अशी सारी माणसे एकत्र येऊन, जोडीला एक अल्काझीशिष्य घेऊन, 'अखेरचा सवाल'चा खेळ आम्हाला १९७४ साली करून दाखवितात : मुंबई शहरात दर आठवड्याला इतके हिंदी चित्रपट येतात तर वेगळ्या मराठी 'अखेरचा सवाल'ची जरूरी आहे का ?

वसंत कानेटकर, विजया मेहता, दामू केंकरे या सर्वांना शेवटी इथे यावे लागले ? की मराठी रंगमंच सर्वांना शेवटी इथेच आणणार आहे ? की तुम्ही-मी-सर्वांनी या संवेदनाक्षम कलावंतानाही इथे आणले ? अखेर आपली जशी लायकी तसे नाटक आपल्याला मिळाले. अगदी १९७४ साली सुद्धा ! □ □

**Helping Den to Render Magnificent performance**

Fertilizer Animal Feeds & Textiles Dry Foods, Pharmaceutical, Glass Metal, Battery Dry Sells.

**Swadeshi Chemical** brings

- Potassium Permanganate
- Manganese Sulphate
- Sodium Alluminium Sulphate Anhydrous
- Potassium Corbonate
- Sulphate of Alluminium & Highdrum
- Magnesium Sulphate Anhydrous
- Trysodium phosphate Anhydrous
- Reactrous Manganese Dyoxide

**The Swadeshi Chemical Pvt. Ltd.**

( Active in Creating numarus officiet products )

Army & Nevy Building, 3rd Floor,
M. G. Road, BOMBAY 400 023
Tel. 252133, 252166
Telex : 011-3441 • Gram : POTPERM

# साप्ताहिक भविष्य

कृष्ण माईणकर

दि. १७ ते २३ ऑगस्ट ७४

## सरकारी उद्योगात भ्रष्टाचारी प्रकरणावर प्रकाश

मुंबई प्रदेश कॉंग्रेसने महाराष्ट्राच्या 'वसंतराव नाईक सरकारविरुद्ध' काही हालचाली सुरू केल्या असल्या तरी त्याची झळ फारशी लागण्यासारखी नाही. मात्र हरिभाऊ वर्तक, डॉ. झकेरिया, शंकरराव चव्हाण, वसंतराव नाईक अशा काही उच्च पदस्थांच्या बाबतीत राजधानी दिल्लीत प्रामुख्याने पंतप्रधानांकडून जरा वेगळ्या वागणुकीचा प्रत्यय येण्याची शक्यता वाटते. यांच्यावर 'खास दृष्टी' ठेवली गेली तर नवल वाटू नये. राष्ट्रपतीपदाच्या प्रचाराची धुळवड यावेळी खूपच उडालेली असेल. श्री. फकरुद्दीन अल्ली यांचे पारडे जड होईल. महाराष्ट्राचे राज्यपाल अलियावर जंग व बॅ. अंतुले यांच्या नावाला महत्त्व येणार आहे. अंतुले यांच्या विरुद्धच्या वातावरणाला कलाटणी मिळेल. बॅंका, सरकारी उद्योग यांच्या व्यवस्थापनात खळबळजनक घटना घडतील. भ्रष्टाचारी प्रकरणे उघडकीला येतील. नामवंत व्यक्ती जाग्या होतील. अमेरिकेचे नवे अध्यक्ष जेराल्ड फोर्ड भारताच्या बाबतीत अनुकूल धोरण ठेवण्याची शक्यता आहे.

### मेष : अनेक क्षेत्रात यश

या आठवड्याची सुरुवात अमावास्येच्या चंद्राने होत असली तरी ही चांगली अमावास्या आहे. पाचवा मंगळ अनेक बाबतीत तुमची शान वाढवणार आहे. तुम्ही वरिष्ठ श्रेणीच्या खात्याच्या परीक्षेला बसणार असाल वा बसला असाल तर या आठवड्यात लागणारा रिझल्ट तुमची प्रतिष्ठा वाढवणारा असेल. तुमचा शेतीचा व्यवसाय, तुमची जमीन असेल तर त्यात प्रगती होईल. तांब्या-पितळेच्या भांड्याचा व्यापार फलदायी ठरेल. नोकरीत चालू कामाबद्दल आस्था निर्माण होईल. परिस्थिती अनुकूल राहील. खासगी नोकरीत मालक तुमच्या बुद्धिकौशल्याला व कर्तबगारीला वाव देतील. आर्थिक स्थिती सुधारलेली दिसेल. **महिलांस** : नोकरीधंदा या सर्वच बाबतीत हा आठवडा प्रगतीचा जाईल.

### वृषभ : सुखाची चढती कमान

तुमचे नष्टचर्य पूर्णाशाने संपले नसले तरी हा आठवडा प्रगतीकडे घोडदौड करणारा आहे. मंगळ चौथा आहे. तो मन सतत खळबळीचे ठेवील. पण तुमची राहात्या जागेची चणचण, वणवण तो दूर करील. परिस्थितीप्रमाणे ज्यांना बंगला वा फ्लॅट विकत घ्यायचा असेल त्यांची इच्छा पुरी होईल. सौंदर्यप्रसाधनाचा व्यापार, कापडाचा वा सोन्याचा व्यापार जे या राशीचे लोक करतात त्यांना हा काळ लाभदायक जाईल. धंद्याला तेजी निर्माण होईल. मूळचा राहूकेतू वा मंगळ जर प्रतिकूल असेल तर कायद्याला धरूनच या राशीच्या व्यापारी लोकांनी वागावे हे बरे. आकाशवाणी कलावंतांना आठवडा कौतुकाचा जाईल. या क्षेत्रातच जे नोकरी करतात त्यांचे हित होईल. **महिलांस** : संगीत व नृत्य या क्षेत्रात या राशीच्या कलावंताचे स्थान उंचावेल.

### मिथुन : मन विशाल बनेल

हा आठवडा तुमच्या जीवनात अनेक दृष्टीने क्रांतिकारक ठरणार आहे. रवी-मंगळासारखे ग्रह तर तुमच्या कर्तृत्वाला प्रेरणा देणारेच आहेत. पण तृतीय स्थानी आज होणारी अमावास्या तुमच्या फायद्याची ठरणार आहे. गेले अनेक दिवस तुमचे मन गोंधळून गेले होते. मधून मधून निराशा मनात डोकावत होती, आता ही परिस्थिती इतिहासजमा झाली आहे. तुमचे अर्धवट राहिलेले शिक्षण पुरे करण्याच्या दृष्टीने या आठवड्यात योजना आखली जाईल. तुमचा कोणताही धंदा असू द्या त्यात प्रगतीची सुचिन्हे दिसू लागतील. धनिक भागीदार मिळून तुमचा पैशाचा प्रश्न सुटेल. एखाद्या योजनेसंबंधात तुम्हाला पत्रव्यवहार करायला आठवडा अनुकूल आहे. नोकरीत मतभेद टाळा. **महिलांस** : अजून काही दिवस, आहे त्या परिस्थितीत काढायला हवेत. पैसा कमी पडणार नाही,

### कर्क : पैशाची काळजी नको

शनी बारावा असला म्हणून तुमच्या व्यवहारात पैशाची तंगी निर्माण होईल असे समजू नका. या शनीचे तुम्हाला एवढेच सांगणे आहे की, 'उधळण' करू नका. अमावास्या धनस्थानी घडत आहे. त्याचबरोबर रवी-मंगळ छान आहेत. याचा अर्थ पैशाची तुम्ही काळजी न करणे उत्तम. रेसमध्ये भाग घ्या असे मी सांगत नाही. पण त्यात एखादेवेळी तुमचे नशीब जोरदार ठरण्याची शक्यता अगदीच दृष्टीआड करू नका. यावेळी लॉटरी अगर इतर श्रमाविना पैसा मिळण्याची साधने तुमच्या फायद्याच्या ठरण्याची शक्यता आहे. चालू उद्योगातील मंदी अगर अडचणी अजून काही दिवस राहातीलच. अडचणीचे डोंगर साडेसातीच्या फेऱ्यात आहेत. त्यामुळे विलंब होणारच. या आठवड्यात कोणताही तंटा सामोपचाराने मिटवा. नोकरीत हाताखालच्या नोकराकडून अपमान करून घेऊ नका. **महिलांस** : पैसा मिळेल पण घरातील नोकरांनी दांडी मारल्यामुळे स्वावलंबी बनावे लागेल.

### सिंह : विवेकाने वागावे

आजची अमावास्या ही प्रतिकूल नसून अनुकूल आहे. ती आपल्या राशीतच घडत आहे. रवी व मंगळ हे दोन्ही ग्रह तुमच्यावर अतिशय खूश आहेत. त्यामुळे यावेळी

तुमच्या महत्त्वाकांक्षा अनुकूल वातावरण निर्माण करणारे आहे. रवी-मंगळ अनुकूल असले की माणूस बराच बेदरकार वागतो. म्हणून तुम्हाला यावेळी विवेकाने वागायला हवे. शनिवार ते सोमवार कोणत्याही कामच्या शुभारंभाला उत्तम आहे. नव्या नोकरीच्या नादी सध्या लागू नये. चालू धंद्यात थोडी फार सुधारणा होईल. **महिलांसः** संसारात आनंद निर्माण होईल. मुले भेटतील. पाहुण्यांचा तळ घरात पडेल.

**कन्या : अनावश्यक खर्च**


कन्या राशीची माणसे सध्या कामाच्या बाबतीत किंवा श्रमाच्या बाबतीत बरीच भाग्यवान आहेत. कारण आजारीपणाची सक्तीची विश्रांती घेत आहात. पण ही विश्रांती फार पैसा खर्च करून घ्यावी लागत आहे, ही फार प्रतिकूल बाब होय. अजून काही काळ तरी याच दिव्यातून तुम्हाला जावे लागणार आहे. मंगळ पुढील महिन्यात अनुकूल झाला की मग सारे सुरळीत होईल. तूर्त परिस्थितीशी सामोरे जाऊन धैर्याने वागण्यात तुमचा पुरुषार्थ आहे हे विसरू नका. नोकरीची परिस्थिती आहे तशीच राहील. आर्थिक परिस्थितीदेखील आहे तशीच राहील. **महिलांस** : हातचा पैसा जपून खर्च करा. अनावश्यक खर्च टाळा. तब्येत सांभाळा.

**तूळ : अनुकूल आठवडा**

रवी-हर्शलचा योग अनुकूल नसला तरी गुरू हर्शलचा त्रिकोण योग फारच अनुकूल आहे. तुमच्या अंगी अभिजात असे काही कलागुण असतील तर तुम्हाला ते प्रगट करण्याची संधी सोमवार ते गुरुवार या दरम्यान मिळणार आहे. तुम्ही आकाशवाणी कलाकार असाल किंवा व्यावसायिक कलाकार असाल तर तुम्हाला कीर्ती व पैसा मिळेल. वृद्ध कलाकाराचा सरकारकडून गौरव होईल. नोकरीची स्थिती प्रगतीचे नवे वळण घेईल. एखादे अनपेक्षित कारण घडून तुम्हाला वरची जागा मिळेल. उद्योगधंद्यासाठी भांडवल मिळण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. नव्या वाहनखरेदीची इच्छा पुरी होईल. **महिलांस** : कुमारिकांचा प्रेमविवाह होण्याची बरीच शक्यता आहे.

**वृश्चिक : नवी सुरुवात नको**

तुमच्या मोठेपणात कधी मर्यादा पडत नाहीत. कारण मंगळासारखा 'सत्ताबाज' ग्रह तुमच्या राशीचा स्वामी आहे. तरीही माणसाच्या आयुष्यात चढ आणि उतार हे नियतीने निर्माण केले आहेत. त्याची दखल तुम्हाला घ्यावीच लागेल. हा आठवडा तरी मोठेपणा मिळविण्याचा आडमार्गाचा अवलंब करू नका. तुम्ही व्यापारी असाल तर 'लाच' देऊन काम करून घेण्याचा मोह टाळा. तुम्ही नोकरी करीत असाल तर लाच घेण्याचा मोह टाळा. यावेळी कायद्याचा ससेमिरा तुमच्या पाठीमागे लागल्यास नवल मानू नका. तुमच्या हाती पैशाचे हिशोबाचे मोठे व्यवहार असतील तर जपून वागणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारची नवी कार्यवाही यावेळी करू नका. **महिलांस** : भडक विचार मनातून काढून टाका. विवेकाने वागा.

**धनू : सुखस्वप्ने पडतील**

मंगळाची दशम स्थानाकडे वाढत्या वेगाने धाव सुरू झालेली आहे. त्याच्या धर्माची फळे हाती पडायला अजून अवकाश आहे. मात्र रवी अनुकूल असून यावेळी आजची अमावास्या भाग्यस्थानी पडत आहे ही फार मोठी जमेची बाजू मानायला हरकत नाही. गेले अनेक दिवस तब्येतीची परिस्थिती नाजूक होती, सर्वच बाबतीत कोंडी झाली होती, कोणतेही काम धड पुरे होत नव्हते, पण या परिस्थितीत आता थोडी थोडी सुधारणा होऊ लागणार असून त्याची सुरुवात या आठवड्यात होईल. नोकरीतील वातावरण अनुकूल बनेल. दुय्यम व्यवसाय अजिबात थांबला होता तो पुन्हा गती घेईल. बेकाराच्या बाबतीतील उपेक्षा सपेल. तात्पुरती नोकरीदेखील मिळेल. सुखाची स्वप्ने मनात रेंगाळू लागतील. **महिलांस :** निराशा काढून टाका. हळूहळू तुमच्या मनासारखे घडू लागेल.

**मकर : हर्शलची कृपा**

तूळ राशीत सध्या भ्रमण करीत हर्शल तुमच्या अनेक योजनाना व आकांक्षाना अनुकूल अशी साथ देत आहे. कोणत्याच बाबतीत तशी तुम्हाला माघार घ्यावी लागणार नाही. पण यशाचा मार्गही तेवढासा सुकर व सुलभ नाही. साध्या गोष्टीसाठी खूप धावपळ, धांदल करावी लागेल.त्यातल्या त्यात समाधानाची बाजू म्हणजे हर्शल-गुरुचा त्रिकोण योग शेवटी यश तुमच्या पदरी टाकील. या आठवड्यात थोडी फार तब्येतीची काळजी घ्यायला हवी. दमा, सर्दी, गॅसचा ज्यांना त्रास होतो त्यांनी ही काळजी घ्यावी. प्रवासाचा बेत सध्या आखू नका. रविवार ते गुरुवार थोडी फार कामे होतील. नोकरी नसणाऱ्यांना नोकरीचे आश्वासन मिळेल. ससारात महत्त्वाची घटना घडेल. स्थावराची कामे होतील. राहात्या जागेचा प्रश्न सुकर होईल. **महिलांस :** हा आठवडा अनुकूल आहे. उपासनेत मोठे यश मिळेल.

**कुंभ : कौटुंबिक असमाधान.**

कुंभ व्यक्ति या शनिप्रधान आहेत. मंगळ जर अनुकूल नसेल तर थोडाफार त्रास त्याना सहन करावा लागतो. सध्या तुम्हाला मंगळाची दाहकता सहन करावी लागत आहे. तुमच्या मनांत एखादी मोठी राजकीय आकांक्षा-महत्वाकांक्षा असण्याची शक्यता आहे, पण ती पुरी होताना मोठा सघर्ष-प्रामुख्याने भावनात्मक—करावा लागेल. कुटुंबातील आजार अशाच बाबतीत तुम्हाला असमाधान आहे. ते असेच काही काळ राहील. नोकरीधंद्याची परिस्थिती जैसे थे राहील. चालू नोकरीतील कामाचा ताण कमी होणे कठीण. वरिष्ठांच्या मनांत कोणताही सशय निर्माण होऊ देणे हिताचे ठरणार नाही. बदली वा बढतीचा प्रयत्न सध्या नको. व्यापारात तुम्ही सध्या धाडस करू नका. इंजिनिरिंग साधनाचा व्यापार फायदेशीर ठरेल. पण भेसळीपासून मात्र तुम्ही अलिप्त राहा. **महिलांस :** घरगुती उद्योगांत प्रगती होईल. मुलांचे कौतुक होईल.

**मीन : भाग्यवान ठराल.**

मंगळ तसा तुमच्या विरुद्धच आहे. विरोधक, शत्रू याचे कारवाईचे, कारस्थानांचे प्रयत्न हा मंगळ हाणून पाडल्याशिवाय राहाणार नाही. पण तुम्ही गुरुप्रधान धर्माचे असल्यामुळे तुमचा स्वभाव मुळांतच समजस, जुळवून घेणारा आहे. तुम्हाला शत्रू अगर विरोधक फारच कमी असतात. मात्र हा सिंहस्थ मगळ तुमच्या तब्येतीचे आरोग्य हिरावून घेण्याचा प्रयत्न करणार आहे. लिव्हरला त्रास, अपचन, पित्त, रक्तदाब, डोकेदुखी यासारख्या आजाराला आमत्रण हा मगळ देण्याची शक्यता आहे. म्हणून मुळांतच काळजी घ्यावी. शनिवार, बुधवार व गुरुवार हे दिवस लक्षांत ठेवा. त्यादिवशी तुमच्या भाग्योदयाला सुवर्ण किरणाचा लाभ होईल. शैक्षणिक सामाजिक व राजकीय क्षेत्रातील व्यक्तीवर सन्मानाचे योग आहेत. लेखकाच्या कलाकृतीना सरकारी बक्षिसी मिळू शकेल. नोकरीत पगारवाढ. **महिलांस** सौंदर्य प्रसाधनांच्या व्यवसायांत विक्रमी फायदा होईल. मात्र अनावश्यक खर्च टाळा.

□ □


फुकट फुकट फुकट

**पांढरे डाग**

गौतम औषधाने जवळजवळ ३० वर्षे पाढरे डागाचे रोग्याना ६ दिवसात फायदा देऊन प्रसिद्धी मिळविली आहे. एक पॅकेट औषध फुकट मागवून फायदा मिळवा.

**गौतम आयुर्वेद भवन (SD-2)**

**सरदारगृह**

राहाण्याची व भोजनाची उत्तम सोय.

हीरक महोत्सवानिमित्त विविध सुखसोयी

अद्यावत पद्धतीचे भोजनगृह

**सरदारगृह प्रायव्हेट लिमिटेड**

क्राफर्ड मार्केटजवळ, मुंबई २

**मंगलकार्ये व मेजवान्यांची उत्तम व्यवस्था**

**स्वप्न साकारले**

प्राध्यापकांच्या पुढाकाराने, विद्यार्थ्यांच्या सहकार्याने व उद्योगपतीच्या उदार आश्रयाने ' विद्या सहकारी बँक लि. ' स्थापन करण्याचे स्वप्न साकार झाले

सामान्य माणसाची वैशिष्टचपूर्ण बँक

**विद्या सहकारी बँक लि.**

३७५ नारायण पेठ, लक्ष्मी रस्ता, पुणे ३०

आम्ही आपल्या स्वागतासाठी सिद्ध आहोत.

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

# जमाना रॉबिनहूडचा आला आहे....

देव आनंदची पिक्चर्स चालत नाहीत. पडद्यावर तो हिरो म्हणून आला की पब्लिक बुढ्ढा म्हणून शोर मचावते. तरीसुद्धा एखादा ' जॉनी मेरानाम ', एखादा ' हरे राम-हरे कृष्ण ' ती उचलून धरते. ' अमीर-गरीब 'सुद्धा पब्लिकने उचलून धरलेला दिसतोय. देव आनंद हा स्टाईलबाज, आमच्या शरद गुर्जरच्या शब्दात थोडासा ' एफिमिनेट ' ॲक्टर असला तरी त्याला लोकांनी कधीतरी उचलून धरला की बरे वाटते. ' अमीर-गरीब ' चालला आणि ' देव 'ची जिंदगी ( फिल्मी ) पाच वर्षांनी वाढली असे आता म्हटले जाते.

अमीर-गरीब दिल बहलाने के लिए चांगले आहे. हेमा आहे. हेमा ही पडद्यावर अशी फ्लेअर होते की आपले तिच्यासमोर डोके चालत नाही. ही स्टार अदाकारीमध्ये जान कशी भरते, डायलॉग्ज ( तामिळी असून ) कसे, गडबड न करता पेश करते आणि झोपडीवाल्यामधले अस्सल वागणे कसे काय पेश करते या साऱ्याच गोष्टी आश्चर्याच्या आहेत. हेमामुळे अर्थात पिक्चर चालते असं मी मानत नाही. नाहीतर हेमाची अविस्मरणीय भूमिका असलेला ' लाल पत्थर ' हे पिक्चर चालले असते. पण ते सोडा, एक हेमा आहे आणि किशोरने तव्येतीत गायलेली गाणी आहेत.

–खरे म्हणजे लक्ष्मीकांत–प्यारेलाल. देव आनंद आणि किशोर कुमार हे एकत्र आल्याचे ऐकून कानाला बेसूरा वाटते. लक्ष्मी–प्यारेंनी ' मेरे दिवानेपन की ' (मेहबूब की मेहंदी) ' वो रास्ते 'मधलं एक गाणं किंवा ' दाग 'मध्ये ' मेरे दिलमे आज क्या है ' अशा चार दोन गाण्यामध्ये किशोरचा आवाज खुलवला असला तरी एरव्ही किशोरचा वाईटच उपयोग केला आहे. लक्ष्मी–प्यारेच्या संगीताच्या मर्यादा आहेतच. त्यांचा पंजाबी ढंग देवच्या प्रकृतीस साजेसा नव्हताच. दादा बर्मन आणि आर. डी. यांचे आतापर्यंत बेमिसाल संगीत ज्यांच्या वाटयाला आले आहे, तो देव आणि लक्ष्मी-प्यारे कधीच एकत्र आले नव्हते. प्रेमशास्त्रमध्ये ते प्रथम एकत्र आले. ते पिक्चर पडले. त्यात देवला जुळेल असे संगीत देण्याचा प्रयत्न फारसा यशस्वी झाला नाही लक्ष्मी-प्यारेचा. त्यानंतर ' अमीर-गरीब ', ' मैं आया हूं ' ह्या गाण्यामध्ये किशोरला अगदी खालच्या पट्टीत गायला लावून लक्ष्मी-प्यारेने अखेर देव-किशोर-लक्ष्मी-प्यारे कॉंबिनेशन फिट झाले. किशोर खालच्या पट्टीत काय गायलाय ! असं वाटलं की, आपण सिमल्याच्या बर्फिली दुनियेत आहोत आणि चिनारच्या बनामध्ये सकाळच्या सूर्यप्रकाशात धुकं फिरू लागलंय. किशोर समोर असता तर आपण त्याच्या गळयाला मिठीच मारली असती.

लक्ष्मी-प्यारेने दोन लाजबाब कवाल्या स्टाईलची गाणीही दिली. ' मेरे प्यालेमें शराब भर दे, ' आणि ' कहीं तो जनाब को, मेरा तो इंतजार नही. ' ही दोन्ही किशोरच्या झपाटून टाकणाऱ्या आवाजामुळे चटका लावून गेली.

– हेमा आणि किशोरची मेहफिल सोडली तर एरवी अमीर गरीब ही तद्दन रॉबिनहूडची स्टोरी आहे. फक्त आधुनिक नकाबमधली. एका दिलेर हिरोने, काळा नकाब घालून अमीरांना लुटणे आणि गरिबांना दौलत वाटणे, एका छोकरीमध्ये त्याचा रोमँटिक इंटरेस्ट असणे वगैरे. हॉलीवुडच्या जमान्यात आपण अशी पिक्चर्स पाहून दिल बहलावत होतो. डग्लस फेअरबँक्स, व्हॅलेंटिनो, इरॉक फ्लीन, बर्ट लँकेस्टर, यांची पिक्चर्स आठवतात. आता ' जुग्नु 'पासून तोच सिलसिला सुरू झाला आहे. ' जुग्नु ', ' बागला भगत ' असे नकाबवाले हिरोंच्या पिक्चर्सला लोक गर्दी करतात आणि एरवी हिंदी सिनेमांना शिव्या देणारे समीक्षकही ' आज बागला भगत 'ची गरज आहे ' असे म्हणतात, त्यावेळी आठवण होते बी. आर. चोप्रांची.

' या देशामध्ये कुणीही सिरिअस विचार करायला तयार नाही. आम्ही सिनेमावाल्यांनी अशा पब्लिकसाठी खास हिरो बनवले आहेत. ' जुग्नु ', ' बागला भगत ' हेच ते हिरो. आणि या हिरोंनाही आम्ही सिरिअसली घ्यायला लागलो तर आपण कुठे जाऊन पोहोचू याचा कुणाला पत्ता लागणार आहे.

◻

## जग्गाचा फिल्मी सत्कार

– आपण काहीही सिरिअस विचार करायला तयार नाही या चोप्राच्या म्हणण्यावरून आठवलं. अलीकडेच सायप्रसच्या लढाईमुळे ग्रीसचे हुकूमशाही सरकार कोसळले आणि ग्रीसमधल्या ज्या कलावंतावर बंदी होती ते सर्व कलावंत मायदेशी परतले. त्यात मेलिना मर्क्युरी ही ग्रीक अभिनेत्रीही होती. मेलिनावरही बंदी! साऱ्या दुनियेभर ' सेक्स सिंबॉल ' म्हणून माहीत असलेल्या मेलिनावर बंदी ! खालीचा स्लोगन-बिगन देण्याच्या स्टाईलमधला मी एक फोटो पाहिला नि आपण तिला मानले. एकूण, या देशाचा किनारा सोडला की जगात जिकडे-तिकडे सिरिअस माणसे भेटायला लागतात. तिथ सिनेमा नट पण सिरिअस मडळी. ब्रिजिद बार्दोत अल्जेरियाच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी मोर्चात भाग घेईल, जेन फोंडा, मार्लन ब्रँडो रेड इंडियन्सच्या चळवळीसाठी जीव टाकतील, मेलिनावर बंदी घालण्यात येईल. असे हे नटन-ट्या. म्हणूनच मला वाटत, त्या देशात ' अमीर गरीब 'सारखे पिक्चर्स निघत नसावेत. ◻

गुजराथी साहित्यिक आणि सिनेसमीक्षक श्री. हरकिसन मेहता पूर्वी ' चंद्रयुग ' नावाचे साप्ताहिक काढीत होते. त्या साप्ताहिकामध्ये त्यानी आपण लिहिलेली जग्गा डाकूची स्टोरी क्रमाक्रमाने दिली होती. मी ही स्टोरी वाचली नव्हती. कारण, मला हा डाकू कोणीतरी रोमॅंटिक व्यक्ती असणार असे वाटले होते. पण, एक दवस ' हिरा ' या चित्राच्या ' प्रेस शो 'ला माझ्या शेजारच्या सीटवरच ' जग्गा ' बसलेला. हरकिसनभाईंनी त्याची माझ्याशी ओळख करून देताच मी ताडकन उडालो.

–अलीकडे गुजराथी चित्रपट समीक्षक आणि संगीतकार कल्याणजी यानी शण्मुखानंद सभागृहात सत्कार सोहोळा आयोजित केला होता. तस म्हटल तर ती ' बाबला-नाईट ' होती. बाबला हा कल्याणजीभाईंचा धाकटा भाऊ असे ' नाईट 'चे प्रोग्राम्स पेश करतो. ड्रम्स निरनिराळ्या प्रकारचे वाजवतो. कल्याणजीभाई प्रोग्राम्स पेश करतात. प्रोग्राम्स पेश करणारे अमीन सायानी. डेव्हिड वगैरे जी मडळी आहेत, त्यापेक्षा कल्याणजीभाईंच्या वाणीची लज्जत खास आहे. त्यांना जितके संगीत येत नसेल तितका विनोद सहजतेने करता येतो. ऐन सत्कार-समारंभावेळी त्यांचे वृद्ध वडील वीरजीभाई व्यासपीठावर बसले होते. त्यांची ओळख करून देण्यात आली त्यावेळी त्यांच्याकडे बोट दाखवून असे काही हसले की, " च्यायला, लोकहो. हे माझे वडील. आहे की नमुना ! " आपण मानल त्याना.

–जग्गा डाकू तसा डाकू दिसत नाही. खून करून, तुरुगात हयात काढूनही तो पोरसवदा वाटतो, गुलजार वाटतो. इनोसंट वाटतो. त्याचा सत्कार म्हणजे हारतुरे, आणि भेटवस्तु अर्पण करण्याचा कार्यक्रम होणार असतो. तकदीरची ती वेळ नव्हती. ' क्रुक अँड, कॅर्क ' आणि महेशकुमार याच्या नकला ऐकण्यासाठी जमलेली पब्लिक. ज्यानी जग्गा डाकू या वाल्याचा वाल्मिकी बनवला त्या जेलर मेहेतानी लाबलचक भाषण आणले होते परतु आमचे मित्र रमेश मत्री यांनी त्यांना भाषण आखूड करण्यासाठी सागितले. तर ते आपले आखूड भाषण करण्यासाठी उभे राह्यले आणि अखेर दोन वाक्य बोलूनच खाली बसले. जग्गा डाकूला खरं म्हणजे त्या दिवशी प्रत्येक फिल्म स्टारने व्यासपीठावर येऊन अभिवादन केले हाच त्याचा खरा सत्कार असावा. धर्मेंद्र, अमिताभ, शत्रुघ्न, दारासिंग प्रत्येक फिल्मस्टारने व्यासपीठावर याव आणि जग्गाची इज्जत करावी, असा सिलसिला चालला होता. गुजराथी साहित्यिक आणि पजाबी नट याची साबरमती-कम-चदीगड सास्कृतिक मिलाप पहाताना मजा आली.

शिवाय गाणी झाली. आवाज नसलेले नकली किशोर कुमार आणि लता, रफी, आपल्या नकलानी बोअर करणारे क्रूक, महेशकुमार, याचे कार्यक्रम पहाता पहाता एक गोष्ट लक्षात आली की ' बॉबी 'ची गाणी कोणीही पेश करीत नाही. एकूण ' बॉबी ' आणि शैलेंद्रसिंग यांचा सिलसिला सपला. अमिताभने बिवीमुळे बडा नाम झालेले एक गाणे म्हटले. ' जिसकी बीबी ठिंगू ' हे बोलताना, तो गोड लाजला. शत्रु साला आल्याबरोबर सिनेमातले डायलॉग्ज ठोकत होता. कल्याणजीभाईंनी त्याची फिरकी जबरदस्त घेतली. ' हा पिक्चरचा हिरो असला म्हणजे पिक्चर पडलच ' हे शत्रुच्या तोडावर सांगत होता म्हणजे काय ! शत्रु करतो काय ! चुरमुरे खात होता. दोन कार्यक्रम जबरदस्त झाले. एक आझर नाझचेच त्याच्या आवाजातले ' झूम बराबर झूम ' बापरे ! थिएटर मारून टाकतो तो. आणि दुसरी जग्गाची गाणी. हातात स्टीलच्या कंगन घालून त्यांच्या तालावर ' अखिया ' म्हणून त्याने भागडा गीत छेडावे किंवा काठेवाडी शंबई घुमवावी ! हा कसला डाकू ! हा अफलातून गाणारा आणि नाचणारा निघाला. तो नाचलाही छान ! या देशात आपण भरत नाट्यम सोडून जो जसे नाचतो, त्याला मानतोच जग्गाला आपला सलाम !

## कैसे तुम हिरो हो !

जबलपूरला म्हणे स्टेशनवर उतरल्यावर जर तुम्ही केस हिरोसारखे ठेवले असले तर पोलीस तुम्हाला धरतात आणि तुमची ' सफाचट ' करतात. पोलिसांचा फतवाच निघाला आहे, ' सिनेमा हिरोसारखे वाढवलेले केस दिसलेच तर कापा ! ' म्हणजे पोलीस चक्क हिरोच्या केसाना हात घालणार आणि हिरो ' हिरो ' असून ते सफाचट होत असताना पहात रहाणार ! आपल्याला समजत नाही ही माणसे. कैसे तुम हिरो हो !

■ ■

राजहंस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील सस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. स. श्री. ग माजगावकर